पुण्यपत्तनस्थ

माजी आर्योद्धारक मंडळीच्या

संस्मरणार्थ

हें नाटक मीं अत्यंत प्रेमादरपूर्वक

अर्पण केलें आहे.

गोविंद बल्लाळ देवल,

भाषांतर कर्ता.

# प्रस्तावना.

जसें कालिदासाचें 'शाकुंतल,' किंवा भवभूतीचें 'उत्तररामचरित' तसेंच शेक्सपियरचें 'अथेल्लो' नाटक हें त्याच्या परिपक्वबुद्धीचें फल होय. याची प्रशंसा करावी तितकी थोडीच. या नाटकाचें कै० महादेवशास्त्री कोल्हटकर यांनीं केलेलें एक मराठी भाषांतर प्रसिद्ध झालेलें आहे. पण तें केवळ भाषांतर याच दृष्टीनें तयार झालें असल्यामुळें त्याजवरून रंगभूमीवर प्रयोग करतांना पुष्कळ अडचणी येत असत. दहा वर्षांपूर्वीं पुणें येथील **आर्योद्धारक** मंडळीनें जेव्हां हा प्रयोग केला, तेव्हां ह्या अडचणी त्यांच्या अनुभवास आल्या, व मीही त्याच मंडळींतला असल्याकारणानें माझें त्यांजकडे सहजच लक्ष्य गेलें. म्हणून नाटकप्रयोगास, व त्याच प्रमाणें वाचनासही, सर्वांशीं उपयोगी पडेल अशी या नाटकाची एखादी रंगावृत्ति ( Stage-edition ) काढावी असें माझ्या मनांत येऊन त्याप्रमाणें मीं ही यथामति तयार केली आहे. पूर्वीं प्रसिद्ध असलेल्या भाषांतरापेक्षां हींत विशेष गोष्टी ह्याच, कीं निष्कारण शब्दविस्तार बहुतेक कमी केला आहे, इंग्रजी तऱ्हेची वाक्यरचना न करितां भाषणांचा झोंक काळास व पात्रांस साजेल असा ठेवला आहे. जागजागीं पात्रसूचना दिल्या आहेत. मूळ नाटकांतील पात्रांचीं केवळ नांवेंच बदललीं नसून एकंदर संविधानकही मूळांतलें सौरस्य व रहस्य बिलकुल कमी होऊं न देतां इकडील एका ऐतिहासिक स्थितीशीं जितकें जुळेल तितकें जुळविलें आहे. हा सर्व फेरफार मार्मिक प्रेक्षकांच्या किंवा रसिक वाचकांच्या लक्ष्यांत तेव्हांच येईल, याकरितां त्याजबद्दल येथें विशेष विस्तार करीत नाहीं. इतकें करूनही यांत कांहीं दोष राहिले असतील तर त्याजबद्दल विद्वज्जनांनीं मला क्षमा करून माझ्या इतर कृतींप्रमाणेंच हिचाही प्रेमानें स्वीकार करावा अशी प्रार्थना आहे.

ही रंगावृत्ति तयार करितांना माझे विद्वान् मित्र प्रो० **वासुदेव बाळकृष्ण केळकर** यांनीं मला चांगलें सहाय्य केलें, त्याजबद्दल

त्यांचा मी फार आभारी आहें. त्याचप्रमाणें वऱ्हाडांतल्या शाळाखात्यांतील एज्युकेशनल इन्स्पेक्टर रा० सा० **विष्णु मोरेश्वर महाजनी** एम्. ए. यांनीं आपला बहुमोल वेळ खर्चून या पुस्तकाची हस्तलिखित प्रत फार मार्मिकपणानें तपासली व कांहीं महत्वाच्या सूचना केल्या, यासाठीं त्यांचाही मी फार आभारी आहें. तसेंच माझे मित्र रा० **अनंत वामन बरवे** यांनीं हें पुस्तक छापतांना शुद्धाशुद्ध पाहण्याचें श्रम घेतल्याबद्दल त्यांचेही आभार मानून ही प्रस्तावना पूर्ण करतों.

ता० २ नोवेंबर, सन १८९०<br>इसवी; पुणें, पेठकाळेवावर,<br>भिडे यांचा वाडा.

गोविंद बल्लाळ देवल.

# नाटकपात्रें व स्थळें.

ड्यूक आफ् वेनिस—वेणीपूरचा राजा.

अथेल्लो—झुंजारराव ( सरलष्कर. )

क्याशिओ—पिलाजीराव ( झुंजाररावाचा मुतालीक. )

यागो—जाधवराव ( झुंजाररावाचा निशाणवाला. )

ब्रोब्यांशिओ—मानाजीराव ( एक वृद्ध सरदार. )

ग्राशियानो—मुधोजीराव ( मानाजीचा भाऊ. )

लोडोविको—धनाजीराव ( एक मानकरी. )

रॉडरिगो—रंभाजीराव ( एक सधन तरुण गृहस्थ. )

मॉटेनो—परसोजीराव ( सोनबेटाचा अधिकारी. )

एँटोनिओ—हिम्मतराव.

जूलिओ—हैबती ( हुजऱ्या. )

डेस्डिमोना—कमळजा ( झुंजाररावाची बायको; मानाजीची मुलगी. )

एमिलिया—सारजा ( जाधवरावाची बायको. )

बयांका—चंपाजी ( पिलाजीची राख. )

सायप्रस—सोनबेट.

ऱ्होड्स—लोहबेट.

ह्यांशिवाय कानाजी, नोकर, कामदार वगैरे.

# झुंजाररावनाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश पहिला—वेणीपुरांतील एक रस्ता. रात्र.

( पुढें **रंभाजीराव** व त्याचेमागून **जाधवराव** असे येतात. )

**रंभाजी०**—( रागानें ) चला ! बोलूं नका. माझ्याशीं दगलबाजी केलीत. अहो ! आजपर्यंत माझा पैसा आपलाच समजून पाहिजे तसा उधळलात, आणि तुह्माला ही बातमी लागली असून,—

**जाधव०**—पण–अहो पण–ऐकून तर ध्या मी काय ह्मणतों तें. तुमची शपथ, मला या गोष्टीचं स्वप्न सुद्धां नाहीं.

**रंभाजी०**—तुह्मीं सांगितलंत, त्याच्यावर माझा दांत आहे.

**जाधव०**—मग ? आहेच. नाहीं कोण ह्मणतो ? आणि त्याचं कारणही सांगतों. त्यानं मला आपली मुतालिकी द्यावी, ह्मणून इथल्या दोन तीन बड्या मानकऱ्यांनीं समक्ष जाऊन त्याच्याजवळ शब्द टाकला. शिवाय, माझ्या लायकीप्रमाणं तो हुद्दा मलाच मिळणं रास्त. पण, तो आपल्याच ऐटींत ! त्याला कोणाची मुर्वत ? बस्स ! स्वतांची तब्बेत लागेल तसं करायचं. ह्मणून त्यानं प्रथम लष्करी भाषणाची हवीतशी गर्दी उडवून त्या मानकऱ्यांची लांबलचक चऱ्हाटं लावून उ-

डवाउडवीच केली. आणि हूं काय? अखेर नन्ना! ह्मणतो कसं, "आह्माला हुद्देदार नेमायचा तो नेमून चुकलों." झालं? बरं, नेमला तो तरी कोण? तो—पिलाजी—एका पाखरावर आषक् झाला आहे तो, लढाईचं मैदान सुद्धां कधीं पाहिलं नसेल बिचाऱ्यानं! कुठें लढाईच्या बाता मारतांना ऐकल्या असतील, त्यांच्या जोरावर भपकेदार पोशाख चढवून शिपाईगिरीचा बखवा करण्यांत मात्र बहाद्दर! पण कसंही असो. आह्माला कोंपऱ्यांत दडपून मुतालीक तेच झाले; आणि कित्येक निकराच्या सामन्यांत त्या झुंजाररावानं आमची कर्तबगारी ज़ातीनं पाहिली असून, आह्मी आपले निशाणवाले ते निशाणवालेच!

**रंभाजी०**—तुह्मी ह्मणून स्वस्थ बसलांत; मी असतों तर त्याला छाटूनच टाकला असता.

**जाधव०**—पण करणार कसं! ताबेदारीचं कपाळच हें. सध्यां बढती मिळायची, ह्मणजे एक शिफारस, किंवा मेहरबानी. पहिल्याच्या मागून दुसऱ्याचा हक्क, हा मामूल आतां बुडाला. असो; पण या सर्वांवरून तुह्मीच सांगा कीं, त्या झुंजाररावाविषयीं माझं मन सफा असावं, असा कांहीं खरा संबंध राहिला आहे का आतां?

**रंभाजी०**—मग त्याची ताबेदारी कां करतां?

**जाधव०**—हं, सांगतों. (त्याला बाजूला घेऊन हळूच) त्याच्यावर डावपेंच चालवून आपला मतलब साधून घ्यावा, ह्मणून त्याची ताबेदारी करतों, समजलांत? आह्मां सर्वांनाच कांहीं धनी होतां येत नाहीं! आणि सर्वच धन्यांना इमानीच नोकर मिळतात असें नाहीं. नोकर दोन प्रकारचे.

कांहीं असे इमानी आणि असे हांजीहांजीखोर असतात, कीं केवळ चोटावारी, धन्याच्या घरीं शुद्ध गाढवाप्रमाणं, मोठ्या हौसेनं वर्षानुवर्ष राबतात. पण बुड्ढे झाले कीं हकालदेव! अशा गद्धेशाई बेवकूब गुलामांना, मी तर ह्मणतों, कीं मारे चाबकाखालीं झोडपावेत. आतां, दुसरे कांहीं असेही असतात कीं, बाहेरून आपल्या नोकरीचा पेशा चोख राखायचा; पण आपलं खरं लक्ष मतलबावर; आणि वरवर इमान दाखवून, आपली एकदां तुमडी भरली, कीं ठोकला रामराम धनीसाहेबांना! अशा मर्दांत कांहीं पाणी असतं; आणि माझा बाणा हाच आहे. तेव्हां समजलांत, मी त्याची ताबेदारी फक्त मतलब साधावा ह्मणून करतों. ईश्वरसाक्ष सांगतों, त्याच्यावर माझं प्रेम नाहीं, किं भक्ति नाहीं. पण हीं सर्व बाहेरून दाखवायचीं. मी बाहेर वेगळा आणि आंत वेगळा.

**रंभाजी०**—त्याला जर ही शिकार पचली, तर त्याचं नशीब पुरं खुललं ह्मणायचं!

**जाधव०**—तिच्या बापाला उठवा. लागा पाठीस. मोठ्या आनंदांत निजला असेल, अशांत द्या लावून भुंगा. हरतऱ्हेनं त्याला चिथवा, बघतां काय?

**रंभाजी०**—हाच त्याचा वाडा, मारतों हाका जोरानं.

**जाधव०**—(त्याला पुढें ढकलून) हूं; पण भरवस्तीच्या शहरांत रात्रीची एकाएकीं आग भडकलेली पाहून जशा घाबरून आरोळ्या ठोकतात, तशा मारा.

**रंभाजी०**—मानाजीराव! अहो मानाजीराव!

**जाधव०**—(आरडून) उठाहो! अहो मानाजीराव!

चोर ! चोर ! चोर ! आपली मुलगी ! पैसाअडका पहाहो ! (दोघे मिळून) चोर ! चोरहो !

**मानाजी०**—(खिडकीशीं येऊन) काय आहे दंगा ? कां, असे कां ओरडतां ?

**रंभाजी०**—आपल्या घरचीं सर्व माणसं आंतच आहेत का ?

**जाधव०**—आपले दरवाजे कुलुपबंद आहेत का ?

**मानाजी०**—कां बरं ? तुह्मी कोण चौकशी करणार ?

**जाधव०**—महाराज, आपल्याला सफा लुटलं. तुमचा कलिजा कापून अर्धा प्राण चोरून नेला. आतां, इतक्यांत ह्मणून सांगतों, चार माणसं शिपाईप्यादे जमवा, दौड करा, नाहीं तर काळ्या झोटिंगाचे सासरे व्हाल. ह्मणून सांगतों, उठा लौकर.

**मानाजी०**—तुह्मी शुद्धीवर नाहीं वाटतं ?

**रंभाजी०**—महाराज ! माझा शब्द आपण ओळखला का ? मी रंभाजीराव.

**मानाजी०**—तूं का ? तर अगोदर चालता हो. समजलों. माझ्या मुलीला तूं मागणी केली होतीस, ती मीं नाकारली; ह्मणून दारूच्या निशेंत धुंद होऊन, आकसानं मला त्रास द्यायला इथें आलास वाटतं ? चल निघ इथून.

**रंभाजी०**—पण–अगोदर—

**मानाजी०**—नाहीं तर चांगला वचपा काढीन, समजलास ?

**रंभाजी०**—पण मी काय ह्मणतों ऐकून तर घ्या.

**मानाजी०**—तूं लुटीची काय गोष्ट बोलतोस ? ही

कांहीं बेबंद नगरी नव्हे; वेणीपूर आहे हें. आणि माझा वाडा ह्मणजे रानांतलं खोपट नाहीं, समजलास ?

**जांधव**०—वाः ! काय चमत्कारिक आहां हो ! आह्मी तुह्माला वेळेवर खबर द्यायला आलों, आणि तुह्मीच आह्माला दडपतां !

**मानाजी**०—खबर ! कसलीरे खबर देणार तुह्मी ?

**जाधव**०—हीच कीं, तुमची मुलगी, आणि तो हुप्या झुंजारराव, आणि–यांत काय तें समजून घ्या.

**मानाजी**०—तूं पाजी हरामखोर मनुष्य आहेस.

**जाधव**०—आपण अहां महाराज–सरदार लोक !

**रंभाजी**०—मामासाहेब, मी सांगतों इकडे लक्ष द्या. आपली मुलगी, अशा अपरात्रीं, बरोबर घरचा कुणी भलाबुरा मनुष्य न घेतां, त्या झुंजाररावावर फिदा होऊन, त्याच्याकडे गेली; या गोष्टीला कदाचित् आपला रुकार असेल, तर आह्मी कळवायला आलों, हा आमच्या हातून मोठा गुन्हा झाला; परंतु आपल्या नकळत गेली असेल, तर मात्र आपण आह्माला विनाकारण शिव्या हांसडल्यात. आपल्यासारख्या थोरांची आह्मी भलतीच थट्टा करूं कशी ? अजून संशय असेल तर खात्री करून घ्या. ती जर घरांत सांपडली, तर आपल्याला फसविल्याबद्दल होईल ती शिक्षा भोगायला मी तयार आहें.

**मानाजी**०—कोण आहेरे, कंदील लावा. माणसांना उठवा सगळ्या. आतां स्वप्न पडलं होतं, त्याला हें जुळतं. कंदील ! कंदील ! (जातो.)

**जाधव**०—रंभाजीराव, आतां मला गेलंच पाहिजे. कारण इथं राहिलों तर झुंजाररावाविरुद्ध सांक्ष द्यावी ला-

गणार. तें रास्त नाहीं. उगीच नोकरीला धक्का बसण्याचा संभव. कारण या प्रकरणांत सरकारचा त्याच्यावर घुस्सा होईल; पण त्याचा हुद्दा कांहीं निघत नाहीं; कारण तिकडे लढाई जुंपली आहे. तिच्यावर पाठवायला याच्या तोलाचा हुषार शिपाई, सरकारांनीं आपले प्राण गहाण ठेवले तरी, दुसरा मिळणं नाहीं. तेव्हां अर्थात्, तो माझा दुष्मान् आहे तरी, या पोटासाठीं मला त्याच्यापुढं निशाण फडकावून नेकी दाखविलीच पाहिजे. असो, ही जमात घेऊन तुह्मी बलभीमतळ्यावर या. तिथं सांपडेल तो. मी जवळ आहेंच. रामराम ! (पळत जातो.)

**मानाजी०**—झाला–घात झाला ! अरिष्ट कोसळलं खरं ! गेली कारटी ! आतां नशिबीं दुःखावांचून कांहीं नाहीं. कांहो रंभाजीराव, तुह्मीं कुठें पाहिलीत तिला ? झुंजाररावाकडे गेली ह्मणतां ? पण तीच होती कशावरून ? अशीं पोरं नसलेलीं बरीं ! देवा ! बाहेर तरी कशी पडली ती ! बापाला ठकविलंस ! बाबांनो ! याउपर पोरींच्या वागणुकीवरून त्यांच्यावर भरंवसा ठेवूं नका बरं ! पण अशा अल्लड मुलींच्या मनावर बीरमंत्रांनीं भुरळ पडलेली तुह्मीं नाहींका कधीं ऐकली ?

**रंभाजी०**—हो, हो, अशा पुष्कळ गोष्टी ऐकल्या आहेत.

**मानाजी०**—रंभाजीराव, ती मीं तुह्माला दिली असती तरी बरं झालं असतं. पण आतां तो चोर आणि ती कारटी आपल्याला कुठं सांपडतील बरं ?

**रंभाजी०**—चांगले हत्यारबंद जवान घेऊन माझ्याबरोबर याल, तर मी काढीन त्यांचा पत्ता.

**मानाजी०**—हा मी तयार आहें, चला. (जातात.)

## प्रवेश दुसरा—बलभीमतळ्यावरील रस्ता.

( **झुंजारराव** व **जाधवराव** येतात. )

**जाधव०**—शिपायाच्या पेशानं माझ्या हातून लढाईंत पुष्कळ बळी पडले आहेत; तरी मुद्दाम एखाद्याचा खून करणं ह्मणजे घोर पातक असं मी समजतों. अशा धार्मिकपणानं कधीं कधीं माझं नुकसानसुद्धां होतं. आठ दहा वेळ मनांत आलं, कीं ही समशेर अशी त्याच्या पोटांत भोंसकून द्यावी.

**झुंजार०**—नाहीं भोंसकलीत, हेंच चांगलं केलंत.

**जाधव०**—असं नव्हे धनीसाहेब. पण त्यानं आपल्यावर असं तोंड सोडलं होतं कीं, माझ्यांत तितका साधुपणा नसल्यामुळं तें मीं मोठ्या मुष्किलीनं सहन केलं. परंतु आपल्याला एक विनंती आहे. आपला हा प्रीतिसंबंध शास्त्राबर्हुकूम झाला आहेना ? कारण मानाजीराव मोठा लोकप्रिय असून, दरबारांतही चांगला वजनदार आहे. तेव्हां जातकुळीची ह्मणा किंवा दुसरी कांहीतरी भानगड उत्पन्न करून, आपल्याला एखाद्या पेंचांत आणील, ह्मणून ह्मणतों.

**झुंजार०**—अं: ! पाहिजे ती भानगड करूं द्या. मीं ज्या आजपर्यंत सरकारच्या मोठमोठ्या कामगिऱ्या बजावल्या आहेत, त्यांच्यापुढें त्याच्या रडण्याचं काय चालणार ? शिवाय जातकुळीबद्दल ह्मणाल, तर तुह्माला ह्मणून सांगतों, मी जरी जातीचा कोळी, तरी कांहीं हलका नाहीं—सरदाराचा बच्चा आहें. पण आपलीच बढाई सांगणं रास्त

नव्हे, ह्मणून ही गोष्ट मीं छपवून ठेवली होती, समजलांत? तसंच आज जो मी एवढ्या हुद्यावर चढलों आहें, तो तरी फक्त आंगच्या जोरावर चढलों, उंच कुळांतला ह्मणून नाहीं. जाधवराव, कमळजा माझ्या मनांत उतरली नसती, तर जगांतलें सर्व रत्नभांडार आंदण घेऊन सुद्धां मी आपल्या पायांत हा संसाराचा लंगर कधींही अडकविला नसता. पण तो उजेड कसला दिसतो बरं?

**जाधव०**—हाच तो तिचा बाप. धनीसाहेब, आपण आंत जाल तर बरं होईल.

**झुंजार०**—(पुढें सरून) कां? मला काय त्याची डर? माझा हुद्दा, माझं शौर्य, आणि निष्पाप मन, यांचा जोर असून मी आंत कां जाईन? पण तोच का हा?

**जाधव०**—मला वाटतं—नव्हे, तो नव्हे.

**झुंजार०**—अहो हे आपले मुतालिक पिलाजीराव.

(**पिलाजीराव** व कांहीं शिपाई येऊन रामराम करितात.)

कां, काय खबर?

**पिलाजी०**—सरकारांनीं आपल्याला या क्षणीं ताबडतोब बोलावलं आहे.

**झुंजार०**—कां बरं?

**पिलाजी०**—माझा तर्क—सोनबेटाकडील कांहीं जरूरीचं प्रकरण असावं. कारण आतां—रात्रीच्यारात्रीं तिकडून लागोपाठ बारा सांडणीस्वार आले. बहुतेक मसलतगार खलबतखान्यांत जमले आहेत, व आपलाही चोहोंकडे शोध चालला आहे.

**झुंजार०**—ठीक आहे. असाच उभाउभीं आंत जाऊन येतों. (जातो.)

**पिलाजी**०—कां जाधवराव, हे इकडे कुणीकडे ?

**जाधव**०—(हळूच) अहो काय विचारतां! आज स्वारीच्या हातीं एक चालतीबोलती सोन्याची खाण लागली आहेना! ती जर पचली, तर जन्माची चंगळ झाली.

**पिलाजी**०—ह्मणजे ? मी नाहीं समजलों.

**जाधव**०—अहो त्यांनीं एक बायको पटकावली!

**पिलाजी**०—ती कोण ?

**जाधव**०—ती–(झुंजारराव येतो.) कां निघायचंना धनीसाहेब ?

**झुंजार**०—चला.

**पिलाजी**०—ही पाहिली, आपल्या शोधाला दुसरी मंडळी आली.

**जाधव**०—(घाबऱ्या आवाजानें) धनीसाहेब, हा मानाजीराव–संभाळा, प्रसंग बिकट दिसतो.

(**मानाजीराव, रंभाजीराव** व कांहीं जवान येतात.)

**झुंजार**०—कोण आहे ? उभे रहा.

**रंभाजी**०—मामासाहेब, हाच तो झुंजारराव.

**मानाजी**०—धरा, पकडा चोराला. बघतां काय ?

(दोहोंकडच्या तलवारी चमकतात.)

**जाधव**०—या रंभाजीराव, ही तलवार तुमच्याकरतांच उपसली आहे.

**झुंजार**०—हां! तलवारी उपसायचं कारण नाहीं. मामासाहेब, आपल्या वयाला जेवढा आह्मी मान देऊं, तेवढा आपल्या हत्यारांना देणार नाहीं.

**मानाजी**०—चोरा! हरामखोरा! माझी मुलगी

कुठें नेऊन ठेवलीस बोल ? कांहीं तरी चेटूक करून तूं तिला भुरळ घातलीस. नाहींतर तुझ्यासारख्या कमअस्सल माकडाला ती आपखुषीनं, प्रत्यक्ष बापाला न विचारितां कधींही भाळली नसती. बघतां कायरे ? पकडा, आंवळा चोराला. इकडेतिकडे करील तर चांगला नरम आणा. अरे हरामखोरा ! पकडा, पकडा.

( दोहों बाजूंचे लोक एकमेकांवर धांवतात. )

**झुंजार०**—खबरदार ! हातघाईला येण्याची तुह्माला आणि ( आपल्या लोकांस ) तुह्माला दोघांनाही जरूर नाहीं. ( गंभीरपणानें ) मामासाहेब, तुमच्याबरोबर मी कुणीकडे येऊं तें बोला.

**मानाजी०**—बंदिखान्यांत, दुसरं कुठें ? सरकारचौकशी सुरू होई तोंपर्यंत, तुला कैदेंत राहिलं पाहिजे.

**झुंजार०**—पण मला ताबडतोब खुद्द सरकारच्या भेटीला गेलं पाहिजे. कांहीं जरूरीच्या कामाकरितां हे पिलाजीराव त्यांच्या हुकुमानं मला न्यायला आले आहेत.

**पिलाजी०**—होय मामासाहेब—सरकार खलबतखान्यांत बसले आहेत. आपल्याकडेही जासूद गेला आहे.

**मानाजी०**—काय ! सरकार इतक्या रात्रीचे खलबतखान्यांत ! कांहीं हरकत नाहीं. याला घेऊनच तिकडे जाऊं. सरकारांना तरी या गोष्टीची दाद घेतलीच पाहिजे. कारण, असा जुलूम जर लोकांवर खुशाल होऊं दिला, तर झोटिंगबादशाहीच सुरू झाली ह्मणायची. चलारे. ( सर्व जातात. )

## प्रवेश तिसरा.—राजवाड्यांतील खलबतखाना.

( राजा व दोहों बाजूंस मसलतगार. )

**राजा**—या सर्व बातम्या खऱ्या ह्मणाव्या, तर त्यांच्यांत कांहीं मेळ दिसत नाहीं.

१ **मसलतगार**—खरं आहे महाराज.

२ **मसलत०**—सरकार, अंदाज ह्मणजे थोडीबहुत तफावत असायचीच. परंतु, हबशाचं आरमार सोनबेटावर चालून येणार, हें या बातम्यांवरून खास ठरतं.

**राजा**—हो एकंदरींत हेंच खरं दिसतं.

( इतक्यांत एक जासूद येऊन मुजरा करून उभा रहातो. )

**राजा**—काय खबर ?

**जासूद**—हबशी आरमार लोहबेटावर जाणार, ही खबर हुजूर जाहीर करायला मला मुरारराजांनीं पाठिवलं आहे.

**राजा**—( मसलतगारांस ) कां ? यावर काय तर्क चालतो ?

१ **मसलत०**—ही खबर झूट आहे सरकार. फक्त आमची चकभूल करण्यासाठीं त्यांचा हा खेळ दिसतो. कारण, हबशाला सोनबेटाची जरूर विशेष. शिवाय, सरकारांच्या हेंही ध्यानांत येईल कीं, लोहबेटापेक्षां सोनबेट काबीज करायलाही इतकं जड जायचं नाहीं. कारण तिथली बंदोबस्ती जरा ढिली आहे. तेव्हां, हबशी सोनबेट सोडून लोहबेटावर हल्ला करून गैरफायदा भांडत राहील, इतका कांहीं कच्चा दिसत नाहीं.

( एक जासूद येऊन मुजरा करून उभा रहातो. )

**राजा**—कांहीं नवी बातमी ?

**जासूद**—हबशी लोहबेटाची दिशा सोडून सोनबेटाकडे वळला, ही बातमी अगदीं खरी आहे. अशी परसोजीरावांची पायांपाशीं विनंती आहे.

**राजा**—तर मग हबशी सोनबेटावर जाणार यांत शंकाच नाहीं.

**१ मसलत०**—सरकार, मामासाहेब आणि झुंजारराव सरलष्करही आले.

**(मानाजीराव, झुंजारराव, जाधवराव, रंभाजीराव** वगैरे येऊन मुजरा करून उभे राहतात.)

**राजा**—सरलष्कर, आपला दुष्मान् हबशी, त्याच्याशीं झुंजायला खेंचा कंबर. या मानाजीराव, बसा. आजच्या प्रसंगीं आपला सल्ला जरूर पाहिजे होता.

**मानाजी०**—सरकार, बोलतों याची माफी असावी. मी मसलतगार या नात्यानं, किंवा राज्यावर कांहीं प्रसंग आला आहे, त्याची मला खबर लागली, ह्मणून कांहीं इथं आलों नाहीं. स्वतः माझ्यावर जो दुःखाचा गहजब उडाला आहे, त्यापुढें दुसऱ्या प्रसंगाची मला मुळींच मातब्बरी नाहीं.

**राजा**—काय झालं हो ?

**मानाजी०**—सरकार, माझी एकुलती एक मुलगी ! तिला जादूटोणा करून, भुरळ घालून, माझ्यापासून पळवून नेली ! तिच्या जन्माची माती केली सरकार ! जादूटोण्याशिवाय ही गोष्ट घडली नाहीं; कारण ती वेडी नव्हती, आंधळी नव्हती, का कोणत्याही गोष्टीनं व्यंग नव्हती.

**राजा**—हं ! असलं नीच राक्षसी कृत्य करणारा कोण-

सांगा पाहूं ? कुणाची मुरवत धरूं नका. खुद्द माझा मुलगा असला, तरी त्याला कानूबरहुकूम तुह्मी ठरवाल ती कडक शिक्षा देईन.

**मानाजी॰**—आणखी काय पाहिजे सरकार! या आपल्या झुंजाररावाचंच हें कृत्य.

( सर्व चकित होतात. )

**राजा**—( त्याच्याकडे पाहून ) फार दिलगिरीची गोष्ट आहे तर मग! झुंजारराव, तुमचं काय ह्मणणं आहे यावर ?

**झुंजार॰**—मेहर्बान खुदावंत, यांची मुलगी नेऊन मीं तिच्याशीं लग्न लावलं, ही गोष्ट अगदीं खरी. माझा गुन्हा काय तो एवढाच. सरकार, मी अडदांड गडी. मला मऊमिठास खुबीदार बोलणं बिलकुल माहीत नाहीं. कारण लहान सात वर्षांचा बच्चा होतों, तेव्हांपासून या हातांनीं फक्त रणमैदानांतली जोखमीची कामगिरी बजावली. ह्मणून लढाईशिवाय या दुनियेंतल्या दुसऱ्या गोष्टींविषयीं मी काय बोलणार! अर्थात् माझी बाजू कमजोर पडणारच. पण मेहर्बान ऐकून घेतील, तर तिच्या माझ्या दिललगीची सर्व हकीगत वेड्यावांकड्या शब्दांनीं मी कानावर घालतों; आणि दवा, जादूटोणा करून मी तिला भुरळ घातली असं हे ह्मणतात, त्याचाही खुलासा करतों.

**मानाजी॰**—जी सदा लाजरी, हाडाची गरीब, आणि इतकी मर्यादेची कीं, तिच्या मनांतला भाव ह्मणून स्पष्ट उमटायचा नाहीं; अशी मुलगी, आपला स्वभाव, वय, जातगोत, कांहीं न बघतां, या कोळ्यावर—या काळ्या कोळशावर—फिदा होईल तरी कशी ? पूर्वी नुसतं याच्या-

कडे पाहायलासुद्धां ती भीत असे. तें कांहीं नाहीं. मी अगदीं प्रतिज्ञेवर सांगतों, कीं यानं कांहीं जबरदस्त दवा, किंवा भारलेलं पाणी देऊन, तिला भ्रमिष्ट करून टाकली.

**राजा**—प्रतिज्ञेवर सांगणं हा कांहीं पुरावा नव्हे. पुराव्याला चांगलीं स्पष्ट अशीं प्रमाणंच पाहिजेत. उगीच पोकळ कल्पना काय उपयोगाच्या. झुंजारराव, विचारतों याचा जाब द्या. तुह्मी जादूटोणा, जुलूमजबरी करून तिला हस्तगत केलीत, किंवा तुमचीं परस्पर मनं जमून सरळ मार्गानं हा संबंध जुळला ? सांगा पाहूं.

**झुंजार०**—खुदावंतांनीं तिलाच इथें आणवून, यांच्यासमक्ष सर्व हकीगत विचारावी. तिच्या सांगण्यांत जर माझी कांहीं हरामखोरी आपल्याला दिसली, तर माझा हुद्दा काढून घ्यावा, इतकंच नाहीं तर, माझी गर्दन छाटली तरी मी राजी आहें सरकार.

**राजा**—ठीक आहे. आणवा तिला.

**झुंजार०**—जाधवराव, तुह्मीच तिला घेऊन या; आणि ती येईपर्यंत तिच्या माझ्या लग्नाची खरी हकीगत मी हुजुरांच्या कानावर घालतों. (जाधवराव जातो.)

**राजा**—सांगा पाहूं.

**झुंजार०**—(मानाजीस उद्देशून) यांचा माझ्यावर फार लोभ. ह्मणून हे मला वरचेवर घरीं बोलावून, लढाया, वेढे, तसंच माझ्यावर गुजरलेल्या बऱ्यावाईट प्रसंगांची हकीगत पुन्हा पुन्हा विचारीत; आणि मीही माझ्या लहानपणापासून यांनीं विचारल्या घटकेपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टींचा पाढा वाचीत असें. त्यांत मुख्यत्वेंकरून दुर्दैवानं मला दिलेले गोते, दर्यांत रणमैदानांत येऊन पडलेले दु-

धैर प्रसंग, किल्ला सर करतांना तटाच्या भगदाडांत बेशर्थ प्राण बचावणं, मस्त शत्रूंच्या हातीं लागणं, त्यांतून निसटून जाणं; तसंच मी प्रवासांत पाहिलेल्या मोठमोठ्या खाणी, खडक, अस्मान फोडून जाणारे उंच उंच पहाड; त्याचप्रमाणं भयंकर गुहा, ओसाड मैदानं, विजातीय मनुष्यभक्षक राक्षसी माणसं यांचं मी वर्णन करीत असें. या गोष्टी ऐकायला यांची मुलगीही मधूनमधून येऊन बसे. तिची फार उत्कंठा पाहून, एके दिवशीं तिनं एकटीनं माझी सर्व हकीगत ऐकावी, असा घाट मीं जुळवून आणला. सर्व हकीगत ऐकल्यावर तिला अतिशय दुःख झालं. ती ह्मणाली, खरोखर, ही फारच विलक्षण हकीगत, ऐकून द्रव येण्यासारखी; मीं ही ऐकली नसती तरी बरं झालं असतं. परंतु तिनं असाही उद्गार काढला, कीं ब्रह्मदेवानं माझ्याकरितां असा नवरा निर्माण केला असता तर फार चांगलं झालं असतं. सारांश, माझ्यावर गुजरलेल्या संकटांची हकीगत ऐकून तिचं माझ्यावर मन बसलं, आणि माझी कळकळ करणारा प्राणी हाच, हें पाहून माझंही मन तिच्यावर बसलं. हे काय ते सरकार माझे बीरमंत्र. ही आलीच ती. तिलाच आतां विचारावं ह्मणजे झालं.

( **कमळजा, जाधवराव** वगैरे येतात. )

**राजा**—अशी संकटाची व पराक्रमाची हकीगत ऐकून कुणाच्याही मुलीचं मन यांच्यावर बसलं असतं. हें पहा मानाजीराव, आतां 'नुसत्या हातापेक्षां-मोडकी तरवार बरी' या न्यायानं झाली हीच गोष्ट चांगली असं माना ह्मणजे झालं.

**मानाजी०**—तिचं ह्मणणं एकदां ऐकून घ्यावं अशी विनंती आहे. तिच्या खुषीनंच हा प्रकार झाला असेल, तर मी झुंजाररावाला काडीइतका सुद्धां दोष देणार नाहीं. देईन तर अधोगतीस जाईन. ये मुली, अशी इकडे. या मंडळींत तुला विशेष कोणाच्या आज्ञेप्रमाणं वागावंसं वाटतं? सांग पाहूं.

**कमळजा**—( चोहोंकडे पाहून ) दोघांच्या आज्ञेप्रमाणं वागावंसं वाटतं. आपण माझे वडील, आपण मला लहानाची मोठी केलीत, ज्ञान दिलंत, तेव्हां आपली आज्ञा मला प्रमाणच आहे. परंतु माझी आई जशी माहेरचीं माणसं सोडून आपल्या अंकित होऊन राहिली, तसं मलाही या झुंजाररावांचं अंकित होऊन राहिलं पाहिजे; आणि हा माझा धर्मच आहे; याच्या आड कोण येणार?

**मानाजी०**—झालं, आटपलं माझं काम, सरकार; आतां दरबारी कामाला सुरुवात व्हावी. ही कारटी झाली नसती तरी बरं होतं. अहो झुंजारराव, घ्या आतां ही तुमची स्त्री; मी मोठ्या संतोषानें तुमच्या स्वाधीन करतों. पोरी, मी मोठा सुखी, दैववान्, म्हणून मला दुसरी कारटी नाहीं. नाहींतर तुझ्या या गुणांनीं मीं तिला मात्र कोंडून ठेविली असती.

**राजा**—मानाजीराव, आतां उगीच खेद करूं नका. कारण उपाय खुंटले, म्हणजे दुःखच संपलं. झाल्यागेल्या गोष्टींचं दुःख करणं, म्हणजे नवीन दुःख उकरून काढणं होय. अहो, दैवच उलटल्यावर समाधानाशिवाय दुसरा मार्गच नाहीं. चोरी झाल्यावर हंसणं ह्मणजे

चोरालाच ठकविणं, आणि रडणं ह्मणजे स्वताहालाच नागवून घेणं, हीं गोष्ट ध्यानांत आणा.

**मानाजी०**—सरकार, असंच आहे, तर हबशी आपलं सोनबेट घेईनात? आपण त्यांच्याकडे पाहून हंसलं ह्मणजे झालं. मग कांहीं आपलं बेट गेलं नाहीं. तें कांहीं नाहीं सरकार, केवळ समाधानाच्या गोष्टी सांगून दुःखाचे घाव कसे बुजतील? शब्द ह्मणजे शब्दच.—असो, आतां कामाला आरंभ करावा.

**राजा**—झुंजारराव, हबशाचं अरमार कडेकोट तयारीनं सोनबेटावर निघालं आहे. तिथला ठाणेदार त्यांना दाद द्यायचा नाहीं; पण तुह्मी तिथले पुरे माहितगार, ह्मणून तुह्मालाच रवाना करायचं ठरलं. शिवाय हबशाला तुमचा दराराही विशेष आहे.

**झुंजार०**—बंदा तयार आहे सरकार. या गोष्टीचाच लहानपणापासून सराव असल्यानं, लढाईच्या मैदानांत नुसत्या फत्तरावर जरी निजलों, तरी पराच्या उंच उंच मऊ बिछान्यावर निजल्याप्रमाणं वाटतं. माझा स्वभावच असा बनून गेला आहे, कीं बिकट प्रसंग ह्मटले, कीं मला स्फुरण चढतं. सबब हुकुमाप्रमाणं जायला तयार आहें.

**राजा**—ठीक आहे; आज पहांटेस निघा तर. आणि तुमच्या कुटुंबाला, तुह्मी परत येईपर्यंत माहेरींच ठेवा ह्मणजे झालं.

**मानाजी०**—नको नको सरकार, तीं पीडा-माझ्या घरीं नको आतां.

**झुंजार०**—मलाही तसं करणं रास्त दिसत नाहीं.

**कमळजा**—आणि मीही आतां त्यांच्याजवळ राहायची नाहीं; कारण त्यांच्या डोळ्यांसमोर असल्यानं त्यांच्या जिवाला कांहीं सुख लागायचं नाहीं; उगीच नेहमीं त्रास मात्र करून घेतील. त्यांतून मीं धनदौलतीवर लाथ मारून, बाबासाहेबांच्या मताविरुद्ध, हा देह मनोभावानं यांना अर्पण केला, तो यांचा माझा निरंतर सहवास घडावा ह्मणून केला. लढाईचीं संकटं यांच्याबरोबर सोसायला मी तयार झालें. यांचं रूप पाहायचं तें मीं यांच्या अंतर्यामीं पाहिलं. आणि आतां जर मला एकटीला सोडून हे लढाईवर गेले, तर मग काय! ह्मणून मलाही बरोबर जायचा हुकूम असावा.

**झुंजार०**—खुदावंत! हिचा अर्ज मंजूर करावा अशी पायांजवळ विनंती आहे. स्वताहाच्या सुखाकरितां मी ही विनंती करीत नाहीं; फक्त हिची हौस पुरवावी हीच माझी इच्छा. आतां ही बरोबर असल्यानं, मी विषयविलासांत गुंग होऊन, माझ्या हातून नोकरींत कसूर झाली, तर शिपायाचा बच्चाच नव्हें.

**राजा**—ठीक आहे. झुंजारराव, हिला बरोबर न्या किंवा मागें ठेवा, पण आजच्याआज तुह्माला निघालंच पाहिजे.

**झुंजार०**—जी, हुकूम. (पडदा पडतो.)

(**झुंजारराव, पिलाजीराव, जाधवराव** वगैरे बाहेर येतात.)

**झुंजार०**—जाधवराव, तुह्मी तुमचा कबिला व आमचा कबिला घेऊन मागाहून या. नीट संभाळून. तुमच्याशिवाय-दुसरा कोणी विश्वासू नाहीं, ह्मणून तुह्माला सांगितलं, समजलांत?

**जाधव०**—ठीक आहे धनीसाहेब.

( **जाधवराव** व **रंभाजीराव** खेरीज सर्व जातात. )

**रंभाजी०**—जाधवराव—

**जाधव०**—काय ह्मणतां रंभाजीराव?

**रंभाजी०**—मी आतां काय करणार आहें समजलांत का?

**जाधव०**—काय बुवा? घरीं जाऊन स्वस्थ निजणार, हेंच कीं नाहीं?

**रंभाजी०**—छे! छे! छे! बलभीमतळ्यांत जाऊन एकदम जीव देणार.

**जाधव०**—असं कराल, तर आपली आमची कांहीं दोस्ती राहाणार नाहीं, सांगून ठेवतों. असे कसे हो तुह्मी अगदीं वेडे पीर?

**रंभाजी०**—अहो! प्राण जड झाल्यावर जिवंत रहाणं हाच वेडेपणा.

**जाधव०**—काय अघोर कल्पना ही! आज मला जन्मून सात चोक अठ्ठावीस वर्षं झालीं, आणि मला नफानुकसान कळायला लागल्यापासून मी पाहतों आहें, पण आपल्या प्राणाची खरी किंमत जाणणारा एकसुद्धां मर्द मला दिसला नाहीं. अरे! अरे! अरे! रंभाजीराव, मी तर सांगतों, कीं जनावर व्हायचं पत्करीन, पण एखाद्या बटकुलीकरितां "जीव देतों" हीं अक्षरं कद्धीं कद्धीं उच्चारणार नाहीं.

**रंभाजी०**—मग करूं काय? इतकं वेडाऊन जाणं शर्मेची गोष्ट आहे, मी कबूल करतों; पण प्राक्तनापुढें इलाज नाहीं.

**जाधव०**—प्राक्तन ! बोडक्याचं प्राक्तन ! अहो कांहीं करणं, वेडाऊन जाणं, न जाणं, हें आपल्या स्वताहाच्या मनावर अवलंबून आहे. आपलं शरीर हा मळा आणि मन हा त्यांतला माळी; हा त्यांत जसं खत पाणी घालील, जसं बीं पेरील, तसतशीं फळं येतील. त्याच्यावरची सर्व मालकी मनाची आहे. या जीवितरूपी तराजूला एक विचाराचं व दुसरं विषयवासनांचं अशीं दोन पारडीं आहेत. विचाराचं पारडं नसतं तर आपल्या विषयवासना प्रबळ होऊन कांहीं भलतंच झालं असतं. परंतु आपल्याला विचारशक्ति आहे, तिच्यायोगानं आपलं क्षुब्ध अंतःकरण स्थिर करतां येतं, अनिवार विषयवासना कमी करतां येते, आणि तुह्मी ज्याला प्रेम प्रेम ह्मणून ह्मणतां तें तरी यांतच येतं.

**रंभाजी०**—छे ! असं नाहीं व्हायचं.

**जाधव०**—नाहीं काय ? प्रेम ह्मणजे फक्त इंद्रियांची वासना आणि तिला मनाची संमति. या असे, अंगांत कांहीं मर्दाई धरा. तें सोडून जीव देतों ह्मणतां ? छे ! कुत्र्यामांजरांच्या पोरांनीं हवा तर जीव द्यावा. रंभाजीराव, मी तुमचा खरा स्नेही ह्मणवितों; आणि कसंही करून तुमचा इष्ट हेतु पार पाडायचा हा माझा निर्धार आहे. त्याची हल्लीं जशी संधि आली आहे, तशी कांहीं पुन्हा यायची नाहीं; फक्त पैशाचं बळ पाहिजे. चला, आमच्याबरोबर लढाईवर चला; कल्लेबिल्ले राखून चेहरा असा खुलवा कीं यौ: पण थैली भरा. (इकडे तिकडे पाहून) कमळजा झुंजाररावांवर फार दिवस फिदा होऊन राहील, असं व्हायचंच नाहीं—पण थैली—तसाच तोही राहायचा नाहीं.

अहो झटकन् जुळलं, तें तट्कन् तुटायचंच. पैसा मात्र तयार करा. झुंजाररावाचं मन बदलायचंच, हें मी तुह्माला खात्रीनं सांगतों. कारण आज त्याला जें अगदीं मेव्यासारखं मिठास लागतं, तेंच कांहीं दिवसांनीं कुटकीसारखं कडू लागेल ! तिलाही हा नवरा कुठून पत्करला असं होऊन, तरुण जवान पाहिलाच पाहिजे; अगदीं पाहिलाच पाहिजे. ह्मणून रावसाहेब, थैली भक्कम भरा. तुमचे प्राण तुह्माला जड होऊन टाकायचेच असले, तर तळ्यांत विहिरींत जीव देण्यापेक्षां, दुसरी एखादी नाजुकशी तरी शक्कल काढा. हें पहा, त्या भटकसिंग भामट्याचं, आणि त्या चटकचांदणीचं पोकळ प्रेम आमच्या हिकमतीनं धुळीस मिळालं, तर ती तुमची झालीच, असं समजा. पण पैसा ! भागूबाईसारखा जीव देतों ह्मणतां ! छे ! अगदीं गैर ! तिच्यापायीं फांशी गेलांत तरी बेहेत्तर, पण ती मिळत नाहीं ह्मणून मी ह्मणे जीव देतों, वाः ! काय बहाद्दरी !

**रंभाजी०**—बरं, पुढच्या आशेवर प्राण धरून राहिलों, तर तुमची तरी खंबिरी आहे का ?

**जाधव०**—माझ्याविषयीं तुह्मी अगदीं बेफिकीर रहा. चला, पैसा जमवा. मीं तुह्माला पुष्कळदां सांगितलं आहे; पुन्हा आणखी सांगतों, कीं त्या झुंजाऱ्यावर माझा पक्का दांत आहे; तुमचाही असायला कारण कमी नाहीं; ह्मणून तुह्मी आह्मी मिळून दावा उगवूं. त्याच्यापासून तिला उपटलीत, ह्मणजे तुमचीही चैन उडाली, आणि आह्मालाही गम्मत झाली. अजून काळाच्या पोटांत पुष्कळ गोष्टी आहेत, त्या सर्व बाहेर पडतीलच. चला आतां, आणि आधीं पैशाची तजवीज; जास्तकमी उद्यां बोलूं. रामराम.

**रंभाजी०**—पण उद्यां गांठ ?

**जाधव०**—आमच्या बिऱ्हाडीं. रामराम. पण, अहो, अहो रंभाजीराव, जीव द्यायची गोष्ट पुन्हा नाहीं काढायची. ऐकलंत का ?

**रंभाजी०**—छे हो ! आतां कोण जीव देतो. तो बेत फिरला. आतां जाऊन जमीनजुमला, डागडागिने सर्व विकून रक्कम गोळा करतों.

**जाधव०**—शाबास ! हरकत नाहीं. रामराम. ( रंभाजी जातो. )

( तो गेला असें पाहून मोठ्यानें हंसून, )

—या वेड्यांना फसवून नेहमीं अशी मी आपली तुंबडी भरतों ! रास्तच आहे; धड नफाही नाहीं आणि गम्मतही नाहीं, आणि अशा बैलांच्या नादीं लागून जर वेळ गमावली, तर आजपर्यंत आह्मीं कमावलेल्या अकलेचा उपयोग काय ? झुंजाररावाशीं तर आमचा उभा दावा. ही स्वारी आमच्या बिछान्यांत घुसल्याची, बाहेर भुमका आहे. हें खरंच आहे असं ह्मणवत नाहीं, परंतु मी तसं धरून चालणार. त्याचा आपल्यावर विश्वास चांगला आहे, हें एक त्याच्यावर डावपेंच चालवायला नामी साधन आहे. पिलाजीरावही सुरेख देखणा आहे. कसं ? कसं ? पाहूं— ( विचार करून ) एक त्याचा हुद्दा मिळवायचा, आणि दुसरं आपला मतलब साधायचा, अशी दुहेरी लुच्चेगिरी लढवायची; कसं बरं ? हां ! कांहीं दिवसांनीं झुंजाऱ्याचे कान-असे भरायचे, कीं तुझ्या बायकोची आणि पिलाजीरावाची फार सलगी आहे, त्याचाही रंगेल चेहरामोहरा, अशा संशयाला ठीक आहे. त्याला पाहून बायका

बिघडायच्याच. झुंजारराव तर मनाचा इतका भोळा आहे, कीं ढोंग्याला सुद्धां तो इमानी समजतो. तेव्हां त्याचे कान धरून मी त्याला गध्यासारखा आस्ते आस्ते हवा तसा वळवीन. जुळलं—मनांत तर उतरलंच. आतां अजब करणी करून जगापुढें आणायचं, एवढं आपलं काम! (जातो.)

(पहिला अंक समाप्त.)

---

# अंक २ रा.

## प्रवेश पहिला—सोनबेटांतील एक बंदर.

(**हिम्मतराव** आणि **कानाजी** येतात.)

**हिम्मत०**—या टोंकावरून समुद्रांत कांहीं दिसतं का?

**कानाजी**—छे:, खालीं तुफान दर्या, आणि वर अस्मान, शीडबीड कांहीं नाहीं.

**हिम्मत०**—या वादळानं जमिनीवर काय कल्होळ उडवून दिला असेल. हा किल्ला अशा तुफान वादळांत पूर्वीं कधींच सांपडला नव्हता.

**कानाजी**—असे इथून पहा, या लाटा जशा काय चवताळून ढगांना बडिवताहेत. इतका खवळलेला दर्या आपण नव्हता पाहिला.

**हिम्मत०**—हबशाचं अरमार चांगल्या आश्रयाच्या जागीं नसलं, तर बुडालंच ठार. अशा अस्मान लाटांच्या तडाक्यांत काय टिकतं.

(**हिरोजी** येतो.)

**हिरोजी**—(आनंदानं आंतून ओरडत) दोस्त, ऐका,

ऐका! या जंगी वादळानं हबशाचं अरमार सफा झोडपून काढलं! आतां काय लढणार तो? वेणीपूरच्या एका गलबतानं हें प्रत्यक्ष पाहिलं. त्याच गलबतांतून झुंजाररावांचे मुतालीक पिलाजीराव बंदरावर उतरले. झुंजारराव मागून येताहेत; कारण त्यांना इथल्या सरलष्करच्या हुद्यावर नेमलं आहे.

**हिम्मत०**—फार नामी झालं. झुंजाररावाच्या हाताखालीं मी होतों कांहीं दिवस; सरलष्करीलायक शिपाई!

( **पिलाजीराव** येतो. )

**पिला०**—( राम राम झाल्यावर ) वाहवा! तुमच्या तोंडानं झुंजाररावांची तारीफ ऐकून खुष झालों.

**हिम्मत०**—त्यांचं जहाज चांगलं मजबूत आहे ना?

**पिला०**—जहाज खंबीर असून, तांडेलही कसलेला मनुष्य आहे; ह्मणूनच इतकी भीति वाटत नाहीं.

( **सिदोजी** येतो. )

**सिदोजी**—आणखी एक गलबत आलं, त्याच्यावरून सलामीच्या तोफा सुटताहेत; बहुतकरून दोस्त असावेत आमचे.

**पिलाजी०**—तर मग सरलष्करच आले; पाहून या.

( **सिदोजी** जातो. )

**हिम्मत०**—त्यांचं लग्न झालं आहे का हो?

**पिलाजी०**—हो; आणि त्यांच्या नशीबानं त्यांना असं कुटुंब मिळालं आहे, कीं तिची तारीफ करतांना कवीचीही लेखणी थकेल; आणि तिचं स्वाभाविक सौंदर्य पाहून, कसाही कुशल चितारी असला, तरी हात टेंकील. ( सिदोजी परत येतो त्यास ) का हो? कोण?

**सिदोजी**—सरलष्करांचे निशाणवाले, जाधवराव.

**पिलाजी०**—वाः, त्यांनीं तर खुप दौड केली बुवा; असं भयंकर तुफान, खवळलेला समुद्र, सोसाट्याचा वारा आणि मोठमोठे खडक, यांना सुद्धां सौंदर्याची चांगली परीक्षा आहे असं वाटतं; ह्मणून त्यांनीं जातिस्वभाव विसरून कमळजाबाईंना मार्ग दिला.

**हिम्मत०**—कमळजाबाई कोण ?

**पिलाजी०**—मीं आतां सांगितलं त्या—सरलष्कराचं कुटुंब. परमेश्वरा ! वाऱ्याला अनुकूळ करून त्यांचं गलबत सुखरूप आण, माईसाहेब त्यांना कडकडून भेटूं-देत, आमचा धीर खचला आहे तो पुन्हा येऊं दे आणि इथल्या रहिवाशांना सुखी कर, एवढं मागणं आहे. ही पहा, समुद्रलक्ष्मी किनाऱ्यावर आली. (सर्व लवून मुजरा करतात.) माईसाहेब, ईश्वरी कृपेचं चक्र आपल्याभोंवतीं सार्वकाळ फिरतं राहो !

**कमळ०**—पिलाजीराव, अगोदर स्वारींची काय खबर ती सांगा ?

**पिलाजी०**—अद्याप आले नाहींत, पण खुशाल आहेत; आणि लवकरच येतील.

**कमळ०**—(बसून) पण तुमची चुकामूक कशी पडली ?

**पिलाजी०**—असानाच्या आणि दर्याच्या झटापटींत चुकामूक पडली. पण ऐका, गलबत आलं वाटतं, सिदोजी, जा पाहून या बरं कुणाचं तें. (सिदोजी जातो.) जाधवराव, खुशाल ? सारजाबाई ठीक आहेना ? जाधवराव, कुटुंबाशीं बोललों ह्मणून घुस्सा नाहींना ?

**जाधव०**—छे ! पण कधीं कधीं ती आमच्यावर जितकं तोंड सोडते, तितकं जर तुमच्यावर सोडील, तर पुरे पुरे होईल तुह्माला.

**कमळ०**—भलतंच. तिला तर मुळींच बोलायला नको.

**जाधव०**—काय सांगू माईसाहेब, रात्रीं मला झोंप सुद्धां घेऊं देत नाहीं; एवढं खरं, कीं आपल्यापुढं मात्र तिची टकळी चालत नाहीं.

**सारजा**—उगीच कांहींतरी बोलावं झालं.

**जाधव०**—या, मागं का ? अशा पुढें या. तुह्मी बायका ह्मणजे—

कवित.

बाहिर असतां चित्रें जैशा ॥ घरांत घंटा बोलति खाशा ॥ १ ॥
चुलीजवळि जणुं जंगली भाल्या ॥ दुःख द्यावया उदार बेल्या ॥२॥
कुणीं दुखवितां डाकिणी केवळ ॥ घरकामीं बहु टंगळमंगळ ॥ ३ ॥
सुगर मात्र तुह्मि एक्या कामीं ॥

**कमळ०**—चला ! निंदखोर कुठले !

**जाधव०**—खोटं नव्हे माईसाहेब.

**सारजा**—पण माझ्यावर नको एवढं कवित करायला.

**कमळ०**—जाधवराव, माझ्यावर कवित करा ह्मणून सांगितलं, तर कसं कराल बरं ?

**जाधव०**—मेहेरबानी करून तेवढं नका सांगू माईसाहेब; कारण माझ्या कवितांत निंदेशिवाय कांहीं मिळायचं नाहीं.

**कमळ०**—पहा तर खरं करून. (पिलाजी रावास) पण स्वारींचा तपास काढायला गेलं का कुणी ? (एकीकडे)

मला आज कांहीं चैन पडत नाहीं. आपली वरवर हंसून-खेळून वेळ घालवितें. जाधवराव, करतांना कवित?

**जाधव०**—होय, त्याच विचारांत आहें. क–वी–त. हं, ऐका माईसाहेब, कवि काय ह्मणतात तें,—

### ओवी.

चतुर आणि वर्णें गोरी ॥ ऐसी उपवर जी सुंदरी ॥
ती साजे ऐसा भर्ता वरी ॥ चातुर्याची गोष्ट हे ॥ १ ॥

**कमळ०**—खासं वर्णन! बरं, काळी कुरूप असून चतुर असली तर?

**जाधव०**—

काळी कुरूप आणि चतुर ॥ ऐसी होय जी का नार ॥
शोधोनि काढी ती गोरा वर ॥ निजरूपा जोगता ॥ २ ॥

**कमळ०**—तुह्मी तर अधिकच घसरायला लागलां.

**सारजा**—बरं, सुंदर गोरीपान असून साधीभोळी असली तर?

**जाधव०**—

### अभंग.

सुंदर गोरी असतां भोळी ॥ नाहीं होणें ऐशी मुळीं ॥ १ ॥
कारण ऐशा भोळ्यागुणें ॥ मिळे नवरा धनवान् जाणें ॥ २ ॥

**कमळ०**—हें असलें कवित, चंगीभंगी छाकट्या लोकांना हंसवायला फार चांगलें. बरं, कुरूप असून जी साधीभोळी असते, तिच्याविषयीं आपलं काय ह्मणणें आहे, सांगा पाहूं?

**जाधव**—ऐका,—

कुरूप साधीभोळी जरी ॥ सुंदर चतुरांचिच कृति करी ॥ ३ ॥

**कमळ०**—काय अंधार हा! तुम्ही आपले खापरीला

हिरकणीचं मोल लावतां! बरें, जी स्त्री आपल्या सद्गुणांच्या जोरावर प्रत्यक्ष निंदेलाच असें म्हणते, कीं माझ्यांत कांहीं व्यंग असलें तर काढ, अशा साध्वी माउलीविषयीं आपला काय प्रकाश पडतो पाहूं बरं?

**जाधव०**—

सुंदर असतां न धरी ताठा ॥ न करी वाचेचा बोभाटा ॥ ४ ॥
असतां अगणित लक्ष्मी घरीं ॥ नटणें ठावें नाहीं तरी ॥ ५ ॥
जरी इच्छा झाली कांहीं ॥ तरी समयासमया पाही ॥ ६ ॥
कोप कोणाविषयीं आला ॥ विवेकानें वारी त्याला ॥ ७ ॥
हिरा टाकुनी गोटा घेणें ॥ ऐसें नाहीं जीचें करणें ॥ ८ ॥
गुप्त ठेवी, जे अंतरीं ॥ जरी जन्मे ऐसी नारी ॥ ९ ॥

**कमळ०**—तर काय?

**जाधव०**—तर काय!

तिणें पाजित जावीं पोरें ॥ किंवा घालावें पोतेरें ॥ १० ॥

**कमळ०**—अहा! काय पण खासं तात्पर्य काढलें! सारजाबाई, तुम्ही नका हो यजमानाचं ऐकत जाऊं. कां पिलाजीराव, ऐकलंतना पांडित्य?

**पिलाजी०**—माईसाहेब, तिथं कांहीं आंतबाहेर नाहीं; ओघाला येईल तें स्पष्ट बोलायचं. शिपाई आहेत, इतकं लक्षांत घेतलं म्हणजे झालं. (कांहीं हळू हळू कुजबुजतात.)

**जाधव०**—(आपल्याशीं) वा:! इतकी सलगी! चांगल्या कानगोष्टी चालल्या आहेत; तसंच हंसा. बरं आहे! पिलाजीराव, या तुझ्या सलगीच्या नाजुक जाळ्यांतच तुझ्या तंगड्या गुंतवून टाकतों तर होय म्हण! (शिंग ऐकून उघड) धनीसाहेब आले वाटतं.

**कमळ०**—खरेंच का? चला तर, सामोरीं जाऊं.

**पिलाजी०**—हे पहा आलेच!

( **झुंजारराव** येतो, परस्पर आलिंगन देतात. )

**झुंजार०**—वाहव्वारे मेरे बहाद्दर! लाडके, तूं अघाडी साधलीस हें पाहून मला जितका आनंद तितकाच अचंबा वाटतो. शाबास! प्रत्येक तुफानाचा असाच जर गोड परिणाम होईल, तर आकाशपाताळ एक करून सोडणारीं अशीं किती का तुफानं सुटेनात; दर्यांतलीं जहाजं प्रचंड लाटांच्या शिखरावरून उंच असमानांत जाऊन, तिथून खालीं पाताळांत पडलीं तरी चिंता नाहीं. अहाहा! मृत्यु यायचा तर अशांत यावा; कारण असा सौख्याचा दिवस पुन्हा कधीं उगवायचा नाहीं.

**कमळ०**—हें काय भलतंच बोलणं पण! आई जगदंबे! आमच्या प्रेमाला भरतं येऊन आह्मी वाढत्या सुखांत नांदावं, एवढं देणं दे.

**झुंजार०**—जगदंबे असंच कर! छे! आज आनंदाचा कळस झाला. गळा दाटून शब्दसुद्धां निघत नाहीं. लाडके, ( चुंबन घेण्यासाठीं तिची हनुवटी धरून ) तुझ्या माझ्यांत पुढं कलह व्हायचा असेल तर हाच, हाच कलह!

**जाधव०**—( बाजूस ) शाबास! खूपच रंग जमला आहे! पण या रंगाचा बेरंग करीन तरच मी नांवाचा जाधवराव! शिवाय—इमानी तो इमानी!

**झुंजार०**—चला आतां किल्ल्यांत जाऊं. दोस्त, हबशाचं अरमार बुडून फस्त झाल्यानं लढाईच आटपली. इथली आमची सर्व दोस्तमंडळी खुशाल आहे.ना?. लाडके, इथल्या लोकांची माझ्यावर किती भक्ति आहे हें

पहा आतां. अशा मेजवान्यांवर मेजवान्या झडतील, कीं तुला फुरसत नाहीं सांपडायची; बरं जाधवराव, बंदरावर चला आणि माझं सामानसुमान उतरण्याची व्यवस्था लावा. (रामराम करून **जाधवराव** जातो, त्याच्या मागून **रंभाजीराव** जातो.) लाडके, चल आतां. (सर्व जातात.)

## प्रवेश दुसरा.

(**जाधवराव** व **रंभाजीराव.**)

**जाधव०**—ऐका, हलकट लोक प्रेमपाशांत सांपडले, ह्मणजे त्यांच्या आंगांत जास्त थोरपणा येतो असं ह्मणतात; तशी तुमच्या आंगांत जर हिम्मत असली, तर मी सांगतों तेवढं ऐका. आज रात्रीं पिलाजीराव स्वतः चौकीपहाऱ्याचा बंदोबस्त पहाणार आहेत; तेव्हां—हो पण ही गोष्ट तुह्माला अगोदर सांगितली पाहिजे, कीं कमळजा पिलाजीरावाशीं लागू आहे.

**रंभाजी०**—पिलाजीरावाशीं! कमळजा! अगदीं झूट आहे.

**जाधव०**—(आपल्या तोंडावर बोट ठेवून) गोष्ट फोडायची नाहीं कुठें, सांगतों तें नीट ऐकून घ्या. अहो, फक्त झुंजाररावाच्या लंब्यालंब्या अजब थापा ऐकून, ती त्याला एकदम भाळली, ह्मणून अजून सुद्धां नुसत्या थापांवरच खुष होऊन राहील? तिच्या डोळ्यांचं तर समाधान झालं पाहिजे ना? पण या घुबडाकडे पाहून समाधान व्हावं कसं? एकदां विषयवासना थंड पडल्यावर, तिला पुन्हा चेतवायला दोघांच्याही वयांत काय, रूपांत काय, आचारांत काय, विचारांत काय, चांगलाच मेळ पाहिजे. पण

इथें सगळा उलटा प्रकार—ती रंभा आणि हा राक्षस! तेव्हां त्याच्याशीं लग्न केल्यानं आपल्या सुंदर नाजुक नवतीची माती झाली, असं वाटून तिला त्याचा किळस येणं साहजिक आहे. आणि एकदां त्याच्यावरचं मन उडालं, ह्मणजे अर्थात तें दुसऱ्यावर बसलंच पाहिजे. ही गोष्ट जर बिनतक्रार कबूल आहे, तर महाराज, आपणच सांगा, कीं तिच्या मनांत भरण्यासारखा भाग्यवान् गडी, पिलाजीरावाशिवाय दुसरा कोण? कारण, तो मनुष्यच तसा आहे. अट्टल सोदा, उत्तम बोलका, बडा ढोंगी, पक्का थापेबाज, पुरा इष्की, मोठा धोरणी. बेट्याची नजर तरी काय! नसतीच गोष्ट मनांत भरवून देणारा. बिलंदर असामी! इतकं असून पुन्हा खपसुरत, भरज्वान! तात्पर्य—साळ्याभोळ्या अल्लड पोरींना भुलवायला जे गुण पाहिजेत, ते स्वारींत पूर्ण भरलेले आहेत. अशा राजश्रीबरोबर ती कधींच संधान जुगवून पार झाली! आहांत कुठें?

**रंभाजी०**—छे, असं करीलसं वाटत नाहीं. तिचं मन ह्मणजे शुद्ध गंगाजळ आहे.

**जाधव०**—बोडक्याचं गंगाजळ! ती कांहीं स्वर्गींतून उतरली नाहीं. तसं असतं, तर त्या माकडावर का फिदा झाली असती? पिलाजीरावाचा आणि तिचा लघळपणा चालला होता, तो नाहीं वाटतं पाहिलात?

**रंभाजी०**—हो पाहिला. पण त्यांत काय?

**जाधव०**—त्यांत काय? मदनमहाराजांचं बिनीचं निशाण हें—कुकर्माचा पहिला पाया हा, समजलांत! रंभाजीराव, आतां तुह्मी माझ्या धोरणानं चला; कारण मीं तुह्माला इथें आणलं आहे. आज रात्रीं मी तुह्माला

माझ्या हुकमतीनं पहाऱ्यावर नेमतों. तुह्मी कोण हें कांहीं पिलाजीरावाला माहीत नाहीं. मीही आसपास कुठें तरी असेन. पिलाजीराव पहाऱ्याच्या देखरेखीला आला, ह्मणजे मोठ्यानं ओरडून म्हणा, अगर त्याच्या बंदोबस्तांत कांहीं खोड काढून म्हणा, किंवा दुसरी वाटेल ती कुरापत काढून तो खूप संतापेल असं करा.

**रंभाजी०**—ठीक आहे; हें माझं काम.

**जाधव०**—पण स्वारी फार तापट आहे बरं. हां हां म्हणतां चवताळेल; आणि एकदां चवताळला म्हणजे हातघाईवर सुद्धां येईल. आला तरी बेहेत्तर, पण इतकं कराच. कारण एवढ्यावरून देखील मी या बेटांत बंडावा उत्पन्न करून त्याला बरतर्फ करवीन. तो बरतर्फ झाला, म्हणजे तुमचं काम फत्ते. कारण आज तुमच्या कामाला काय ती त्याचीच आडकाठी कीं नाहीं ? तेवढी निघाली कीं चालला आमचा हात. म्हणून एवढं कराच.

**रंभाजी०**—करीन, पण संधि आली पाहिजे.

**जाधव०**—अहो संधि येणारच. बरं चला आतां, मी बंदरावर जातों. मग किल्ल्यांत भेटा—रामराम.

**रंभाजी०**—रामराम. (जातो.)

**जाधव०**—पिलाजीराव तिच्यावर फिदा आहे यांत शंकाच नाहीं; बरें ती त्याच्यावर फिदा आहे हीही गोष्ट जुळण्यासारखी आहे. आतां तो झुंजारराव—माझा दुष्मान् तरी खंबीर, प्रेमळ आणि उदार मनाचा आहे; त्याचं तिच्यावर निश्चळ प्रेम राहणार, यांत शंका नाहीं. माझाही तिच्यावर डोळा आहे, पण तो नुसता इष्काकरितां नव्हे—त्यांत थोडा सूडही साधायचा आहे. कारण

त्या मस्त झुंजाऱ्यानं आमच्या घरांत कांहीं खटपट केल्याचा मला वहीम येतो. या गोष्टीचं स्मरण झालं म्हणजे जहर खाल्ल्याप्रमाणं सर्वांगाची आग आग होते. म्हणून बायकोस बायको घेऊन, त्याला माझ्या पंक्तीला आणवून बसवीन, तेव्हांच ही आग विझेल. कदाचित् हें साधलं नाहीं, तर निदान त्याच्या मनांत बायकोविषयीं असा संशय तरी भरून देईन, कीं त्याची अक्कल गुंग होऊन जावी. हा कावा पार पडायला, हें रंभ्या कुत्रं मात्र माझ्या हातांत टिकलं पाहिजे, म्हणजे पिल्याची भंबेरी उडिवलीच ! एकदां कचाट्यांत सांपडल्यावर मग काय ! झुंजारराबापाशीं त्याची हवी ती नालस्ती करीन, झुंजाऱ्याला पाहिजे तसा गाढवासारखा वळवीन, त्याचं मन चिथावून त्याला वेडा बनवीन, आणि इतकंही करून, उलट त्याच्याचकडून वाहवा मिळवीन. हें सर्व मनांत उतरलं; पण अजून गोंधळ आहे जरा. ठकबाजीचं खरं रूप ती लढवून पाहिल्यावांचून दिसत नाहीं. ( जातो. )

## प्रवेश तिसरा.

**दौंडीवाला**—( बाहेर येऊन ) यहांके तमाम लोगोंको जाहिर किया जाता है, के दुष्मन् हबसीका आरमार बडे तुफानके मारे दर्यामें डुब गया, यह खबर अभी पहूंची; इसवास्ते सब लोगोंने बहोत खुशीसे गानेखानेमें अगर दिलचाहे उस मजेमें आजकी रात गुजारना वसा सरलष्कर साहबका हुकम है. ( जातो. )

## प्रवेश चवथा.

**( झुंजारराव व पिलाजीराव. )**

**झुंजार०**—आज रात्रीं पहाऱ्याच्या बंदोबस्तावर

तुम्ही स्वतः चांगली हुषारीनं नजर ठेवा. चैनींत गुंग होऊन बेताल न होण्याची आपणच आधीं खबरदारी राखली पाहिजे.

**पिलाजी**०—जाधवरावाला ताकीद दिलीच आहे; शिवाय मीही नजर ठेवतों.

**झुंजार**०—हरकत नाहीं; जाधवरावही आमच्या खात्रीचा आहे. उद्यां लवकर या; कांहीं बोलायचं आहे.

( **झुंजारराव** जातो, नंतर **जाधवराव** येतो. )

**पिलाजी**०—बरे आलांत; चला पहाऱ्यावर जाऊं.

**जाधव**०—इतक्यांत ! अजून दहा घटका सुद्धां रात्र झाली नाहीं. सरलष्करसाहेबांनीं आम्हाला रजा दिली हें रास्तच. कारण—प्रेमांतलं—कुटुंब आहे; पण याबद्दल त्यांना कांहीं नाहीं दोष द्यायचे आपण.

**पिलाजी**०—त्या आहेतच तशा खपसुरत; सौंदर्याचा अगदीं कोंवळा लुसलुशीत कोंब आहे !

**जाधव**०—आणि डोळ्यांत तरी काय चमक—जहर भरलं आहे नुसतं !

**पिलाजी**०—नजर मनोहर खरीच; पण मला वाटतं, फार मर्यादेची.

**जाधव**०—तसंच भाषणसुद्धां अगदीं मदनाची तुतारी, नाहीं ?

**पिलाजी**०—त्यांच्यांत व्यंग असं कोणतंच नाहीं.

**जाधव**०—नशीबवान् आहेत, मारूं देत मजा. बरं चला; मी उत्कृष्ट शराब आणिवली आहे, ती घेऊं आपण; आणि इथले दोघे शूर मर्द बाहेर आहेत, त्यांनाही सरलष्करसाहेबांच्या नांवानं झोकूं द्या थोडी.

**पिलाजी०**—छे जाधवराव! आज तर नकोच. आणि या कामांत मी फार ढिला आहें. शराब पाजविण्यापेक्षां चैनबाजीची दुसरी कांहीं तऱ्हा निघाली असती, तर फार चांगलं झालं असतं.

**जाधव०**—अहो ते आपले दोस्त आहेत; फक्त एक पेला? तुमच्याबद्दल मी घेतों, झालं?

**पिलाजी०**—हें काय बरं; मला नका आग्रह करूं. मी संध्याकाळीं बरंच पाणी मिसळून एवढीशी घेतली होती, पण तितक्यानंच इथें काय तरंगावर तरंग चालले आहेत. या ढिलेपणापुढें इलाज नाहीं, काय करूं?

**जाधव०**—काय बोलता राव! आजची रात्र तर मौजेची. जिकडे तिकडे काय चैन चालून राहिली आहे. त्यांनाही पाहिजे, बघा—

**पिलाजी०**—कुठें आहेत ते?

**जाधव०**—ते, दरवाज्याबाहेर—बोलवा त्यांना आंत.

**पिलाजी०**—बोलावतों. पण आपल्याला नाहीं हें पसंत. (जातो.)

**जाधव०**—(त्याच्याकडे पहात) स्वारींनीं थोडी घेतलीच आहे; आणखी थोडी पाजिवली, कीं त्या आमच्या कुऱ्यासारखे, जरा चिडिवल्याबरोबर, भों भों करायला लागतील. दुसरे झुरणीस लागलेले आमचे वेडे पीर रंभाजीराव, कमळजेच्या नांवानं दारू झोकून तयार झाले आहेत; ते आज पहाऱ्यावर. तिसरे हे तल्लख जवान, त्यांना मान म्हणजे प्राण आहे आपला; शिवाय या बेटांतल्या पुंडांचे नाईक, त्यांनाही मी आज खूप दारू पाजिवली आहे. तेही पहाराच करणार—

( पडद्यांत मोठा हंशा होतो, तिकडे बोट दाखवून.)

आतां या छाकट्यांत पिलाजीरावाकडून असा कांहीं तरी घोटाळा करवायचा, कीं सगळं बेटचंबेट खवळून जाईल—आलेच हे. स्वप्नाप्रमाणेंच सर्व जुळल्यावर मग काय ! आमचं तारूं चाललं सूं.

( **पिलाजी, परसोजी** वगैरे येतात. )

**जाधव०**—कोन् है ? छोकरा, शराबकी शिशी लाव.

( दारू आणल्यावर **जाधवराव पिलाजीरावा**स पेला भरून देतो.)

**पिलाजी०**—सुरुवातीलाच इतकी ?

**परसोजी**—एक पेला कांहीं फार नाहीं.

**जाधव०**—छोकरा, आणखी आण. ( गातो. )

**पद.** ( " काली बिल्लीनें " या चालीवर. )

पिवो पिवो सिपाइ ओ शराब् पिवोजी ॥ ध्रु० ॥
कल क्या होवे कुइ ना जाने, आज घडी अपनी ॥
खाना पीना इस दुनियाकी मजा लेवोज़ी ॥ १ ॥

**पिलाजी०**—खाशी जाधवराव ! वाः कुठें शिकलां हें ?

**जाधव०**—फिरंगी चुटका आहे हा; तिथले लोक शराबबाजींत बडे पटाईत. त्यांचा हात धरणार कोणी नाहीं.

**पिलाजी०**—( किंचित् झिंगून ) इतके वस्ताद आहेत का ते ?

**जाधव०**—तें काय विचरतां ! त्यांना पितांना बघून तुम्हाला ओकारी येईल; घ्या.

**पिलाजी०**—हा सरलष्करांच्या नांवानं.

**परसो०**—घ्या. मीही घेतों.

**जाधव०**—(गातो.)

**पद.** ("भूपती खरे ते" या चालीवर.)

पुण्याइ थोर शिव छत्रपती राजाची ।
चौमुलुखिं फडकला झेंडा तारिफ अकलेची ॥ ध्रु० ॥
गडकोट जंजिरे बघुन रोख चढवीले ।
कुलपादशाइ सरदार रणिं जेरिस आणिले ॥
स्थापिली गादि हिंदूची । रायगडीं ।
मोडिली खोड यवनांची । रोकडी ।
राखिली गाय धर्माची । बापुडी ।
कलिमूर्ति जन्मली संभाजी नवसाची ।
धुळदाण उडविली संगत कलुशाची ॥ १ ॥

—छोकरा, और शराब लाव—

**पिलाजी०**—हा चुटका तर त्याहीपेक्षां चांगला आहे.

**जाधव०**—पुन्हा ह्मणूं ?

**पिलाजी०**—(झिंगत) न्—नको; त्या संभाजीचं नांव नको ऐकायला. भगवान् सर्वसाक्षी आहे. कांहीं माणसं पुण्यवान्, आणि कांहीं पापी; पापी तीं नरकांत पडायचीं.

**जाधव०**—खरं आहे मुतालिकसाहेब.

**पिलाजी०**—आमचे धनीसाहेब तर नाहींतच, पण मी सुद्धां नरकांत नाहीं पडायचा.

**जाधव०**—मीही नाहीं पडायचा.

**पिलाजी०**—बरं चला कामावर जाऊं. भगवान्! क्षमा कर. मला कांहीं कैफ नाहीं चढला. . हे निशाण-वाले, हा माझा डावा हात, हा उजवा; मी शुद्धीवर आहें. हा पहा उभा राहिलों. बोलणं सुद्धां साफ–सूं-साफ!

**जाधव०**—फार साफ, मुतालिकसाहेब.

**पिलाजी०**—मग जू-जा-जातों तर; मी धुंदींत नाहीं स्-समजलां ? (पडत धडपडत जातो.)

**परसो०**—चला आपणही जाऊं पहाऱ्यावर.

**जाधव०**—हे पाहिले पिलाजीराव ! शिपाई ह्मणजे असा बाका आहे, कीं दुसरा तानाजी. पण काय, या दुर्व्यसनानं गुणाची माती झाली. जितका गुण तितकाच दुर्गुण. वाईट वाटतं पण नाइलाज. सरलष्करांचा पूर्ण विश्वास आहे, परंतु एखादे दिवशीं अशा गुंगींत या बेटांत काय घोटाळा उडवील कोण जाणे.

**परसो०**—घेतात तरी केव्हां केव्हां ?

**जाधव०**—रात्रीं. त्याशिवाय झोंपच नाहीं याचची. बारान् बारा चोवीस तास जागत काढतील.

**परसो०**—ही गोष्ट सरलष्करांना कळिवलेली बरी. कदाचित् त्यांना माहित नसेल, अथवा त्यांचा दिल थोर असल्यामुळं ते यांच्या शिपाइगिरीवर खुष होऊन या व्यसनाकडे कानाडोळा करीत असतील. असंच कीं नाहीं ?

(**रंभाजी** येतो.)

**जाधव०**—(त्याच्याकडे पळत जाऊन.) कसं काय ? चला पिलाजीरावाच्या पाठोपाठ चला. (त्याला ढकलत) चला, चला आधीं.

(**रंभाजी** जातो.)

**परसो०**—शिवाय मुतालिकीसारखा जोखमीचा हुद्दा अशा ढिल्या माणसाकडे ठेवणं हें सरलष्करसाहेबांनाही धोक्याचं आहे; आणि असं त्यांना सांगणं कांहीं गैर नाहीं.

**जाधव०**—हें सगळं सोनबेट मला जहागीर दिलं, तरी माझ्या हातून ही गोष्ट व्हायची नाहीं. यापेक्षां, पिलाजीराव माझे दोस्त आहेत, तेव्हां त्यांना ताळ्यावर आणण्याची मी खटपट करीन. पण ऐका, हा कल्ला कसला?

पडद्यांत–"धांवा! धांवा! मेलों हो!"

( पुढें **रंभाजी** त्याच्या पाठीस लागलेला **पिलाजी** येतात )

**पिलाजी०**—अरे लुच्चा! गधड्या!

**परसो०**—काय–काय झालं मुतालिकसाहेब?

**पिलाजी०**—चोर कुठला! मला अक्कल शिकवितो. हड्डी नरम करून कणगींत कोंबीन.

**रंभाजी०**—माझी हड्डी?

**पिलाजी०**—बेवकूब! पुन्हा तोंड करतो. (त्यास मारतो.)

**परसो०**—जाऊं द्या, सोडा मुतालिकसाहेब. (धरतो.)

**पिलाजी०**—खबरदार अडवाल तर, नाहींतर तुमचेंही दाताड पाडीन.

**परसो०**—वाः, खूप बनलां आहांत!

**पिलाजी०**—कोण? मी? मी बनलों आहें. (दोघांची झुंपते.)

**जाधव०**—( रंभाजीच्या कानांत ) चला चला, बंड ह्मणून ओरडा–जा. (तो जातो.) पिलाजीराव! हां–हां–सोडा, परसोजीराव काय हें? अहो धांवा; धांवा–मुतालिकसाहेब–तुह्मी तरी–परसोजीराव! छे! छे! कुणी धांवा. वाः! खासा पहाऱ्याचा बंदोबस्त! (आंत भयाचें शिंग

वाजतें.) शिंग कोण वाजवितो? झालं, शहरभर कल्लोळ माजणार. काय हें मुतालिकसाहेब? गम खा–जन्माची काळोखी लागेल.

(**झुंजारराव** येतो.)

**झुंजार०**—काय गडबड आहे?

**परसो०**—(कळवळून) अरेरेरे! जबर जखम–मरणार.

**जाधव०**—मुतालिकसाहेब–परसोजीराव! करतां काय? कांहीं शुद्धीवर या. कोण आलं आहे पहा. कांहीं शरम धरा.

**झुंजार०**—काय दंगा आहे? हा तंटा कसा सुरू झाला? खबरदार आतां कुणी हात उचलाल तर. आपल्यांत तंटे! तें शिंग जाऊन बंद करा आधीं. जाधवराव, तुह्मी कां दुःखानं करपून गेल्यासारखे दिसतां? सांगा, हा तंटा कसा सुरू झाला?

**जाधव०**—(दुःखी मुद्रा करून) मला कांहीं माहित नाहीं. हे दोघे मोठ्या गोडीगुलाबींत थट्टामस्करी करीत होते; आणि इतक्यांत तरवारी उपसून एकमेकांच्या छातीवर बसायला काय झालं कुणाला ठाऊक. का ग्रहदशा फिरून वेड लागलं, काय सांगूं कारण? यांच्या तंट्यांत सांपडलों, त्यापेक्षां एखाद्या जंगी लढाईत हे पाय तुटते, तरी छान झालं असतं.

**झुंजार०**—कांहो पिलाजीराव, तुह्मी असे बेफाम कसे झालां?.

**पिलाजी०**—धनीसाहेब, गुन्हा झाला खरा. माफी असावी.

**झुंजार०**—परसोजीराव, तुह्मी मोठे अब्रूचे, गमखाऊ असा तुमचा लौकिक, शहाण्यांच्या तोंडीं तुमची तारीफ, आणि तुह्मी अशी आपली बेअब्रू करून घेतां. काय हें ?

**परसो०**—महाराज, मला जबर जखम झाली आहे. मला बोलवत नाहीं. माझ्याबद्दल जाधवराव आपल्याला सर्व हकीगत सांगतील. कुणी चालून आल्यावर आपला बचाव करणं हा जर गुन्हा असेल, तर इलाज नाहीं; पण याशिवाय कांहीं केलं नाहीं, बोललों नाहीं—

**झुंजार०**—बस्स ! हा दंगा कसा सुरू झाला हें कळलंच पाहिजे. गुन्हेगार माझा जुळा भाऊ असला, तरी त्याला जुमानणार नाहीं. काय हें ? ज्या ठिकाणीं लढाईची धामधूम अजून पक्की मोडली नाहीं, लोकांची अजून भीति उडाली नाहीं, तिथें तुम्ही आपापसांतले खासगी तंटेबखेडे, भररात्रीं, खुद्द चौकीवर चालवितां ! माणसं अहां का हैवान अहां ? जाधवराव, सांगा कुणीं सुरवात केली ती ?

**परसो०**—जाधवराव, पिलाजीराव तुमचे दोस्त म्हणून, किंवा हुद्यांचा संबंध मनांत आणून, जर त्यांची तरफदारी करून बनावट मजकूर सांगाल, तर तुम्ही खरे शिपाई नव्हेत.

**जाधव०**—अगदीं माझ्या काळजालाच नका हात घालूं हो. या जिभेनं पिलाजीरावांचं नुकसान होण्याचा प्रसंग आला, यापेक्षां ही जीभच जर कुणी छाटून टाकते, तर उत्तम होतं. तथापि खरं सांगण्यानं त्यांचं नुकसान होईलसं वाटत नाहीं. धनीसाहेब, खरी हकीगत अशी आहे, कीं मी आणि परसोजीराव कांहीं बोलत होतों; इ-

तक्यांत एकजण 'धांवा धांवा' ह्मणून ओरडत आला. पिलाजीराव तरवार उपसून त्याच्या पाठीस लागले होते. हे परसोजीराव त्यांना थांबवायला ह्मणून पुढें धांवले; आणि शहरांत गडबड उडू नये ह्मणून मी त्या पळत्या मनुष्याच्या मागोमाग निघालों. पण तो शेवटीं निसटलाच. इतक्यांत तरवारींची खणखण आणि पिलाजीरावाचं तोंड चाललेलं ऐकून परत आलों, तों या दोघांची गुद्दागुद्दी, भोंसकाभोंसकी चालली होती, ती आपणच बंद केलीत. याहून जास्त कांहीं मला माहीत नाहीं. पण धनीसाहेब, मनुष्यं तीं मनुष्यंच; शहाणीं शहाणीं सुद्धां कैकवेळां चुकतात. पिलाजीरावाकडून गुन्हा झाला खरा, पण पळून गेलेल्या इसमानं, यांची तशीच कांहींतरी बेअदबी केली असावी, ह्मणून घुस्सा येऊन हे त्याच्यावर तुटून पडले.

**झुंजार०**—समजलों. खरं तर बोलायचं, आणि दोस्त तर राखायचा, ह्मणून तुह्मी यांचा गुन्हा लहान करून दाखवितां. पिलाजीराव, तुमच्यावर लोभ आहे, पण दुसऱ्यांना जरब बसण्याकरितां आजपासून तुमचा हुद्दा काढून घेतला आहे. कोण आहेरे ? परसोजीरावांना नीट संभाळून नेऊन त्यांच्या जखमा बांधा. (त्यास नेतात.) जाधवराव, आतां शहरांत हिंडून कुणी गडबडले असतील, त्यांना धीर द्या; समजलांत ? (जातो.)

**जाधव०**—(दया दाखवून) मुतालिकसाहेब, कुठें जखमबिखम झाली काहो ?

**पिलाजी०**—फार जबर जखम झाली !

**जाधव०**—अरे ! अरे ! अरे ! कुठें हो ?

**पिलाजी०**—अब्रू ! अब्रू ! जाधवराव, माझी अब्रू गेली. माझं सत्व तें गेलं, आतां जनावर मी–अब्रू, अब्रू गेली.

**जाधव०**—( किंचित् हंसून ) मी आपला सरळ मनुष्य, मला वाटलं तुह्माला खरीच जखम झाली. अहो, अब्रूपेक्षां जखमेचं दुःख फार. कारण अब्रू ह्मणजे कांहीं नाहीं, नुसता पोकळ भास ! लायकीवांचून पुष्कळदां मिळते, आणि कारणावांचून जाते. अब्रू गेली ! अब्रू गेली ! अशी तुह्मीच ओरड करूं नका, कीं तुमची अब्रू कायम. मुतालिकसाहेब, सरलष्करांना वळवायला पुष्कळ रस्ते आहेत. लहर लागली, दूर केलं. आणि तुह्माला ही शिक्षा तरी रागानं केली नाहीं–कारण धोरण आहे त्यांत. अहो हें पहा वाघाला वचकांत ठेवायचा, म्हणजे बिचाऱ्या कुत्र्याला झोडपावं लागतं; तसं आहे हें. पुन्हा जाऊन पाय धरा, कीं तुमचेच आहेत ते.

**पिलाजी०**—छेः ! अशा थोर सरदाराला माझ्यासारख्या ढिल्या, कैफी, बेअक्कल मनुष्यानं फशीं पाडण्यापेक्षां माझी छीथू करा असा अर्ज करीन. छाकटा होणं, हवं तसं भकणं, तंटेबखेडे, शिवीगाळ करणं, आणि आपल्याच सावलीशीं भांडत बसणं, ह्मणजे काय झालं ? हे अदृश्यरूपी मद्यसत्वा ! तुला दुसरं नांव नसेल तर पिशाच हेंच नांव देतों.

**जाधव०**—तुह्मी तरवार उपसून मागें लागलां होतां तो कोण ? त्यानं तुमचं काय केलं होतं हो ?

**पिलाजी०**—कांहीं माहित नाहीं. पुष्कळ गोष्टी डोळ्यांपुढें येतात, पण स्पष्ट अशी एकसुद्धां नाहीं. तंटा

झाला, पण कां तें आठवत नाहीं. शिव शिव! मनुष्यांनीं आपली अक्कल जावी ह्मणून वैऱ्याला तोंडांत ओतायचा! आह्मीं आपखुषीनं, आनंदानं, चैनीनं जनावरं बनायचं!

**जाधव०**—कां, आतां तुह्मी चांगलं बोलतां, शुद्धीवर कसे आलां बरं?

**पिलाजी०**—मद्यरूपी पिशाच निघून संतापरूपी पिशाच आंगांत शिरलं ह्मणून. ह्मणजे एका दुर्गुणानं दुसरा दुर्गुण दाखिवला; थूः माझं जिणं!

**जाधव०**—चला, आपली नीति फारच कडक. सध्यांचा वेळवखत मनांत आणला, तर झालं हें खराब झालं; पण आतां काय त्याचं? तेंच सुधारून घ्या ह्मणजे झालं.

**पिलाजी०**—मला पुन्हा हुद्यावर घ्या ह्मणून मी अर्ज करीन; पण ते ह्मणतील तूं छाकटा आहेस! आणि मग हजार तोंडं असलीं तरी बंद! एकदां शुद्धींत, एकदां धुंद, लगेच जनावर! छे! छे! छे! बेताबाहेर एक पेला कीं घात झाला! काळकूट, खरं काळकूट!

**जाधव०**—चला हो, भलतंच! चांगलं मद्य ह्मणजे प्रत्यक्ष अमृत; उपयोग मात्र केला पाहिजे तसा. त्याची नका निंदा करूं बोवा! तुह्मी काय आणि कुणी काय, कधींना कधीं बेताल होतातच. बरं जाऊं द्या तें. मुतालिकसाहेब, मी तुमचा स्नेही ह्मणून सांगतों, तुह्मी आतां असं करा—आपले सरलष्करसाहेब सध्यां माईसाहेबांच्या अगदीं मुठींत आहेत. कारण त्यांचे गुण, त्यांचं लावण्य यांतच ते अहोरात्र गर्क असतात. तेव्हां तुह्मी जाऊन मा-

ईसाहेबांचे पाय धरा, आणि ही सर्व हकीगत कळवा. त्या मोकळ्या मनाच्या, मायाळू आणि उदार असल्या-मुळं, मागण्यापेक्षां जास्त दिलं नाहीं, तर आपल्या नांवाला बट्टा आहे, असं मानतात त्या. ह्मणून सांगतों, इतकं करा, आणि मग जर हा तुमचा स्नेहाचा निखळलेला सांधा पुन्हा भक्कम बसला नाहीं, तर सांगाल त्याची पैज!

**पिलाजी०**—ही मसलत छान दिलीत.

**जाधव०**—सरळ स्नेहभावानं, आणि खऱ्या कळव-ळ्यानं दिली.

**पिलाजी०**—बरं तर; आतां पहाट होत आलीच. जाऊन त्यांची गांठ घेतों, आणि करतों विनंती. तिथंही आमच्या नशीबानं गोता दिला ह्मणजे आटपलंच.

**जाधव०**—रास्त आहे. या तर, रामराम! मला प-हाऱ्यावर गेलं पाहिजे. (पिलाजीराव जातो.) आतां मला द-गलबाज कोण ह्मणणार? मीं जो त्याला सल्ला दिला तो सरळ, खरा आणि पोक्त आहे, इतकंच नव्हे, तर झुंजा-ररावाला वळवायला हाच मार्ग. कारण त्याच्या बायकोचा स्वभाव मनस्वी उदार, ह्मणून कोणत्याही खऱ्या गोष्टींत तिचं मन वळवायचं फार सोपं. बरं नवऱ्याला वळवायचं हें तिला कांहींच नव्हे. कारण तो तिच्या मोहपाशांत तन मन धन इतका जखडून गेला आहे, कीं वाटेल त्या-प्रमाणें आज ती त्याला खेळवील. हवं तें करवील. तेव्हां पिलाजीरावाला मीं जो हा कल्याणाचा सरळ मार्ग दाख-विला, त्याबद्दल मला दगलबाज कोण ह्मणेल? (हंसून) हीच सैतानी खुबी, कीं आरंभीं बिनधोक रस्ता दाखवून, मग खड्ड्यांत पाडायचं. आतां हा भोळा बैलोबा, पि-

लाजीराव, निखळलेला सांधा जुळवावा ह्मणून तिची पायधरणी करीत असतां, आणि ती नवऱ्याजवळ याची नेटून तरफदारी करीत असतां, मी त्या झुंजाररावाच्या कानांत, अशी एक विषारी कंडी फुंकीन, कीं तिचं आणि त्याचं सूत आहे, ह्मणून ती इतकी झटते. मग काय! त्याला फिरून कामावर घ्या ह्मणून जसजसा ती हट्ट धरील, तसतसा त्याचा संशय बळावत जाईल. याप्रमाणं अखेर तिच्या सद्गुणांची राखरांगोळी करून, तिच्या सुस्वभावाचंच जाळं बनवीन आणि त्यांत सर्वांना पकडीन—ओहो! रंभाजीराव?

**रंभाजी०**—( येऊन ) मी इथें शिकारी कुत्र्यांतून आलों खरा, पण शिकार साधायची दुसऱ्यानं, मी उगीच भरतीला मात्र. जवळचा पैसा बहुतेक संपला; रात्रीं खासा पलागती मारही खाल्ला. यांत किफायत इतकीच, कीं श्रमाबद्दल अक्कल मिळाली तेवढी घेऊन, हात हालवीत परत जायची पाळी आली.

**जाधव०**—( निराश मुद्रेनें ) ज्यांना धीर नाहीं, त्यांचं दैन्य काय विचारायचं! अहो रंभाजीराव, 'उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग' असं करून कसं चालेल बरं? आपल्यापाशीं जादू नाहीं कीं टोणा नाहीं. सर्व युक्तियुक्तीनं करायचं. आणि युक्ति म्हटली म्हणजे, आस्ते आस्ते घेतलं पाहिजे. झालं तितकं ठीक झालं आहे. आतां तुम्हाला पिलाजीरावानं मार दिला म्हणतां, पण तेवढ्यानं पिलाजीरावाला नोकरीवरून अचानक उडविला तो? हें पहा, 'धीर सो गंभीर, उतावीळ सो बावरा'. थोडे दिवस गम खा. जसं इतकं साधलं, तसंच

बाकीचं. अहो पण उजाडलं. चैनींत आणि उद्योगांत वेळ फार जलद जातो. तुम्ही जा आतां, चला—जास्त हकीगत पुढें कळेल. (त्यास ढकलीत) हं चला—रामराम! (रंभाजी जातो.) दोन गोष्टी केल्या पाहिजेत. एक माझ्या बायकोकडून सरलष्करणीपाशीं पिलाजीरावाची गोष्ट काढिवली पाहिजे; आणि दुसरी—झुंजाररावाला कुठें तरी गुंतवून, पिलाजीराव त्याच्या बायकोची पायधरणी करीत असतां, त्याला अचुक तिथं आणला पाहिजे, कसं? (आनंदानें) हो--जुळलं, हीच युक्ति. पण आळसानं, आणि चेंगटपणानं बेत ढिला पडूं देऊन उपयोग नाहीं. (पळत जातो.)

## अंक दुसरा समाप्त.

---

# अंक ३ रा.

## प्रवेश पहिला—किल्ल्यांतील सरलष्कराचा वाडा. सकाळ.

(सरलष्करचा एक नोकर हैबती व पिलाजीराव.)

**पिलाजी०**—अरे, माझं एक काम करतोस?

**हैबती**—धनीसाहेबांचा पगार खाऊन तुमचं काम कशापाई करीन?

**पिलाजी०**—ऐकून तरी घे—

**हैबती**—ऐकाय येत न्हाईजी, कान बसल्याती.

**पिलाजी०**—(दोन तीन मोहोरा काढून वाजवून) आतां?

**हैबती**—हां! निगाला कानांतला दट्ट्या! बोला

आतां काय काम है त्ये. ( मोहोरा घेतां घेतां ) कानावर वस्ताद वकाद ह्ये येक है बगा.

**पिलाजी०**—काम इतकंच–माईसाहेबांजवळ सारजाबाई आहेत त्या–त्यांना जाऊन सांग, कीं पिलाजीराव ह्मणून कुणी आला आहे, त्याला तुमच्याशीं थोडं बोलायचं आहे. जा सांग.

**हैबती**—जातों, पन तुमच्या ह्मोरा नगती मला. ( हंसत ) वाइसा इणोद क्येला.

( मोहोरा जमिनीवर टाकून **हैबती** जातो; व **जाधवराव** येतो. )

**पिलाजी०**—कोण जाधवराव ! अगदीं वेळेवर आलांत.

**जाधव०**—ह्मणजे ! तुम्ही निजलांच नाहीं वाटतं ?

**पिलाजी०**—निजूं कसा ? तुमच्याकडून निघालों तेव्हांच तांबडं फुटलं होतं. बरं–मी–तुमच्या कुटुंबाकडे निरोप पाठविला आहे. त्यांना इतकंच सांगायचं आहे, कीं माईसाहेबांची आणि माझी कांहीं वेळ गांठ पडेल असं करा.

**जाधव०**—कांहीं चिंता नाहीं. मीही कांहीं तजविजीनं धनीसाहेबांना बाहेर काढतों. म्हणजे तुम्हाला माईसाहेबांपाशीं काय बोलायचं तें निर्धास्त बोलायला सांपडेल.

**पिलाजी०**—मग तर काय माझ्यावर मेहेरबानीच झाली. ( जाधवराव जातो. ) खरा जिव्हाळ्याचा दोस्त आहे.

( **सारजा** येते. )

**सारजा**—तुमच्यावर नाराजी झालेली ऐकून वाईट वाटलं. पण लवकरच मिटेल हें. माईसाहेब सर्व तुमच्या

तर्फेनं बोलताहेत. धनीसाहेबांचं म्हणणं–तुम्ही ज्याला जखमी केलात, तो इथं नांवालौकिकाचा असून, मोठ्यांचा संबंधी आहे; म्हणून तुम्हांला दूर करणं भाग पडलं. पण तेच पुन्हा म्हणाले, कीं त्यांचा माझा चांगला स्नेह आहे, रदबदलीची कांहीं जरूर नाहीं; तशी संधि आली, म्हणजे माझा मीच त्यांना कामावर बोलावीन. झालं—

**पिलाजी०**—तरी पण तुमच्या विचाराला येईल, आणि होण्यासारखं असेल, तर माईसाहेबांबरोबर थोडा वेळ बोलायची संधि आणून द्या.

**सारजा**—चला तर, या माझ्या मागून. एकदां गांठ घालून देतें; मग हवा तितका वेळ मन मोकळं करून बोला.

**पिलाजी०**—इतकं झाल्यावर आणखी काय पाहिजे? चला तर. (दोघेंही जातात.)

## प्रवेश दुसरा—त्याच वाड्यांतील खोली.

**( कमळजा, पिलाजीराव** आणि **सारजा. )**

**कमळ०**—मुतालिक, तुम्ही अगदीं बिनघोर असा. माझ्या हातून होईल तितकी मी तुमच्याकरतां खटपट करीन. समजलां?

**सारजा**—माईसाहेब कराच एवढं. आमच्या घरीं सुद्धां स्वतःवरच प्रसंग गुजरला, अशी तळमळ लागली आहे.

**कमळ०**—कां नाहीं लागणार? जाधवराव मनुष्यच चांगले. मुतालिक, तुमचा न् तिकडचा अगदीं पहिल्यासारखा स्नेह जमवून देतें, मग झालंना?

**पिलाजी**०—आणखी काय माईसाहेब! आतां माझं कांहीं होवो; मी आपला जन्माचा बंदा गुलाम आहें.

**कमळ**०—मुतालिक, स्वारीवर तुमची भक्ति कशी आहे, दोघांचा परिचय किती दिवसांचा आहे, हें सर्व ठाऊक आहे मला. म्हणूनच म्हणतें, कीं कांहीं धोरणापुरतं तेवढं वांकडं; पुढें काय त्याचं?

**पिलाजी**०—पण, माईसाहेब, कदाचित् तें धोरणच इतकं लांबेल, किंवा चांगलं खतपाणी मिळून असं बळावेल, कीं मी दृष्टिआड झालों आणि माझी जागा भरली म्हणजे माझ्या नोकरीचा आणि स्नेहाचा धनीसाहेबांना विसर पडेल.

**कमळ**०—त्याची नको काळजी; या सारजाबाईसमक्ष मी तुम्हाला तुमच्या जाग्याबद्दल वचन देतें. ही मात्र तुमची खात्री असूं द्या, कीं एकदां मीं वचन दिलं, म्हणजे तें शब्दान्‌शब्द खरें केल्याशिवाय सोडायची नाहीं. रात्रंदिवस पिच्छा पुरवून स्वारींचं मन वळवीन. खातां, पितां, उठतां, बसतां, नेहमीं तुमच्या गोष्टी काढून त्यांना उच्छाद आणीन. म्हणून म्हणतें, मुतालिक, आनंदांत असा; मी तुमची वकिली पतकरली आहे; मेलें तरी बेहेत्तर, पण तुमचा पक्ष म्हणून सोडायची नाहीं.

**सारजा**—माईसाहेब, स्वारी आली.

**पिलाजी**०—मी रजा घेतों तर.

**कमळ**०—कां? बसा तुमच्या देखतच गोष्ट काढतें.

**पिलाजी**०—आतां नको माईसाहेब; माझी तब्बेत जरा नादुरुस्त आहे, मी असून नसून सारखाच. म्हणून—

**कमळ**०—बरं, मर्जी तुमची.

( **झुंजारराव** पुढें व **जाधवराव** मागून असे दुरून येतात. )

**जाधव०**—हां! हें नाहीं आपल्याला पसंत.

**झुंजार०**—कायहो? काय म्हणतां?

**जाधव०**—कांहीं नाहीं धनीसाहेब; आणि जरी–पण काय म्हणत होतों विसरलों इतक्यांत.

**झुंजार**—आतां तिच्यापासून गेला तो पिलाजीराव नव्हे का?

**जाधव०**—कोण? पिलाजीराव? छे! आपल्याला पाहून तो चोरासारखा छपून जायचा नाहीं.

**झुंजार०**—मला वाटतं तोच तो.

**कमळ०**—(उठून व पिलाजीराव गेला तिकडे पाहून) हें पहा, एक अर्जदार दाद मागायला आला होता, त्याच्याशीं बोलत होतें–खरंच, आपली इतराजी झाली, म्हणून बिचारा अगदीं दीन झाला आहे.

**झुंजार०**—कोण तो?

**कमळ०**—कोण म्हणजे, आपला मुतालिक, पिलाजीराव. हें पहा, माझी जर स्वारीजवळ कांहीं भीड चालण्यासारखी असेल, तर बिचारा शरण आला आहे, त्याच्यावर मेहेरनजर करा. कारण मी खात्रीनं सांगतें, कीं त्याचा आपल्या ठिकाणीं खरा स्नेह आहे; त्याच्या हातून नकळत कांहीं चुकी घडली असेल, मुद्दाम लबाडीनं कांहीं नाहीं. हें माझं म्हणणं खोटं झालं, तर मुद्रेवरून मला माणसाची पारखच करतां येत नाहीं असं म्हणायचं. म्हणून कीं नाहीं, माझ्याकरतां तेवढं त्याला परत बोलवावं.

**झुंजार०**—आतां इथून तोच गेला का?

**कमळ०**—होय तोच. अगदीं गाय झाला आहे बिचारा. त्याची ती स्थिति पाहून मला सुद्धां वाईट वाटतं. तर, (तिकडे जाधवराव आपल्या बायकोजवळ जाऊन कमळजेच्या हातांतील रुमाल तिला खुणेनें दाखवितो.) त्याला बोलवावंच परत, अजून कांहीं लांब गेला नसेल. हं—

**झुंजार०**—आतां नको; मग केव्हां तरी पाहूं.

**कमळ०**—मग तरी लवकरच ना पण ?

**झुंजार०**—( हनुवटी धरून ) हो हो ! आपण जातीनं वकिली चालिवली आहे, तेव्हां लवकरच बोलावूं बरं.

**कमळ०**—तर मग आज रात्रीं ?

**झुंजार०**—छेः ! रात्रीं कशाला ?

**कमळ०**—तर मग उद्यां पंक्तिलाच बोलवावं.

**झुंजार०**—उद्यां पण मी घरीं नाहीं जेवायचा.

**कमळ०**—बरं तर उद्यां रात्रीं ? परवां सकाळीं ? तेरवां कां होईना; पण कोणती ती एक वेळ ठरवावी. तीन दिवसांच्या पुढें मात्र नाहीं हो. शपथ ! सांगतें, चुकी झाल्याबद्दल त्याला फार वाईट वाटतं आहे. आतां लष्करी रिवाजाप्रमाणें मोठासा पाहून त्याच्यावर हत्यार धरल्यावांचून दुसऱ्यांवर दरारा बसत नाहीं, असं म्हणतात तें बरोबर आहे; पण घरोबा मोडण्यासारखा त्याचा मुळीं गुन्हाच नाहीं, असं आपलं आम्हाला वाटतं हो. तर त्यानं केव्हां यावं सांगा पाहूं ? काय मेलं ! पिलाजीरावासारख्या उत्तम, इमानी मनुष्याला परत बोलवायचं, इतकं अवघड पडलं अं ! . लग्नापूर्वीं जेव्हां तो आपल्या तर्फेनं, माझ्याकडे येई, तेव्हां जर मी स्वारीविरुद्ध एखादा शब्द बो-

ललें, तर लगेच भांडायला उठे. आणि त्याच्याविषयीं इतकी तेढ ? मी असतें तर–

**झुंजार०**—पुरे आतां. त्याला पाहिजे तेव्हां येऊं द्या. आपला शब्द कसा मोडावा ? झालं आतां मनासारखं ?

**कमळ०**—आपल्या दोस्तालाच परत बोलवायचं, त्यांत माझ्या मनासारखं तें काय ? माझा का फायदा आहे त्यांत ? फायदा आपलाच.

**झुंजार०**—बरं, तसं का होईना. पण कृपा करून मला कांहीं वेळ सोडाल, तर बरं होईल.

**कमळ०**—आपली मर्जी मी कधीं मोडायची नाहीं; येतें तर.

**झुंजार०**—हं, ये. मीही आलोंच तिकडे.

**कमळ०**—चला सारजाबाई. आपण कसेही वागा, कसेही असा, मला आपली आज्ञा प्रमाण. (दोघी जातात.)

**झुंजार०**—(तिच्याकडे पहात) बिनमोल बायको आहे ! प्राण आहे माझा ! लाडके, या सर्व जगाचा लय होईल, तरच तुझ्यावरचं माझं प्रेम नष्ट होईल.

**जाधव०**—धनीसाहेब—.

**झुंजार०**—काय जाधवराव—

**जाधव०**—आपलं मन माईसाहेबांवर जडलं, ही गोष्ट पिलाजीरावांना लग्नापूर्वीं समजली होती का ?

**झुंजार०**—होहो ! अव्वलपासून अखेरपर्यंत त्याला सर्व माहीत आहे. कां बरं ?

**जाधव०**—उगीच, शंका आली म्हणून विचारलं. कांहीं विशेष भानगड नाहीं, धनीसाहेब.

**झुंजार०**—कसली शंका हो !

**जाधव०**—नाहीं, मी समजत होतों, कीं माईसाहेबांची आणि त्यांची इतकी जानपछान नसेल.

**झुंजार०**—वाः, पुष्कळ. निरोपसुद्धां पोचवीत असे तो एकमेकांला.

**जाधव०**—खरं ?

**झुंजार०**—खरं ! खरंच खरं. तुम्हाला कांहीं शंका येते कीं काय ? पिलाजीराव सच्चा मनुष्य आहे.

**जाधव०**—सच्चा ? पिलाजीराव ?

**झुंजार०**—हो, सच्चा.

**जाधव०**—धनीसाहेब, माझ्या माहितीवरून मला वाटतं—

**झुंजार०**—काय वाटतं ?

**जाधव०**—काय वाटतं ?

**झुंजार०**—काय वाटतं, ( आपल्याशीं ) अरे ! मी बोलतों तेंच काय बोलतो हा ! याच्या डोक्यांत एखादी भयंकर कल्पना उत्पन्न झाली आहे, पण ती उघड करायला हा कचरतो. जाधवराव, तुमच्या मनांत कांहीं तरी आलं आहे खास. जेव्हां पिलाजीराव तिच्यापासून गेला, तेव्हां म्हटलंत, 'हें नाहीं आपल्याला पसंत !' काय नाहीं पसंत हो ? तसेंच 'तो निरोपसुद्धां पोंचवीत असे' असं मीं म्हटलं, तेव्हां 'खरं ?' म्हणून केवढ्यानं ओरडलांत; आणि एखादी भयंकर कल्पना डोक्यांत भरावी, तसे भिवयांला तेंढे काय दिलेत, आंठ्या काय घातल्यात; मुद्रा

काय फिरविलीत; तें कांहीं नाहीं; तुम्ही माझे खरे दोस्त असाल, तर मनांत काय आहे तें बोला.

**जाधव०**—दोस्त आहें कीं नाहीं हें आपल्याला माहीत.

**झुंजार०**—अलबत; नुस्ते दोस्त इतकंच नव्हे, तर तुम्ही मोठे नेकीचे मनुष्य असून, पुरा विचार केल्याशिवाय कांहीं बोलत नाहीं, हीसुद्धां माझी खात्री आहे; म्हणूनच तुमच्या या कचरत बोलण्याची धास्ती वाटते. हाच जर कुणी लबाड, लफंगा, बेइमान मनुष्य असता, तर त्याचं बोलणं मीं लक्षांतच घेतलं नसतं; कारण त्याला अशा हिकमती लढविण्याची संवयच. पण तुमच्यासारख्या सिध्या मनुष्याची गोष्ट म्हटली म्हणजे, खऱ्या कळवळ्यानं, आणि केवळ परोपकारबुद्धीनं उद्गार निघायचे.

**जाधव०**—पिलाजीरावाविषयीं विचाराल, तर मी शपथेवर सांगेन, कीं तो सच्चा मनुष्य आहे.

**झुंजार०**—मलाही तसाच वाटतो.

**जाधव०**—पण धनीसाहेब, मनुष्यं जशीं दिसतात, तशीं असावींत; अथवा जीं तशीं नसतील, त्यांनीं तसं दिसूं नये हें चांगलं.

**झुंजार०**—बरोबर, मनुष्यं दिसतात तशीं असावींत.

**जाधव०**—ह्मणूनच मी पिलाजीरावाला सच्चा म्हणतों.

**झुंजार०**—नाहीं, यांत आणखी कांहीं तरी गोम आहे. जाधवराव, आतां जें असेल, तें दिल खुलाकरून सांगा. भलं असो, अगर बुरं असो, कसंही असो.

**जाधव०**—धनीसाहेब, बोलतों याची माफी असावी. नोकरीच्या नात्यानं मी आपला बंदा गुलाम आहें; पण

गुलाम सुद्धां ज्यांत खुले त्यांत कांहीं मी आपला बंदा नाहीं. मनांत काय आहे तें सांगूं ? समजा, तें अगदीं खोटंनाटं आहे. हो—जसं राजवाडा झाला तरी त्यांत घाण दुर्गंधी ही असायचीच, तसंच उत्तम मनुष्याच्याही मनांत चांगल्याबरोबर कांहीं वाईट विचार असायचेच आपले.

**झुंजार०**—जाधवराव, आपल्या मित्राचा घात होत आहे, असं समजून सुद्धां जर तुम्ही आपले विचार त्याला कळवीत नाहीं, तर तुम्ही त्याच्याशीं दगलबाजी करतां म्हणायचं.

**जाधव०**—धनीसाहेबांना माझी एक विनंती आहे, कीं जरी माझ्या मनांत कुत्सित कल्पना येतात आणि मी स्वतः कबूल करतों—माझ्या स्वभावांतच असा दोष आहे, कीं दुसऱ्याचीं बिंगन्‌बिंगं धुंडाळून काढायचीं, आणि मत्सरबुद्धीनं पुष्कळदां नसतीं किटाळं रचायचीं—तरी आपण कृपा करून माझ्यासारख्या मनुष्याच्या कच्च्या, विसंगत कल्पनांवर लक्षच पुरवूं नये, आणि ज्या खात्रीलायक, मुद्देसूद गोष्टी नाहींत, त्या ऐकून भलत्याच घोटाळ्यांत पडूं नये. कारण त्या ऐकून आपल्यालाही समाधान किंवा फायदा व्हायचा नाहीं; आणि त्या सांगणं ह्मणजे, माझ्याही मर्दपणाला, नेकीला अगर शहाणपणाला, रास्त नाहीं.

**झुंजार०**—तुह्मी काय ह्मणतां तें स्पष्ट बोलानात ?

**जाधव०**—धनीसाहेब, पुरुषाला काय अगर बायकोला काय, अब्रू ही मोठी प्यार आहे. माझी संपत्ति

कुणीं चोरली, तरी तिची मला बिलकुल हळहळ वाटायची नाहीं; कारण तिची किंमत ती काय ! आज माझी, उद्यां त्याची, अशी ती हजारांची बटीक. पण जो माझ्या अब्रूला बट्टा लावतो, तो त्यापासून स्वतः श्रीमंत न होतां मला मात्र सफाई बुडवितो.

**झुंजार०**—बस्स, तुमच्या मनांतले विचार काढीन तेव्हां सोडीन !

**जाधव०**—धनीसाहेब, माझं मन आपल्या हातीं असलं, तरी ते निघायचे नाहींत; मग माझ्याजवळ असतांना कसे निघणार ?

**झुंजार०**—( अंगावर धांवून ) नाहीं सांगत ?

**जाधव०**—हां हां ! धनीसाहेब, संभाळा, भलताच संशय घ्याल बरं ! कारण संशयाच्या राक्षसी जबड्यांत एकदां सांपडलांत, कीं आटपलं. कुणाची का बायको असेना, ती जर वाईटचालीची निघाली, तर आपलं नशीब ओळखून तिचं नांव अगदीं सोडून देतो, तो सुखी; पण प्रीति ठेवून संशय घेतो, आणि संशय घेऊन जिला जीव कीं प्राण करतो, त्याचं एकेक पळ किती दुःखाचं जात असेल, धनीसाहेब ?

**झुंजार०**—शिव शिव ! दुर्दशा !

**जाधव०**—धनीसाहेब, दरिद्री असून ज्याला समाधान, तो खरा श्रीमान्; पण घरीं कुबेराची संपत्ति असून, मी दरिद्री होईन, मी दरिद्री होईन, असा ज्याला सदा हृद्रोग, तो पुरा भिकारी. ह्मणून परमेश्वरा ! आमच्या मनांत बायकांविषयीं संशय ह्मणून कधीं येऊं देऊं नकोस, बरं !

**झुंजार०**—( त्याच्या मनांतील काढण्याकरतां ) कां बरं? असं कां? समजा कीं मला संशय आला; ह्मणून मी आपला हृद्रोग्यासारखा जन्मभर संशयांतच कुचंबत पडेन, असं तुह्माला वाटतं? असं कधीं व्हायचं नाहीं. संशय आला, कीं त्याचा निकाल लावलाच पाहिजे. नाहीं तर, तुमच्यासारखे वायफळ वहिमच घेत बसलों, तर मग पशूच बनलों ह्मणायचा! ( हंसत मुद्रेनें ) हें पहा, माझी बायको देखणी आहे, सुगर आहे, कशिदा उत्तम काढते, गाते चांगली, तिला बोलायला फार पाहिजे, असं कुणीं ह्मटलं, ह्मणून मला तिच्याविषयीं भलताच संशय यायचा नाहीं; कारण जिचं आचरण शुद्ध, तिच्या ठिकाणीं हे गुण जास्तच खुलून दिसतात. बरं, मी तसा झोंकदार भरज्वान नाहीं, ह्मणून तिचं वांकडं पाऊल पडेल, असाही मला संशय यायचा नाहीं; कारण मी कसा आहें, हें पाहूनच तिनं मला माळ घातली. तें कांहीं नाहीं, जाधवराव, अगोदर नीट पाहिल्यावांचून मी संशय घ्यायचा नाहीं; संशय आला, कीं त्याची शहानिशा करीन, आणि मुद्यापत्त्यानिशीं जें ठरेल, त्याप्रमाणें एक संशयाला तरी फांटा देईन, किंवा प्रेमाला तरी देईन, समजलां?

**जाधव०**—वाः! मग तर फार उत्तम! आतां या बंद्याला, मोठ्या हौसेनं आणि नेकीनं आपली नोकरी बजावायला जास्त जोर आला. घ्यायला मात्र आपण तयार व्हा. ( चोहोंकडे पहात ) मुद्यापत्त्याविषयीं मी इतक्यांत बोलत नाहीं. एवढंच सुचवितों, कीं माईसाहेबांवर नजर ठेवा; पिलाजीराव आणि त्या एके ठिकाणीं असल्या, ह्मणजे नीट लक्ष द्या; लक्ष द्यायचं तें केवळ संशयबुद्धीनंही नको

आणि निःसंशयबुद्धीनंही नको. आपला स्वभाव सरळ, थोर, उदार पडला; तेव्हां फसगत होऊं नये, ह्मणून पुन्हा बारीक लक्ष द्यायची विनंती करतों. (झुंजारराव कांहीं बोलणार तों) या बायकांना मी चांगला ओळखून आहें. नवऱ्याच्या नकळत पाहिजे ते ढंग केले, तरी त्यांत पाप नाहीं, असं समजतात त्या.

**झुंजार०**—तुह्मी असं ह्मणतां?

**जाधव०**—उगीच नाहीं ह्मणत धनीसाहेब; आपल्याशीं लग्न लावण्याकरितां माईसाहेबांनीं प्रत्यक्ष बापाला नाहीं का फशिवलं? मनांतून तर आपल्यावर फिदा, पण बाहेरून त्यांना भाशिवलं कीं ही आपल्याकडे पाहायलासुद्धां भिते.

**झुंजार०**— हो असं खरं.

**जाधव०**—झालं तर; एवढ्याशा असतांना बापाच्या डोळ्यांत धूळ फेंकायला कमी केलं नाहीं; त्या बिचाऱ्याला वाटलं, कीं आपल्या मुलीवर, बीरमंत्राची भुरळ पडली—पण मीं हा काय गाढवपणा चालिवला आहे? धनीसाहेब, आपल्याशीं फाजिल स्नेह ठेवला, याची माफी करा.

**झुंजार०**—छे! छे! मी तुमचा जन्माचा ऋणी झालों.

**जाधव०**—पण आपली वृत्ति थोडी पालटल्यासारखी दिसते.

**झुंजार०**—भलतंच, बिलकुल नाहीं.

**जाधव०**—खास पालटली. मी जें बोललों तें शुद्ध स्नेहभावानं बोललों, असं समजा; पण मुद्रेत फरक पडला धनीसाहेबः—माझ्या शब्दांचा ओढूनताणून भलताच अर्थ करून संशयापलीकडे जाऊं नका, एवढी प्रार्थना—

**झुंजार०**—नाहीं जात.

**जाधव०**—हो, नाहींतर त्याचा परिणाम फार वाईट होईल. कारण पिलाजीराव माझे दोस्त आहेत.—पण धनीसाहेब, फार चलबिचल झालेली दिसते.

**झुंजार०**—नाहीं, फार नाहीं झाली:—माझी बायको पतिव्रता आहे असंच वाटतं.

**जाधव०**—त्या चिरकाळ तशा राहोत! आणि आपलाही ग्रह असाच राहो.

**झुंजार०**—पण तिचा स्वभावच जर दुनियेविरुद्ध—

**जाधव०**—बस्स, धनीसाहेब, इथंच काय तें आहे. घुस्सा यायचा नाहीं, तर बोलतों—बायकांचा स्वभाव ह्मटला ह्मणजे, गोरा, तरुण, रूपवान असा नवरा आवडावा; खरं कीं नाहीं? पण माईसाहेबांचा निराळाच पंथ! यावरून यांची जबर कामवासना, भलतीच आवड, आणि विचित्र कल्पना, हीं सहज दिसून येतात. माफी असावी; मी हें त्यांनाच उद्देशून बोलत नाहीं; तरी न जाणों, कदाचित् एखादा गुलजार पुरुष बघून, आपल्याशीं लग्न केल्याबद्दल अजून त्यांचं मन पस्तावायचं नाहीं कशावरून?

**झुंजार०**—बरं तुह्मी जा आतां, जा; जर कमजास्त कांहीं दिसलं, तर मला कळवा;—आणखी, तुमच्या बायकोला सांगा तिच्यावर नजर ठेवायला; चला.

**जाधव०**—बरं तर, घेतों रजा धनीसाहेब. (निघतो.)

**झुंजार०**—मीं आधीं लग्न कां केलं? हा जाधवराव सांगतो, यापेक्षां त्याला खास जास्त माहीत आहे. (स्तब्ध रहातो.)

**जाधव०**—(परतून) पुनः एकदां पायांपाशीं विनंती करायची आहे, कीं या गोष्टीचा जास्त छडा काढण्याच्या नादीं आपण पडूं नये; आपोआप काय होईल, तें होईल; आणि पिलार्जीराव आपल्या कामांत चांगले वाकबगार आहेत, सबब त्यांची जागा त्यांना देणं जरी रास्त दिसतं, तरी आपल्या मर्जीस येईल, तर कांहीं दिवस त्यांना असेच ठेवावेत; ह्मणजे ते फिरून जागा मिळवायला काय काय खटपट करतात, हें आपल्या ध्यानांत येईल. त्यांत विशेष इतकंच पहायचं, कीं त्यांच्याबद्दल माईसाहेब कितपत आग्रह धरतात, किती आर्जव करतात; ध्यानांत आलं का ? तोंपर्यंत मात्र, माझे हे फाजील तर्क आहेत असं समजून—आणि असतील कदाचित्—माईसाहेब निष्पाप आहेत, असं धरून चाला, एवढी विनंती आहे.

**झुंजार०**—ठीक आहे. त्याची नको फिकीर.

**जाधव०**—जातों तर, धनीसाहेब. (जातो.)

**झुंजार०**—हा जाधवराव पराकाष्ठेचा प्रामाणिक असून व्यवहारांतल्या सर्व खांचाखोंचा मोठ्या मार्मिकपणानें जाणणारा आहे. याच्या ह्मणण्याप्रमाणं जर ती उनाड मैना आहे असं ठरलं, तर या हृदयाच्या पिंजऱ्यांत जरी तिला ठेविली आहे, तरी त्यांतून सुद्धां बाहेर हुस्कारून लावीन; मग पाहिजे तिकडे जाईना. आतां कदाचित् मी काळाबेरा आहें, माझ्या आंगांत मिठास रंगेल भाषणाची खुबी नाहीं, तसेच हे बाल सफेत दिसूं लागले,—पण हें कांहीं खरं कारण नव्हे.—कांहीं असेना, ती बिघडली हें खास; आणि मी सफाई फसलों; आतां तिचं नांव टाकून दिल्यावांचून समाधान मानायला तोंड

नाहीं दुसरी. लग्नाचा परिणाम असाच व्हायचा; कीं या नाजुक छबेल्यांना 'आमच्या' ह्मणण्यापुरतीच आह्माला सत्ता; यांच्या मनावर कांहीं आपला अम्मल नाहीं. ज्याठिकाणीं माझी प्रीति, तिथेंच एका कोपऱ्यांत, दुसऱ्याचं बिऱ्हाड ! यापेक्षां एखादा बेडूक होऊन मोरीची घाण घेत पडलों असतों, तरी बेहेत्तर होतं. पण थोरांच्या मागं हें शुष्ककाष्ठ असायचंच; जसा मृत्यु, तसं हें—कधीं टळायचं नाहीं; अगदीं ब्रह्मयाचा लेख; या बाबतींत लहानांपेक्षां थोरांचा हक्क जास्त. ही आली पहा. ही जर जारिणी असेल, तर त्यांत प्रत्यक्ष सौंदर्याची विटंबना ! मी कांहीं तें खरं मानायचा नाहीं.

( **कमळजा** व **सारजा** येतात.)

**कमळ०**—तिकडे तयारी झाली, उठायचं नाहीं का ? बोलावलेली सर्व मंडळी केव्हांची येऊन बसली आहे; आतां स्वारीकडूनच उशीर.

**झुंजार०**—हो, उशीर झाला खरा थोडा.

**कमळ०**—अगबाई ! आज आपला शब्द हळू कांबरं येतो ? प्रकृती बिघडली आहे कीं काय ?

**झुंजार०**—हो, जरा कपाळ दुखतं आहे; हें—या इथं.

**कमळ०**—बरोबर; तें जागरणानं दुखत असेल. या रुमालानं बांधतें, ह्मणजे आतां एका घटकेंत बरं होईल.

**झुंजार०**—नको, तो फार लहान आहे. (रुमाल काढून टाकतो व तो खालीं पडतो.) राहील तसंच, चल जाऊं.

( **झुंजारराव** व **कमळजा** जातात. )

**सारजा**—(पडलेला रुमाल उचलून आनंदानें) हा रुमाल

सांपडला, बरं झालं. आमच्या खाशांनीं हा चोरून आण, ह्मणून मला एक शंभरदां सांगितलं होतं. पण माईसाहेबांचा याच्यावर फार जीव. धनीसाहेबांनीं त्यांना ही पहिली प्रेमाची खूण ह्मणून दिला आहे, आणि नीट संभाळ असं बजावून सांगितलं आहे. त्या याला एक क्षणभरसुद्धां विसंबत नाहींत, नेहमीं पोटाशीं बाळगतात, त्याचे मुके घेतात; तर याच्यावरची एवढी वेलबुट्टी उतरून घेऊन, मग खाशांना देईन; ते याचं काय करणार आहेत, ईश्वर जाणे! आपल्याला काय, त्यांनीं सांगितलं तें करायचं.

( **जाधवराव** येतो. )

**जाधव॰**—का? इथं एकट्या काय करतां?

**सारजा**—असं दटाऊं नका; आज आपल्या मनासारखं झालं आहे.

**जाधव॰**—तें कधींच झालं आहे.

**सारजा**—तें काय?

**जाधव॰**—हेंच, आपल्यासारखं रत्न मिळालं हें!

**सारजा**—इतकंच का सगळं? बरं मी आपल्याला तो रुमाल दिला, तर मला काय द्याल?

**जाधव॰**— (उत्कंठेनें) तो रुमाल कोणता?

**सारजा**—कोणता ह्मणजे! (हळूच) धनीसाहेबांनीं माईसाहेबांना खूण दिला होता आणि आपण मला चोरून आणायला सांगितला होता, तो—तो?

**जाधव॰**—मग तो त्यांच्यापासून चोरून आणलास कीं काय?

**सारजा**—चोरून नाहीं; माईसाहेबांच्या हातांतून

गडबडींत खालीं पडला, आणि लाभकाळाची गोष्ट, मी तिथंच होतें, तो उचलून घेतला; हा पाहिलात का ?

**जाधव०**—शाबास ! अशी असावी बायको. दे तो इकडे. (घेऊं लागतो.)

**सारजा**—(मागें सरत) पण मला इतक्या अगत्यानं चोरून आणायला सांगितला, तर याचं करणार काय आपण ?

**जाधव०**—(हिसकाऊन घेऊन) इकडे आण. तुला काय त्याचं ? करणार काय ह्मणे !

**सारजा**—नाहीं ह्मटलं, जर आपल्याला त्याचं मोठंसं काम नसलं, तर मला परत द्या, ह्मणजे मी त्यांचा त्यांना परत नेऊन देईन. उगीच वेड्यासारख्या इकडेतिकडे शोधीत बसतील, ह्मणून ह्मणतें.

**जाधव०**—बरं बरं, समजलं ! पण सांपडला ह्मणून कुणाला कळवूं नकोस बरं का. मला काम आहे त्याचं. जा आतां. (ती जाते.) आतां हा रुमाल मी पिलाजीरावाच्या घरीं त्याला सांपडेल अशा ठिकाणीं नेऊन टाकतों. संशयखोराला अगदीं क्षुल्लक कारणसुद्धां बलवत्तर दिसतं, तेव्हां या रुमालाचा कांहीं तरी उपयोग होईलच. माझ्या विषाचा अम्मल झुंजाररावावर बराच चालू झाला आहे. हें भयंकर कल्पनारूपी विष घेतांना, कांहीं इतकं कडू लागत नाहीं; पण एकदां रक्ताशीं भिनलं, कीं आग भडका उडवून देतं. मीं ह्मटलं तें खरंच. (आनंदानें) ही पहा स्वारी आली ! आतां तुला कुठली झोंप. भांग, गांजा, अफू अगर गुंगी आणणारीं जगांतलीं पाहिजे तीं

औषधं खा; पण काल जशी तुला साखरझोंप लागली होती, तशी फिरून कधीं लागायची नाहीं.

( झुंजारराव येतो. )

**झुंजार०**—माझ्याशीं दगलबाजी !

**जाधव०**— (जवळ येऊन) पण धनीसाहेब, त्याविषयीं पुन्हा गोष्ट काढायची नाहीं.

**झुंजार०**—कोण? चला—चालते व्हा ! तुह्मी माझ्या सर्वांगाचा भडका करून टाकला आहे. असं थोडं थोडं सांगण्यापेक्षां एकदम सांगणं बरं.

**जाधव०**—ह्मणजे काय हें, धनीसाहेब !

**झुंजार०**—(आपल्याशीं बोलल्याप्रमाणें) तिनं चोरून जारकर्म केलं हें मला ठाऊक होतं का? तें मीं पाहिलं नाहीं, त्याची कल्पना नाहीं, अर्थात् त्याचं दुःखही झालं नाहीं. कालरात्रीं कशी गाढ झोंप लागली होती; तिच्याशीं चांगला बोललों, हंसलों, खेळलों; पण पिलाजीरावाचा शिक्का तिच्या गालावर कुठें दिसला नाहीं. हें पहा, चोरीस गेलेला जिन्नस मालकाला कळण्यासारखा नसेल, तर चोरी झाली, हें त्याला कळवूं नये, ह्मणजे त्याचा जिन्नस गेलाच नाहीं.

**जाधव०**—आपणच असं ह्मटल्यावर मग काय !

**झुंजार०**—मला न कळतां, लष्करच्या सर्व लोकांनीं तिचा उपभोग घेतला असता, तरी मी आनंदांत—चैनींत—राहिलों असतों. पण आतां आनंद, चैन, समाधान सर्व गेलं! मुकलों मी त्यांना. फक्त हुकुमाची वाट, कीं ज्यांनीं शत्रूवर एकदम तुटून पडावं, असे माझे रणबहादुर शूर शिपाई, तसेच भाला बर्ची कमानवाले उमदे शि-

ल्दार, ज्यांच्या रणमस्त घोड्यांचा खिकाळा ऐकून श-त्रूच्या फौजेची दाणादाण उडून जावी, त्या सर्वांना मी अंतरलों. त्याचप्रमाणं आंगांत वीरश्रीचा संचार व्हावा, असा डंके नोबतींचा 'धुडुं धुडुं' आवाज, कानटाळे बसविणारा शिंगांचा शब्द, तसाच कर्ण्याचा घनघोर भुंकार, पुन्हा माझ्या कानीं पडायचा नाहीं. तीं अफाट रणमैदानं, तो भगवा झेंडा, त्या भयंकर गडगडाट करणाऱ्या तोफा, तो लष्करी लवाजमा, डामडौल, ती वीरश्री, ती कीर्ति, या सर्वांना— सर्वांना माझा शेवटचा रामराम! या झुंजाररावाच्या शिपाईपेशाची अखेर झाली. (एकदम कोचावर बसतो.)

**जाधव०**—पण असं होईल कसं, धनीसाहेब?

**झुंजार०**—चांडाळा, माझी लाडकी बदचाल आहे, ही गोष्ट तुला शाबीत करून दाखविली पाहिजे, समजलास! अशीतशी नव्हे, प्रत्यक्ष मला दाखविली पाहिजेस; नाहीं तर (त्याचा गळा धरून) याद ठेव—हा झुंजारराव आहे, आणि तूं आहेस!

**जाधव०**—अखेर या पल्लयाला गोष्ट येऊन ठेपली का?

**झुंजार०**—प्रत्यक्ष मला दाखीव, अगर माझी अशी खात्री कर, कीं संशयाला ह्मणून बिलकुल जागा राहूं नये. असं न केलंस, तर नरडीचा घोट घेईन तुझ्या.

**जाधव०**—पण धनीसाहेब—

**झुंजार०**—आणि जर तूं तिच्यावर हें खोटंच कुभांड रचून, माझ्या आंगाचा विनाकारण भडका उडविला असलास, तर तुला रौरव नरकाशिवाय दुसरी गति नाहीं. कारण घोर—घोरकर्माचा इथं कडेलोट झाला.

**जाधव०**—शिव शिव! हे सर्वसाक्षी परमेश्वरा! तुला डोळे आहेत! धनीसाहेब, आपण शुद्धींत बोलतां का हें? बस्स—बस्स झाली नोकरी आतां! या उप्पर सोडवा मला इच्यांतून. काय मी मूर्ख पहा! हा गधड्या जाधवरावा! प्रामाणिकपणा हा दुर्गुण, असं ठरवायला जिवंत राहिलास तूं! काय जगाची रहाटी विलक्षण आहे! जगा! सरळप्रामाणिकपणानं वागण्यांत धोका आहेरे! संभाळ. महाराज, ही अक्कल आपण शिकिवली मला, फार उपकार केलेत. आजपासून कोणत्याही मित्राशीं, सरळपणानं ह्मणून वागायचं नाहीं; कारण त्याचं असं बक्षीस मिळतं. (जाऊं लागतो.)

**झुंजार०**—नाहीं—थांब—तुला सरळपणानं वागलंच पाहिजे.

**जाधव०**—नाहीं धनीसाहेब, मला शहाणं झालं पाहिजे; कारण, सरळ मनुष्य ह्मणजे मूर्ख—ज्यासाठीं धडपड करतो, तेंच गमावून बसतो.

**झुंजार०**—माझी बायको शुद्ध आहे, असंही वाटतं, नाहीं असंही वाटतं; तसंच तुह्मी खरे आहांत असंही वाटतं, नाहींत असंही वाटतं; बस्स पुरावा पाहिजे; कांहीं तरी पुरावा पाहिजे. तिच्या शुद्ध मुखचंद्राला कलंक लागून माझ्या तोंडाप्रमाणं काळं ठिक्कर पडलं, हें मी कसं सहन करूं? फांस, जंबीया, जहर अगर धुऱ्या, इतके उपाय असून, तें मी कसं सहन करूं? खात्री मात्र झाली पाहिजे!

**जाधव०**—आपण रागानं अगदीं खवळून गेलां आहां असं दिसतं, आणि याला कारण मीच झालों, ह्मणून फार वाईट वाटतं; कसं ह्मणतां? खात्री पाहिजे?

**झुंजार०**—खात्री पाहिजे ! केलीच पाहिजे.

**जाधव०**—ठीक आहे, घ्या करून. पण धनीसाहेब, खात्री कशी करून घेणार? निर्लज्जासारखे असा आ करून पहात उभे रहाल तिकडे ?

**झुंजार०**—( कान झांकून डोळे मिटून ) काडकन् प्राण जाईल !

**जाधव०**—आणि तशा स्थितींत तीं दिसायचीं ह्मणजे सुद्धां महा यातायात. कारण असलीं कर्मं नेहमीं अंधारांतच व्हायचीं. मग कसं तर? काय करायचं? खात्री कशी व्हायची? तीं दोघं कितीही बेशरम–बेफाम झालीं, तरी आपल्या दृष्टीस कांहीं तें कृत्य पडायचं नाहीं. आतां, थेट दाराशीं नेऊन भिडिवणारा असा भक्कम पुरावा पाहिजे असेल, तर हाजर करतों.

**झुंजार०**—तिला गैर चालीची ह्मणायला, एखादं बिनतोड कारण दाखीव ह्मणजे बस्स.

**जाधव०**—हरकत नाहीं. जरी हें काम मनापासून मला आवडत नाहीं, तरी केवळ भोळसटपणानं, स्नेहासाठीं ह्मणून एकदां आंगावर घेतलं आहे, तें शेवटास नेलंच पाहिजे. धनीसाहेब, लक्ष असावं मी सांगतों इकडे, परवां एकदां मी पिलाजीरावाशेजारीं पडलों होतों; पण ही दाढ ठणकत होती, ह्मणून झोंप कांहीं आली नाहीं. हें आपल्याला ठाऊक असेलच, कीं दिवसा केलेलं स्वप्नांत बडबडणारीं कांहीं ढिलीं माणसं असतात, त्यांतलेच आमचे पिलाजीराव; त्यांचं बडबडणं चाललं होतं, कीं सखे, कमळजे, आपला हा संबंध मोठ्या खबरदारीनं छपवून चालिवला पाहिजे बरं. आणि मग त्यांनीं मला कचकून मिठी

मारून ह्मटलं--अहाहा! बर्फीचा तुकडा आहे! नंतर जो मुक्यांचा सपाटा चालिवला ह्मणतां; मला वाटलं, माझ्या गालांची कांहीं आतां धडगत दिसत नाहीं. तें झाल्यावर सुस्कारा टाकून ह्मणाले, प्रिये तुझं नशिब खोटं, ह्मणून तूं त्या झुंजारराव्याच्या हातीं लागलीस!

**झुंजार०**—अरे चोरा!

**जाधव०**—धनीसाहेब, पण हें खरं नव्हे—ही त्याच्या स्वप्नांतली गोष्ट.

**झुंजार०**—पण पूर्वीं ठरलेला बेत यावरून दिसतो कीं नाहीं? आणि स्वप्न असलं तरी, संशयाला आधार चांगला झाला.

**जाधव०**—शिवाय दुसरीं जीं लेचींपेचीं प्रमाणं आहेत, त्यांना जोर आला.

**झुंजार०**—ठीक आहे, आतां तिच्या चिंधड्या उडिवतों पहा.

**जाधव०**—धनीसाहेब, दमानं घ्या; आपण प्रत्यक्ष कांहीं पाहिलं नाहीं; त्या अजूनही कदाचित् बिघडल्या नसतील. पण हो, आपण कधीं माईसाहेबांच्या हातांत, मधें एक स्वस्तिक काढलेला, रुमाल पाहिला होता का? बाजूला सुरेख वेलबुट्टी आहे पहा.

**झुंजार०**—हो, तो दस्तरुमाल मींच तिला दिला होता.

**जाधव०**—तें मला ठाऊक नाहीं, पण तो दस्तरुमाल माईसाहेबांचा यांत शंकाच नाहीं. तो मीं आज पिलाजीरावाच्या हातांत पाहिला.

**झुंजार०**—जर तोच असला—

**जाधव०**—तोच असो, किंवा त्यांच्याचपैकीं दुसरा असो; पण बाकीच्या पुराव्यांत ही एक आपली भर.

**झुंजार०**—( रागानें ) अहो त्या हरामखोराला चाळीसहजार देह पाहिजे होते हो—एक देह ह्मणजे काय चिलटासारखा माझ्या क्रोधाच्या दाढेलासुद्धां पुरायचा नाहीं. आतां मला सर्व खरं भासूं लागलं. जाधवराव, ही पहा, तिच्यावरची सारी वेडी प्रीति फुंकून टाकली, पार! या उप्पर साधेल तितका दावा साधीन.

**जाधव०**—पण थोडी शांति धरा.

**झुंजार०**—शांती कसली आतां! प्राण घेतों तिचा. ( जाऊं लागतो. )

**जाधव०**—पण इतकी घाई करूं नका; कदाचित् मन पालटेल ह्मणून ह्मणतों.

**झुंजार०**—कद्धीं पालटायचं नाहीं. पुरा दावा साधीन; माझ्या क्रोधाग्नींत त्या दोघांच्या आहुती देईन, हीच माझी प्रतिज्ञा. ( जाऊं लागतो. )

**जाधव०**—थांबा धनीसाहेब; मीही सर्व देवांसमक्ष प्रतिज्ञा करतों, कीं माझं ज्ञान, माझं मन आणि माझे हात हीं आजपासून यांच्या सेवेंत वाहिलीं. यांचा हुकूम मात्र व्हावा, मग कसलंही अघोर कृत्य असो, तें मी करीन!

**झुंजार०**—शाबास! खरे दोस्त! पण नुसती शाबासकी देत नाहीं, तर लागलींच कामगिरीही सांगतों; ऐका—आजपासून तीन दिवसांच्या आंत पिलाजीराव ठार झाला, ही खबर तुह्मीं मला सांगितली पाहिजे.

**जाधव०**—( दुःखी मुद्रेनें ) हर हर! आपल्या हुकुमा-

वरून, माझे दोस्त पिलाजीराव तर आटपलेच; पण धनी-साहेब, माईसाहेबांना तरी मारूं नका.

**झुंजार०**—छेहो! तिला तर ठार केलीच पाहिजे. चला तुह्मी आतां, आणि मी जाऊन त्या सुंदर सटवाईला झटपट कशी उडवायची, या तयारीला लागतों. आज-पासून माझे मुतालिक तुह्मी.

**जाधव०**—(अति नम्रपणानें) मी कायमचाच आपला बंदा आहें धनीसाहेब. (दोघे जातात.)

## प्रवेश तिसरा.

### स्थळ.—सरकारवाडा.

(**कमळजा, सारजा** आणि **हैबती** हुजऱ्या.)

**कमळ०**—कोण आहेरे तिकडे; तूंच का; बरं ये इकडे.

**हैबती**—काय हुकूम माईसाब?

**कमळ०**—पिलाजीराव कुठं असतात ठाऊक आहे?

**हैबती**—व्हय माईसाब.

**कमळ०**—कुठं सांग बरं?

**हैबती**—हकड आल मंजी हत असतात, आन् घरीं ग्येल मंजी घरीं असतात, आन् भाईर ऱ्हाइल, मंजी भाईरबी असत्यात कवा कवा.

**कमळ०**—तसं नव्हे—त्यांचं घर ठाऊक आहे का?

**हैबती**—है मंजी! अक्शी जवळच हैन—

**कमळ०**—जवळ ह्मणजे कुठं?

**हैबती**—जवळ मंजी—आमच्या आंगनांत चिंचच

झाड है त्ये–त्येच्यावर चडल, मंजी त्येंच्या वाड्याची गच्ची दिसती बगा माईसाब.

**कमळ०**—ह्मणजे कुठली गोष्ट सांगतोस ही ?

**हैबती**—आमच्या येनीपूरची.

**कमळ०**—हा धांद्रटा, अरे मीं तुला वेणीपूरचं घर नाहीं विचारलं ! पिलाजीरावांची गांठ घेऊन, त्यांना माझा निरोप सांग, कीं स्वारींचं मन बरंच वळलं आहे, आणि लवकरच सर्व जुळेल ह्मणावं. समजलास का काय सांगायचं तें ?

**हैबती**—समजलों, आन् उमजलोंबी माईसाब (जातो.)

**कमळ०**—सारजाबाई, कुठं बरं पडला असेल तो रुमाल ?

**सारजा**—कोण जाण माईसाहेब.

**कमळ०**—खरंच सांगतें–माझ्या गळ्यांतला मोत्यांचा कंठा हरवला असता, तरी मला इतकं वाईट वाटलं नसतं. आतां स्वारींचं मन निर्मळ असून, संशयखोरासारखं हलकं नाहीं, ह्मणून बरं; नाहींतर एवढ्यावरूनच त्यांच्या मनांत भलभलत्या कल्पना यायला राहिल्या नसत्या हो.

**सारजा**—स्वारींचं मन संशयी नाहीं ना ?

**कमळ०**—छे हो ! अगदीं नाहीं. स्वप्नांतसुद्धां संशय यायचा नाहीं त्यांच्या मनांत.

**सारजा**—स्वारीच आली–अगदीं शंभर वर्षं आयुष्य !

**कमळ०**—बरंच झालं; पिलाजीरावांना बोलावून आ-

णल्याशिवाय, मी आतां जाऊंच द्यायची नाहीं. (झुंजारराव येतो.) कां? अम्मळ बरं वाटतं कां आतां?

**झुंजार०**—(राग दाखवून) हो, बरं वाटतं. (बाजूस) मनांत एक आणि बाहेर दाखवायचं एक फार कठीण. (कोंचावर बसून) तुमचं कसं काय?

**कमळ०**—माझं काय असायचं?

**झुंजार०**—जरा तुझा हात दे पाहूं. (हात पाहून) हा हात स्निग्ध असून चांगला लुसलुशित आहे.

**कमळ०**—अजून तितकं वयही झालं नाहीं, शिवाय कांहीं कष्टाचीं कामंही करावीं लागत नाहींत, ह्मणून तसा आहे.

**झुंजार०**—(हातावरच्या दुसऱ्या रेषा पहात) उदारबुद्धि, आणि विपुल संतती यांचं लक्षण आहे हें. असा नरम, गरम, स्निग्ध हात असला, ह्मणजे त्याला परतंत्रता, उपासतापास, देहदंड, नेमधर्म, हे उपाय केले पाहिजेत; कारण या लक्षणांवरून तुला सध्यां समंधाची बाधा आहे, तोच फार गोंधळ उडिवतो. हात चांगला यांत संशय नाहीं.

**कमळ०**—आपल्याला असं ह्मटलंच पाहिजे; कारण याच हातानं आपण माझं पाणिग्रहण केलं.

**झुंजार०**—मोठा उदार हात. पूर्वींच्या बायका मनोदान करून, मग पाणीदान करीत असत; पण अलीकडच्या बायका नुसते हात देतात, मन नाहीं.

**कमळ०**—यावर कांहीं माझ्यानं बोलवत नाहीं. पण आपलं वचन?

**झुंजार०**—तें कोणतं?

**कमळ०**—स्वारींना येऊन भेटा, ह्मणून मीं पिलाजी-रावांना निरोप धाडला आहे.

**झुंजार०**—( एकदम तोंड फिरवून ) मला फार सर्दी झाली आहे; तुझा रुमाल दे पाहूं.

**कमळ०**—हा घ्यावा.

**झुंजार०**—हा नव्हे. मीं तुला दिला होता तो दे.

**कमळ०**—तो इथं जवळ नाहीं.

**झुंजार०**—नाहीं?

**कमळ०**—खरंच नाहीं, खोटं का सांगतें?

**झुंजार०**—तर मग ही मोठी चुकी केलीस. तो रुमाल एका अघोरपंथी जोगिणीनं माझ्या आईला प्रसाद ह्मणून दिला होता, आणि असं सांगितलं होतं, कीं हा जवळ असेपर्यंत तुझ्या नवऱ्याची तूं आवडती होऊन, त्याला अंकित करून ठेवशील; पण हरवलास अगर कोणाला दिलास, तर मात्र त्याची खप्पा मर्जी होऊन, तो भलत्याच नादीं लागेल. तिनं मरतांना तो मला देऊन सांगितलं, कीं तुझं लग्न झालं, ह्मणजे हा बायकोला दे; त्याप्रमाणं मीं तो तुला दिला. ह्मणून त्याला जिवासारखा जप बरं; हारवलास किंवा कुणाला देऊन टाकलास, तर तुझ्यावर फार–फार बिकट प्रसंग गुजरेल, ध्यानांत ठेव.

**कमळ०**—(घाबरून) खरंच का असं होईल?

**झुंजार०**—अलबत होईल. कारण त्या जोगिणीनं कुंवार मुलींच्या काळजांतल्या रक्तांत तो भिजवून, नंतर मंत्रानं भारलेला आहे.

**कमळ०**—अगबाई, खरंच का?

**झुंजार०**—एक अक्षरसुद्धां खोटं नाहीं; म्हणून नीट पहा तो.

**कमळ०**—मुळीं दृष्टीस पडला नसता, तर बरं होतं!

**झुंजार०**—हां, कां बरं!

**कमळ०**—हें काय बाई असं उसळून बोलायचं!

**झुंजार०**—हरवला का? गेला तो? अगदीं पार झाला?

**कमळ०**—हरवला नाहीं; पण हरवलाच तर काय करायचं?

**झुंजार०**—काय? काय ह्मटलंस? हरवला तर काय करायचं?

**कमळ०**—नाहीं–तो हरवला नाहीं–असं ह्मटलं.

**झुंजार०**—तर मग आण कुठं आहे तो.

**कमळ०**—आणीन, पण आतां नाहीं. समजलें मी! पिलाजीरावासंबंधानं बोलणं काढीन, ह्मणून ही शक्कल काढली आहे, दुसरं काय? पण खरंच, त्याला केव्हां बोलवायचं बरं?

**झुंजार०**—तो रुमाल कुठं आहे तो आण अगोदर. संशय येतो मला.

**कमळ०**—तें राहूं द्या, पण त्यांच्या लायकीचा शिपाई आपल्याला कद्धीं मिळायचा नाहीं.

**झुंजार०**—रुमाल!

**कमळ०**—आधीं पिलाजीरावाचं काय तें सांगावं.

**झुंजार०**—बस्स रुमाल!

**कमळ०**—आपल्याच कृपेनं तो हुद्यावर चढला, आपल्या बरोबर त्यानं संकटंही सोसलीं.

**झुंजार०**—बस्स, रुमाल! रुमाल!

**कमळ०**—खरं ह्मटलं तर दोष आपल्या पदरीं येतो.

**झुंजार०**—चल—निघ! (जातो.)

**सारजा**—स्वारी संशयखोर नाहीं ह्मणत होतां ना?

**कमळ०**—असं बाई मीं पूर्वीं कधीं पाहिलं नव्हतं. खरंच, त्या रुमालांत कांहीं चमत्कार आहे खरा. तो हरवला हें फार वाईट झालं बाई.

**सारजा**—माईसाहेब, पुरुषांची परीक्षा एक दोन वर्षांत होत नाहीं. पहिल्यापहिल्यानदां त्यांना आमचा अगदीं शोष असतो, पण एकदां तृप्ति झाली, कीं संपलं. हे पहा पिलाजीराव आणखी—

(**जाधवराव** व **पिलाजीराव** येतात.)

**जाधव०**—तिथं कांहीं दुसरा मार्ग नाहीं; माईसाहेबांच्याच मार्फत काम झालं पाहिजे. (एकदम पाहून) अरे वाः! काम फत्ते! त्या पहा माईसाहेब—जाऊन घट्ट पाय धरा.

**कमळ०**—कां पिलाजीराव? कांहीं नवलविशेष?

**पिलाजी०**—आहे तेंच आहे माईसाहेब; पण आतां पायांजवळ इतकाच अर्ज, कीं धनीसाहेबांची माझ्यावर पुन्हा मेहेरनजर होऊन मीं या जगांत यावं, हें आपल्या हातीं आहे. लांबणीवर मात्र पडूं नये. किंवा माझी झालेली नोकरी, सध्यांचे हाल, आणि पुढें होणारी नोकरी, या सर्वांवर पाणी पडण्यासारखाच माझा भयंकर गुन्हा असेल, तर तसं तरी कळलेलं बरं; ह्मणजे मारून मुटकून समाधान मानून, दैवावर हवाला टाकून, दुसरा एखादा रस्ता पाहीन.

**कमळ०**—पिलाजीराव, मी पुष्कळ बोललें, पण सध्यांच राग रंग कांहीं ठीक दिसत नाहीं. स्वारींच्या तब्बेतींत इतका फरक पडला आहे, कीं हाच जर चेहेऱ्यांत पडता, तर ओळखायला सुद्धां आले नसते. तुमच्या संबंधानं मन मोकळं करून बोलतें, ह्मणून माझ्यावर खप्पा मर्जी! असो! मर्जी! तुह्मी मात्र असेच धीर धरून असा! तुमच्याकरतां माझ्या हातून होईल तेवढं करीन, मग झालं ना?

**जाधव०**—धनीसाहेब रागावले आहेत कीं काय?

**सारजा**—किती पण! आणि मुद्रा सुद्धां कशीशी दिसते; आतां नुकतेच गेले इथून.

**जाधव०**—त्यांना राग? जेव्हां तोफेच्या भडिमारांत यांची फौजच्याफौज फडशा झाली, आणि सख्खा भाऊ हातोहात असान उडाला, तेव्हां सुद्धां राग नाहीं आला, आणि आतां राग? तेव्हां तसंच कांहीं कारण झालं असेल, जाऊन भेटतों आधीं.

**कमळ०**—खरंच चला. (जाधवराव जातो.) खास सांगतें, कांहीं तरी सरकारी कारण आहे; मग तें वेणीपूरचं असो, अथवा इथल्याच कांहीं फंदफितुरीचा यांना सुगावा लागलेला असो; आणि एकदां पित्त खवळलं, ह्मणजे पुरुषांसारखे पुरुष, मोठमोठ्या गोष्टी सोडून, अगदीं क्षुल्लक बाबतींत पिसाळल्यासारखं करतात. आणि तेंही रास्तच आहे. कारण आपलं मेलं एक बोट दुखायला लागलं, कीं सर्वांगाला ठणका लागल्या सारखं होतं. शिवाय दुसरं असं–ते कांहीं देव नव्हेत ना? तेव्हां अशा गोष्टी

व्हायच्याच. सारजाबाई, वेडी मी—विनाकारण त्यांना दोष दिला बरं. आग लागो माझ्या शहाणपणाला.

**सारजा**—आपण ह्मणतां, तसं सरकारीच कांहीं असून, आपल्याविषयीं भलताच संशय नसला ह्मणजे पुरे.

**कमळ०**—हा दिवसच मेला वाईट उगवला! भलताच संशय येण्यासारखं, माझ्या हातून कांहीं घडलं नाहीं.

**सारजा**—पण संशयखोरांना असं सांगून काय उपयोग? त्यांना नेहमीं कारणच लागतं असं नाहीं; स्वभाव संशयी ह्मणून संशय येतो. संशय ह्मणजे मेला एक स्वयंभू ब्रह्मराक्षस आहे.

**कमळ०**—देवा! त्याची बाधा स्वारींना होऊं देऊं नकोस. बरं आतां मी तिकडेच जातें. पिलाजीराव, इथंच असा; मर्जीचा रोख पाहून तुमची गोष्ट काढीन बरं!

**पिलाजी०**—ठीक आहे माईसाहेब.

( **कमळजा** व **सारजा** जातात; **चंपाजी** येते. )

**चंपाजी०**—( खोंचून ) कां महाराज, स्वारी इथंच का? मीं ह्मटलं कुठं लढाईवर—

**पिलाजी०**— खूप उडिवलीत,—पण मी आपल्याकडेच निघालों होतों; खरेंच—( एक हात खांद्यावर व दुसऱ्या हातानें हनवटी धरून ) तुझी शपथ!

**चंपाजी०**—( झटक्यानें ) पुरे! पुरे! बोलायला कांहीं तरी शरम! मेली आठवड्याचाआठवडा दडी द्यायची अं? सगळे सात दिवस, आणि सगळ्या सात रात्री! आठ विसा आठ तास घालवावेत तरी कसे? उठावं, वाटेकडे पहावं, पुन्हा बसावं, पुन्हा उठावं. ह्मणतात तें उगीच का—

### दोहरा.

पीतम जब साथि रहे, पलमे गुजरत रात ॥
वोहीका जब बिरह होत, पल पल दिनसम जात ॥ १ ॥

**पिलाजी०**—माफ करा. झाली खरी माझ्याकडून चुकी. सध्यां कांहीं पेंचांत आहें; ह्मणून फावलं नाहीं यायला. यांतून मोकळा झालों, कीं मागचा सारा वचपा काढून टाकीन, मग तर खुष!—हंसली रे हंसली!—पण हें पहा—हा दस्तरुमाल घेऊन याच्यावरची वेलबुट्टी आहे, तशी मला काढून दे.

**चंपाजी**—(पाहून रागानें) स्वारीला कुठून मिळाला हा? एखादं नवीन पात्र काढलं आहे वाटतं? तरी ह्मटलं, इतके दिवस दर्शन कां नाहीं! ठीकच आहे, कारण—

### दोहरा.

मकरंद पिया तन ठंड भई, कमलिनिसे क्या काम ॥
भ्रमर जात है दूजीपर, ऐसी जात हराम ॥ २ ॥

**पिलाजी०**—चल वेडी कुठली! भलतेच कुतर्क घेत बसली.

**चंपाजी**—कसे भलतेच! कुणाचा तर हा?

**पिलाजी०**—कुणाचा हें माहीत नाहीं. माझ्या खोलींत सांपडला, एवढं खरं; याच्यावरचं काम नामी आहे, कोण विसरून गेला असेल, तो बहुतकरून मागायला येईल; ह्मणून त्यापूर्वींच उतरून घे ह्मणजे झालं. आणि आतां जा इथून.

**चंपाजी**—इथून जाऊं, कां बरं?

**पिलाजी०**—मी इथं आलों आहें धनीसाहेबांकडे.

त्यांच्या नजरेस हा प्रकार पडण्यांत कांहीं भूषण नाहीं मला.

**चंपाजी**—तें कां? मी नकोशी झालें ह्मणून ना? समजलें, समजलें. एवढी चार पावलांची तसदी घेऊन मला रस्त्याला लावा, आणि रात्रीं तरी लौकरच पायधूळ झाडाल कीं नाहीं, तें सांगा. ह्मणजे झालं.

**पिलाजी०**—चार पावलं पोंचिवतों; रात्रीं मात्र लवकर येईन. जा आतां.

**चंपाजी**—ठीक आहे. आह्माला काय, प्रसंग येईल तसं वागायचं. रात्रीं तरी खास ना? नाहीं तर पहा—

( पडदा पडतो. )

## अंक तिसरा समाप्त.

---

# अंक ४ था.

## प्रवेश पहिला.—स्थळ पूर्वींचें.

( **झुंजारराव** व **जाधवराव** येतात. )

**जाधव०**—आपल्याला खपेल का असं?

**झुंजार०**—असं ह्मणजे कसं?

**जाधव०**—परपुरुषाला चोरून चुंबन देणं?

**झुंजार०**—बिलकुल नाहीं खपायचं.

**जाधव०**—किंवा त्याच्या शेजारीं चार चार घटका बिछान्यावर असणं? वाईट बुद्धीनं नव्हे कांहीं.

**झुंजार०**—बिछान्यावर शेजारीं असून, वाईट बुद्धीनं नव्हे? सवाई ढोंग हें. असं कध्धीं व्हायचं नाहीं. आरंभीं जरी मन पाक असलं, तरी अशा प्रसंगीं तें ढळायचंच.

**जाधव०**—वास्तविक जर तसा प्रकार घडला नाहीं, तर कांहीं मोठासा अपराध नव्हे हा. परंतु मी माझ्या बायकोला एक रुमाल दिला असं समजा—

**झुंजार०**—बरं मग ?

**जाधव०**—मग काय ? तो तिचा झाला. तिनं तो पाहिजे त्याला द्यावा.

**झुंजार०**—वा:, पातिव्रत्यही तिचंच, ह्मणून तेंही द्यावं का ?

**जाधव०**—धनीसाहेब, पातिव्रत्य ही दिसणारी वस्तु नव्हे. वास्तविक पतिव्रता नसतात, त्याच कैकवेळ पतिव्रता ह्मणून गाजतात. पण रुमालाची गोष्ट—

**झुंजार०**—देवा शपथ ! मला त्याचा विसर पडता, तर बरं होतं ! घरावर घुबड बसावं, त्याप्रमाणं तो दुश्चिन्हासारखा मला दिसतो. तुह्मीं म्हटलंत माझा रुमाल त्याच्याजवळ होता.

**जाधव०**—हो, पण त्याचं काय आतां ?

**झुंजार०**—त्याचं काय आतां ! हें नाहीं रास्त.

**जाधव०**—बरं समजा, मीं असं म्हटलं असतं, कीं त्यानं आपल्या घरीं कांहीं खटपट केलेली मीं पाहिली, किंवा त्यांनीं सांगितलेलं ऐकलं, तर काय केलं असतंत ? कारण असे गडी पुष्कळ सांपडतील, कीं आपण होऊन, अगर तिच्याच लघळपट्टीनं, ते एखादीवर फिदा झाले, म्हणजे ही गोष्ट त्यांच्या तोंडून बाहेर फुटायचीच,—

**झुंजार०**—तो असं कांहीं बोलला का ?

**जाधव०**—बोलला, पण दुटप्पी बोलला.

**झुंजार०**—काय, काय बोलला !

**जाधव०**—मीं असं असं केलं, असं बोलला.

**झुंजार०**—तिच्याशीं ?

**जाधव०**—( दुटप्पी ) तिच्याशीं–तिच्याशीं.

**झुंजार०**—समजलों. रुमाल–रुमाल–माझ्या आंगाचा थरथराट झाला आहे ! यांत कांहीं तथ्य असल्यावांचून नुसत्या शब्दांनीं मनाचा इतका संताप व्हायचा नाहीं. अगदीं नाकाला नाक, तोंडाला तोंड ! ( संशय घेऊन ) असं होईल कसं ? रुमाल–रुमाल–(बेशुद्ध होऊन पडतो.)

**जाधव०**—(त्याकडे पाहात) माझी मात्रा खूपच लागू पडली. चालूं दे. भोळे बैलोबा फसतात ते असेच; आणि कैक शुद्ध पतिव्रतांना जारकर्माचा खोटा डाग लागतो, तोही असाच–( खालीं वांकून ) धनीसाहेब ! काय झालं ! धनीसाहेब ! ( पिलाजीराव येतो. ) कां पिलाजीराव ?

**पिलाजी०**—काय झालं हो यांना ?

**जाधव०**—फेपरं आलं आहे–दुसरा झटका हा; काल एक असाच आला होता.

**पिलाजी०**—( पुढें सरत ) जरा कानशिलाशीं चोळा बरं.

**जाधव०**—( त्याला आडवून ) छे ! छे ! चोळून नाहीं उपयोग. फेपरं ह्मटलं, ह्मणजे त्या माणसाला स्वस्थ पडूं दिलं पाहिजे; नाहींतर तोंडाला फेंस सुटून कांहीं वेळानं तो बेफाम होऊन जातो. हे पहा हलायला लागले. तुह्मी जरा चला इथून, आतां सावध होतील; ते गेल्यावर तुमच्याशीं कांहीं जरूर बोलायचं आहे जा. (तो जातो.) धनीसाहेब ! काय हें ? दैवीं असेल तें मर्दासारखं सोसलं पाहिजे.

**झुंजार०**—जाधवराव! छिनाल बायकोचा नवरा, ह्मणजे मर्द कसला? पशू तो!

**जाधव०**—तर मग, भरवस्तीच्या शहरांत असे पशू पुष्कळ. ज्याचं ह्मणून लग्न झालं, ते सर्व आपल्याच पंक्तींतले असं समजा. पृथ्वीच्या पाठीवर असे लक्षावधी पुरुष सांपडतील, कीं दररोज रात्रीं भ्रष्ट शय्येवर निजून पुनः ती शुद्ध ह्मणायला तयार! आपली गोष्ट यांच्यापेक्षां फार चांगली धनीसाहेब. भ्रष्ट बायकोला पवित्र समजून तिच्या तोंडांत तोंड घालणं किती वाईट! केवढी शरमेची गोष्ट! छे! छे! छे! माझी बायको तशी आहे असं कळूं द्या मात्र, ह्मणजे तिची काय व्यवस्था लावायची, ती पाहीन मग.

**झुंजार०**—बरोबर आहे-अगदीं खरं आहे.

**जाधव०**—धनीसाहेब, कांहीं वेळ आपण असे बाजूला उभे रहा; पण खूप खंबीर-बिलकुल गडबड करायची नाहीं. आपण दुःखांत अगदीं चूर होऊन गेलां होतां; आपल्या सारख्यांना गैरच हें—पण, तितक्यांत पिलाजीराव आले होते इथं; आपण झटका येऊन पडलां, हेंच कारण सांगून, त्यांना लावून तर दिलेच; पण "कांहीं बोलायचं आहे, लवकर या," असं सांगितलं आहे—आणि तेही येतों ह्मणाले आहेत; मात्र छपून नीट पहा—त्यांचा चेहेरा ठिकठिकाणीं कसा मुरडतो, कसा दुडपतो, हें चांगलं लक्षांत आणा. कारण तीच गोष्ट त्यांच्याकडून मी पुन्हा काढणार आहें.—चेहेरा मात्र नीट पहा. पण मेहरबानी करून घाई करूं नका बरं; नाहींतर रागाच्या झटक्यांत आपल्याला कांहींच भान रहात नाहीं असं ह्मणेन.

**झुंजार०**—जाधवराव, मी किती दमदार आहें, हें पहाल तुह्मी; पण गर्दन छाटायलाही मागं हटणारा नव्हें मी.

**जाधव०**—अलबत, तसं पाहिजेच; पण प्रसंग पाहून काय करायचं तें करावं. बरं होतां ना बाजूला? (झुंजारराव जातो.) आतां मी पिलाजीरावाजवळ चंपाजीची गोष्ट काढतों. ती ह्मणजे पिलाजीरावावर अगदीं फिदा आहे; आणि अशा रांडांचं कपाळच हें; त्या जरी पुष्कळांना नादीं लावतात, तरी त्यांचा प्यार कुणीतरी असतोच. तिची गोष्ट निघाल्याबरोबर पिलाजीराव पोट धरधरून हंसणार; ही आलीच स्वारी! (पिलाजीराव दबकत दबकत येतो.) हा हंसायला लागेल तसतशी तिकडे ती स्वारी जास्त खवळत जाईल; आणि मनांतल्या संशयामुळें याचं हसणं, हावभाव, रंगेलपणा या सगळ्यांचा भलताच रोख समजेल. (पिलाजीराव जवळ येतो.) कसं काय मुतालिकसाहेब!

**पिलाजी०**—(सुस्कारा सोडून) आतां मला मुतालिक ह्मणून दुःखावर डाग कां देतां? तो हुद्दा गेला ह्मणून तर माझा प्राण चालला आहे.

**जाधव०**—(त्याच्या खांद्यावर हात ठेवून) माईसाहेबांच्या पाठीस लागा, कीं काम फत्ते! हेंच जर (हळूच) चंपाजीच्या हातीं असतं, तर किती जलद झालं असतं?

**पिलाजी०**—(मोठ्यानें हंसत) गरीब बिचारी ती!

**झुंजार०**—(आडून) पहा, कसा आधींच हंसतो तो!

**जाधव०**—(मोठ्यानें) पुरुषावर इतकी आषक्त बायको आपण नव्हती कधीं पाहिली बुवा!

**पिलाजी०**—खरंच माझ्यावर फार जीव आहे बिचारीचा!

( **जाधवराव** व **पिलाजीराव** हळू हळू बोलतात. )

**झुंजार०**—( आडून ) नाहीं ह्मणतो—हशाखालीं नेतो!

**जाधव०**—( झुंजाररावास खुणवून ) पण कांहो पिलाजी-राव, तुह्मी तिला कायमची ठेवून देणार ह्मणते ती; खरं का?

( **पिलाजी** मोठ्यानें हंसतो. )

**झुंजार०**—अरे चोरा! हंसतोस काय!

**पिलाजी०**—तिला मी कायमची ठेवणार! वाः! ह्मणजे माझी अक्कल आजच गेली असं समजतां कीं काय? तिला—(हंसतो.)

**झुंजार०**—ज्याचं काम फत्ते होतं तोच हंसतो.

**जाधव०**—खरंच; बाजार बातमी तर अशी आहे.

**पिलाजी०**—अहो तिनंच गप्प उठिवली ही. तिच्या मनांतून आहे, पण आपण कांहीं बोललों नाहीं. आतां आली होती इथं. जिथं मी, तिथं आपली ही आहेच. परवां काय झालं,—( जाधवराव झुंजाररावास खुणावतो. ) ऐकलंत का जाधवराव, परवां मी बंदरावर कुणाशीं बोलत होतों, आणि इतक्यांत आलं बुवा हें ध्यान! आल्या बरोबर एकदम गळ्याला मिठी!

**झुंजार०**—जसं कांहीं 'सख्या जिवलगा' ह्मणूनच, असं याच्या झोंकावरून दिसतं.

**पिलाजी०**—आणि मग लोळली काय, रडली काय, मला ओढलन् काय, आंवळलन् काय, कांहीं सोय नाहीं. (दोघे हळू हळू बोलतात.)

**झुंजार०**—आतां सांगतो आहे, तिनं मला खोलींत

कसं नेलं. अरे बेरडा ! घी देखा लेकिन् बडगा नहीं देखा !

**पिलाजी०**—बस्स ! पुरे आतां तिची संगत.

**जाधव०**—पण समोर पहा कोण येत आहे तें.

**पिलाजी०**—( वाईट तोंड करून ) ही एक दुसरी लावसट आहे ! पण तिच्यापेक्षां चांगली. ( चंपा येते, तीस ) तूं का अशी माझ्या मागं लागली आहेस ?

**चंपाजी०**—माझं खेटर लागलं आहे तुमच्या मागं ! ( रुमाल पुढें करून ) आतां तुह्मीं मला हा रुमाल दिलात, तो काय ह्मणून ? मी वेडी ह्मणून तो घेतला. याच्यावरची वेलबुट्टी मी काढूं का ? हा ह्मणे 'माझ्या खोलींत मला सांपडला, आणि कुणीं आणून टाकला तें कांहीं माहीत नाहीं.' वाः ! कुणीं तरी मेल्या सटवीनं दिला असेल, आणि याच्यावरची वेलबुट्टी उतरायला मला सांगतात ! खासं ! घ्या हा आपला रुमाल. ( रुमाल फेंकते. ) आणि द्या त्या माझ्या सवतीला नेऊन. मी नाहीं असलं मोलकरणीचं काम करीत, समजलां ?

**झुंजार०**—खास ! खास ! माझाच रुमाल हा !

**पिलाजी०**—( उचलून ) हें काय बरं चंपाजी, हें काय ?

**चंपाजी०**—( रागानें ) तेंच हें. असलं रात्रीं यायचं, तर या; नसलं तर मर्जी लागेल तेव्हां या. ( जाते. )

**जाधव०**—( झुंजारराव रागानें येतो आहे असें पाहून ) चला-चला, मागून चला तिच्या.

**पिलाजी०**—गेलंच पाहिजे; नाहीं तर साऱ्या रस्ताभर तोंड चालेल.

**जाधव०**—रात्रीं मुक्काम तिच्याच घरीं असेल ?

**पिलाजी०**—हो, असा बेत आहे.

**जाधव०**—बरं तर, रामराम! तुमच्याशीं कांहीं बोलायचं आहे; कदाचित् मीही येईन तिकडे.

**पिलाजी०**—खरंच का? याच तर–रामराम! (जातो.)

**झुंजार०**—(त्वेषानें येऊन) जाधवराव त्याचा प्राण कसा घेऊं बोला.

**जाधव०**—आपल्याच बदकर्माबद्दल कसा हंसत होता, पाहिलंत ना ? आणि तो रुमाल—

**झुंजार०**—माझाच का तो ?

**जाधव०**—होय धनीसाहेब; आणि माईसाहेबांची तरी त्याच्याजवळ काय किंमत आहे तें पाहिलंत? त्यांनीं त्याला दिला, आणि त्यानं आपल्या रांडेला दिला!

**झुंजार०**—(त्वेषानें) असं वाटतं, कीं हालहाल करून त्याचा प्राण घ्यावा. (प्रेमानें) बायको काय पण! खुप छानदार! खुप सुरेख! फारच गोड!

**जाधव०**—पण धनीसाहेब, तें विसरायचं आतां.

**झुंजार०**—(त्वेषानें) आज रात्रीं तिचा चेंदामेंदा करतों, मुडदा पाडतों. कारण हें पहा–माझं हृदय काय शुद्ध पाषाण बनलं आहे; हा हात सुद्धां झणझणतो पहा. (प्रेमानें) पण जाधवराव, तिच्यापेक्षां खपसुरत बायको दुनियेंत नाहीं सांपडायची. बादशहा शेजारीं तख्तावर बसून त्याला हुकूम करावा, अशी तिची योग्यता.

**जाधव०**—धनीसाहेब, आतां हा आपला रस्ता नव्हे.

**झुंजार०**—तिला ठार मारणारच; पण तिची वास्तविक योग्यता तुला सांगितली. कशिदा काढण्यांत किती

कुशल! कंठ किती मंजूळ! गायला लागली म्हणजे जंगली पशूंनीं सुद्धां आपला स्वभाव विसरावा बरं! तसंच चातुर्य काय! कल्पनाशक्ति किती अचाट!

**जाधव०**—म्हणूनच तर सर्व बिघडलं.

**झुंजार०**—कबूल; पण स्वभाव किती भोळसर!

**जाधव०**—फारच भोळसर धनीसाहेब; फाजील भोळसर.

**झुंजार०**—तें खरं; पण जाधवराव, तिची दया येते हो, दया येते!

**जाधव०**—त्यांच्या कुकर्माबद्दल जर आपण इतके हळहळतां, तर मग बदकर्म करण्याबद्दल त्यांना एक सनदच करून द्या म्हणजे झालं; हो, या गोष्टीची आपल्याला जर खंत नाहीं, तर दुसऱ्या कुणाला असणार?

**झुंजार०**—( अति त्वेषानें ) तिचे ठिकरी ठिकरी एवढे तुकडे उडवितों—माझ्याशीं बेमानपणा!

**जाधव०**—हें फार वाईट केलं त्यांनीं.

**झुंजार०**—जाधवराव, थोडं जहर द्या आणून; म्हणजे आज रात्रीं बोलत सुद्धां नाहीं तिच्याशीं; कारण तिच्या सुंदर शरीराकडे पाहून, माझा निश्चय ढळेल कदाचित्. म्हणून म्हणतों वीष द्या आणून.

**जाधव०**—छे छे, धनीसाहेब वीष नाहीं उपयोगी; जो बिछाना त्यांनीं भ्रष्ट केला, त्याच्यावरच नरडं दाबून प्राण घ्या.

**झुंजार०**—शाबास! शाबास! खाशी तोड काढलीत, उत्तम!

**जाधव०**—झालं; पिलाजीरावाची व्यवस्था माझ्याकडे लागलीच. मध्यान्हरात्रीं आपल्याला खबर पोंचिवतों.

**झुंजार०**—ठरला बेत.–पण हे कोण येत आहेत?

**जाधव०**—( पाहून ) हे–आपले वेणीपूरचे दादासाहेब वाटतं; हो तेच. बरोबर माईसाहेबही आहेत.

( **धनाजीराव, दादासाहेब, कमळजा,** वगैरे येतात. )

**धनाजी०**—( रामराम, कुशलप्रश्न झाल्यावर ) सरकारचा हा हुकूम–(एक मोहोरबंद लखोटा देतो; झुंजारराव फोडून वाचूं लागतो.)

**कमळ०**—बरं दादासाहेब, आणखी कांहीं खबर?

**धनाजी०**—कांहीं विशेष नाहीं; पिलाजीराव मुतालिक खुशाल?

**जाधव०**—आहेत, जीवंत आहेत.

**धनाजी०**—ह्मणजे?

**कमळ०**—ह्मणजे काय! आतांशीं त्यांच्यावर स्वारींची फार खप्पा मर्जी झाली आहे; पण तुह्मी आलांत, आतां टाकालच जुळवून तेवढं.

**झुंजार०**—अगदीं खात्री!

**कमळ०**—काय ह्मटलं स्वारींनीं?

**झुंजार०**—( वाचूं लागतो ) हुकुमाप्रमाणें करण्यास चुकूं नये, जर–

**धनाजी०**—तुला नाहीं बोलले, हुकूम वाचताहेत ते. पिलाजीरावांचा आणि यांचा बेबनाव झाला आहे का?

**कमळ०**—किती पण? तो जर निघेल, तर खासं होईल. कारण पिलाजीरावावर माझा फार लोभ आहे.

**झुंजार०**—भडका होतो अंगाचा!

**कमळ०**—काय ह्मटलं?

**झुंजार०**—मोठी शहाणी!

**कमळ०**—( दादास ) स्वारी रागावली आहे वाटतं?

**धनाजी०**—तो हुकूम वाचून कदाचित् रागावले असतील; कारण, मला वाटतं, पिलाजीरावांना इथं सरलष्कर नेमून यांना परत बोलावलं आहे.

**कमळ०**—खरंच, हें ऐकून मला आनंद झाला!

**झुंजार०**—आणि तूं इतकी हुरळलीस, हें पाहून मलाही आनंद झाला.

**कमळ०**—तें कां?

**झुंजार०**—चल बेशरम! ( तिला मारतो. )

**कमळ०**—( रडत ) हें काय पण हें! मीं काय केलं?

**धनाजी०**—छे! अति झालं हें. हा प्रकार मीं प्रत्यक्ष पाहिला ह्मणून जरी सांगितलं, तरी वेणीपुरांत कुणाला खरं वाटायचं नाहीं. ती पहा रडते बिचारी!

**झुंजार०**—अहो मानभावी रडणं हें. अवदसा! चल, निघ इथून.

**कमळ०**—आपल्याला राग येत असेल, तर जातें बापडी. ( जाऊं लागते. )

**धनाजी०**—खरी आज्ञाधारक बायको! मेहरबानीकरून परत बोलवा तिला.

**झुंजार०**—( रागानें ) अग ए!

**कमळ०**—( परत येऊन ) काय आज्ञा आहे?

**झुंजार०**—( तिजकडे पहात धनाजीस ) ही आली, काय करणार हिचं?

**धनाजी०**—( आश्चर्यानें ) कोण मी?

**झुंजार०**—हो, तुह्मींच सांगितलंना परत बोलवायला? अहो, ती अशी शंभरदां परतेल, आणि शंभरदां जाईल; रडेल, पाहिजे तें करील.—तुह्मी ह्मणतां तशी आज्ञाधारक आहे ती; मोठी आज्ञाधारक! (तिला) चालूं द्या रडणं. (त्याला) या हुकुमासंबंधानं–(तिला) खूप सोंग आणलं आहे रडायचं! (त्याला) मला परत बोलावलं आहे.–(तिला) चल जा. मग बोलावीन तेव्हां ये. (त्याला) सरकारचा हुकूम मला मान्य आहे. (तिला) निघ इथून! (ती रडत जाते.) त्याप्रमाणं पिलाजीरावाला अधिकार देतों. तुमची भेट झाली, आनंद झाला.–सगळा चोरांचा बाजार आहे बाहांचो—! (जातो.)

**धनाजी०**—आमच्या दरबारचे रणशूर, धैर्याचे सागर, निष्कलंक, सद्गुणांचे पुतळे, ते हेच का झुंजारराव?

**जाधव०**—छे! फार फरक पडला आहे अलीकडे.

**धनाजी०**—अक्कल तरी ठिकाणीं आहे कीं नाहीं? मला वाटतं यांचं डोकं बिघडलं असावं.

**जाधव०**—हो, हें असं आहे; यापेक्षां जास्त कांहीं मी बोलत नाहीं. असावं तसं नसेल, तर व्हावं, असा मी नवस करतों!

**धनाजी०**—प्रत्यक्ष बायकोला मारणं ह्मणजे काय?

**जाधव०**—हें तर चांगलं नव्हेच, पण एवढ्यावरच भागलं ह्मणजे मिळिवली ह्मणायची!

**धनाजी०**—हें असं नेहमीं चालतं का? कीं हुकूम वाचून नवीनच उद्भवलं?

**जाधव०**—काय सांगूं? मला पुष्कळ ठाऊक आहे,

पण तें मीं सांगणं रास्त नव्हे. इतकं कशाला? तुह्मीच पहा आतां त्यांची तऱ्हा ह्मणजे झालं!

**धनाजी०**—झुंजारराव असे निघतील, हें स्वप्नीं सुद्धां नव्हतं.

( जातात. )

## प्रवेश दुसरा—स्थळ खोली.

( **झुंजारराव** व **सारजा** येतात. )

**झुंजार०**—तुझ्या कांहीं दृष्टीस पडलं नाहीं?

**सारजा**—दृष्टीस पडलं नाहीं इतकंच नव्हे, तर कधीं ऐकलं नाहीं, कधीं संशय सुद्धां नाहीं.

**झुंजार०**—पण तिला आणि पिलाजीरावाला एके ठिकाणीं पाहिलं आहेस तूं?

**सारजा**—हो, पुष्कळदां; पण त्यांत काय? त्या दोघांचं बोलणं मीं अगदीं खडानखडा ऐकलं आहे.

**झुंजार०**—त्यांच्या कधीं कानगोष्टी चालत नव्हत्या?

**सारजा**—कधीं नव्हत्या.

**झुंजार०**—तीं दोघं खोलींत असतांना, त्यांनीं तुला कधीं बाहेर नाहीं पाठिवलं?

**सारजा**—छे! मुळींच नाहीं.

**झुंजार०**—पंखा आणायला म्हणून? पाणी आणायला म्हणून? कशालाही नाहीं?

**सारजा**—कद्धीं नाहीं महाराज, खरंच नाहीं.

**झुंजार०**—( अविश्वासानें ) मोठं आश्चर्य आहे तर मग!

**सारजा**—त्यांचं पाऊल तिळभर दिखील वांकडं

नाहीं, हें मी खात्रीनं सांगतें; खोटं झालं तर मान उतरून देईन. त्यांच्याविषयीं आपल्या मनांत भलताच संशय आला असेल, तर तो काढून टाका कसा. अगदीं अगदीं खोटा! कुणीं दुष्टानं आपले कान भरून टाकले असतील, त्या मेल्याचा देव सत्यानास करील! आमच्या माईसाहेब जर खऱ्या पतिव्रता नव्हत, तर या जगांत पतिव्रता तरी कोण मेल्या?

**झुंजार०**—(कांहीं वेळ टक लावून) बरं जा, तिला पाठवून दे इकडे. (ती जाते.) सांगितलंन इतकं बस्स आहे; पण तितकं तरी कुठं स्पष्ट सांगितलंन. पक्की वस्ताद रांड! असल्या गोष्टीची म्हणजे मोहोरबंद पेटी! पाहिजे तितक्या शपथा वाहील, पण शब्द नाहीं फुटायचा बाहेर. पुरी माहित आहे मला.

(**कमळजा** व **सारजा** येतात.)

**कमळ०**—(भीत भीत) कां बोलावलं होतं?

**झुंजार०**—(हातानें खुणावून) ये अशी इकडे.

**कमळ०**—(जवळ जाऊन) काय आज्ञा आहे?

**झुंजार०**—पाहूं तुझे डोळे, वर पहा अशी माझ्या तोंडाकडे.

**कमळ०**—(घाबरून) ही काय बाई भलतीच कल्पना!

**झुंजार०**—(सारजेस) तुला एक काम सांगतों. आह्मी इथं आहों, बाहेर जाऊन दार बंद कर; कुणी आलं तर खाकर, नाहीं तर दुसरी कांहीं खूण कर. हें चोरकसब तुला शिकवायला नको ह्मणा; सरावांतलंच आहे. चल, उभी कां? जा आपल्या कामाला.

(**सारजा** घाबरून पहात पहात जाते.)

**कमळ०**—याचा अर्थ काय महाराज ? या आपल्या बोलण्यावरून आपल्याला मनस्वी संताप आला आहेसं दिसतं; पण काय ह्मणतां कोण जाणे.

**झुंजार०**—कां, कोण आहेस तूं ?

**कमळ०**—मी आपली खरी खरी धर्मपत्नि आहें.

**झुंजार०**—( तिचं मनगट धरून ) घे अशी शपथ; मी आपली खरी धर्मपत्नि आहें ! घे शपथ अशी आणि पड नरकांत जाऊन.

**कमळ०**—आहें कीं नाहीं तें ईश्वराला ठाऊक.

**झुंजार०**—( तिचा हात झुगारून ) ईश्वराला पक्कं ठाऊक आहे, कीं तूं भ्रष्ट आहेस.

**कमळ०**—महाराज मी भ्रष्ट ! कुणीं मला भ्रष्ट केलं ? कशी भ्रष्ट मी ?

**झुंजार०**—( तिची संतप्त मुद्रा पाहून, गहिंवरून, आलिंगनासाठीं हात पसरून ) आहा ! लाडके !–पण जा, जा, जा, इथून !

**कमळ०**—देवा ! कायरे संकटाचा दिवस उगवला हा ! डोळ्यांतून पाणी कां काढतां महाराज ? मी तर नाहींना कारण झालें ? माझ्या बाबांनीं आपल्याला परत न्यायची खटपट केली असा कदाचित् आपल्या मनांत संशय आला असेल; पण त्याला मी काय करूं ? आपलं आणि त्यांचं विटलं, तेव्हांच ते मला अंतरले.

**झुंजार०**—देवाच्या मनांत मला दुःखांत कुजवून माझी कसोटी पहायचं आलं असतं, त्यानं माझी कितीही हाल अपेष्टा केली असती, मला अगदीं भुकेबंगाल करून टाकलं असतं, निराश करून जन्मभर कैदेंत कोंडला असता, तरी मी फारसा डगलों नसतों; पण लोकांनीं

एकसारखीं बोटं दाखवावीं ह्मणून, परमेश्वरा, मला काय-मचा पुतळा करून ठेवलास, हें मी कसं सहन करूं ! कदाचित् हेंही मोठ्या खुषीनं सहन केलं असतं; परंतु जिथं मीं माझा दिल् सांठवून ठेवला, फक्त जिथं माझा प्राण सर्वस्वी लटकून राहिला, तिथून मला खेंचून काढावं ! अगर तिथं दुसऱ्यांनीं हवा तो गोंधळ घालून मीं नुसती रखवालदारी करावी, हें कसं सहन करूं ? कसं सहन होईल मला ? असली सहनशीलता कशी धरूं ?

**कमळ०**—माझ्या आचरणाबद्दल तर आपल्याला संशय नसेलना ?

**झुंजार०**—तुझ्या आचरणाबद्दल संशय ! भलतंच ! तूं केवढी पतिव्रता ! तारा मंडोदरी सुद्धां तुझ्यापुढं कांहीं नव्हत. यापेक्षां झाली नसतीस तर बेहेत्तर होतं.

**कमळ०**—असं माझ्या हातून चुकून पातक तरी कोणतं घडलं ?

**झुंजार०**—कोणतं घडलं ? तुझी ही सुंदर गोरीपान मूर्ति 'कसबीण' हा शिक्का मारण्याकरतां घडिवली वाटतं ? पातक कोणतं घडलं ह्मणते ! बेशरम ! तुझ्या पातकांचा नुसता उच्चार करीन, तर लज्जा जळून खाक होईल. ( वर दाखवून ) तें पहा, चंद्रानं सुद्धां डोळे झाकले, वारा पृथ्वीच्या पोटांत दडून बसला, आणि काय पातक घडलं ह्मणते, रांड !

**कमळ०**—देवा शपत ! आपण माझ्यावर ही नुसती आग पाखडतां बरं.

**झुंजार०**—काय ? तूं व्यभिचार नाहीं केलास ! नाहीं केलास ?

**कमळ०**—कोणाही परपुरुषाचा स्पर्श होऊं न देतां, फक्त हें शरीर आपल्याला अर्पण केलं, हाच जर व्यभिचार असेल तर कोण जाणे, पण याशिवाय मीं कांहीं व्यभिचार केला नाहीं.

**झुंजार०**—खरं सांगतेस हें ?

**कमळ०**—खोटं सांगत असेन तर माझ्या सर्वांगाला किडे पडतील.

**झुंजार०**—असं असेल तर चूक आहे माझी, क्षमा कर; मी समजलों कीं झुंजाररावाशीं ज्या सोदीनं लग्न लावलं, तीच तूं. पण चुकलों माफ कर. (दाराशीं जाऊन) ए नरकाचं दार राखणारे, (सारजा येते.) झालं आमचं काम, दार लाव, आणि ही गोष्ट कुठें फोडूं नकोस. (जातो.)

**सारजा**—काय बाई ! यांच्या मनांत काय भरलं आहे कोण जाणे ! माईसाहेब; माईसाहेब, काय चाललं आहे ?

**कमळ०**—अर्धी झोंपेंत आहें मी.

**सारजा**—महाराजांना असं काय झालं आहे आज ?

**कमळ०**—कोणाला ?

**सारजा**—महाराजांना.

**कमळ०**—महाराज कोण ?

**सारजा**—हें काय माईसाहेब ! आपले महाराज.

**कमळ०**—सारजाबाई, मला महाराजबिराज कुणी नाहीं; तुह्मी कांहीं विचारूं नका आतां. माझ्यानं धड रडवतसुद्धां नाहीं; जाधवरावांना तेव्हडे मी बोलावतें ह्मणून घेऊन या, जा.

**सारजा**—कांहींतरी झालं आहे खास. ( जाते. )

**कमळ०**—( आपल्याशीं दुःखानें ) त्यांनीं माझा असा छळवाद करावा हें नीटच आहे, अगदीं बरोबर ! इतका माझ्यावर गहजब उडवून त्याचं त्यांना कांहींच वाटूं नये, असं देवा, माझ्या हातून झालं तरी काय ?

( **जाधवराव** व **सारजा** येतात. )

**जाधव०**—काय हुकूम आहे माईसाहेब ? ठीक आहेना ?

**कमळ०**—( रडत ) माझ्यानं नाहीं सांगवत. लहान मुलांना कांहीं शिकवायचं झालं, तर सामोपचारानं थोडथोडं शिकिवतात; तसं त्यांच्या मनांतून मला धाक दाखवायचा होता, तर हळूहळू तरी दाखवायचा होता. कारण या कामांत मी अगदीं अजाण आहें, जाधवराव.

**जाधव०**—( घाबऱ्या शब्दांनीं ) काय, काय झालं माईसाहेब ?

**सारजा**—आतां महाराज बाईसाहेबांना, निर्मळ मनाला सहनसुद्धां व्हायचं नाहीं, असं भलतंभलतं अचकट विचकट बोलले; ( हळूच ) तूं कसबीण आहेस, असं—

**कमळ०**—मी तशी काहो आहें जाधवराव ?

**जाधव०**—कशी माईसाहेब ?

**कमळ०**—त्यांनीं मला ह्मटलं, ह्मणून सारजाबाई सांगतात तशी ?

**सारजा**—सांगितलं ना ? ते यांना कसबीण ह्मणाले; एखादा भिकारडा दारूबाज दारूच्या धुंदींत आपल्या राखेलासुद्धां असं ह्मणायचा नाहीं.

**जाधव०**—पण असं ह्मणायचं कारण काय ?

**कमळ०**—कोण जाणे. (रडत) एवढं मला पक्कं ठाऊक आहे, कीं मी कांहीं तशी नाहीं.

**जाधव०**—छे! छे! रडूं नका माईसाहेब. (आपले डोळे पुशीत) काय प्रसंग हा !

**सारजा**—मोठमोठ्या सरदारांचे मुलगे टाकले, प्रत्यक्ष बापाची मर्जी मोडली, जातगोतावर पाणी सोडलं, तें कसबीण म्हणून घेण्याकरतां का ? कुणाला नाहीं रडूं यायचं अशानं ?

**कमळ०**—हे सारे माझ्या फुटक्या नशिबाचे खेळ आहेत !

**जाधव०**—काय हा त्यांचा वेडेपणा ! पण हें कुठून शिरलं त्यांच्या डोक्यांत ?

**कमळ०**—(डोळ्यांस पदर लावून) ईश्वराला ठाऊक !

**सारजा**—कुणीतरी अधम चांडाळ, हांजीहांजीखोर, दगलबाज, मात्रागमनी, लुच्चा असेल, त्यानं आपल्याला एखादी जागा मिळावी म्हणून हें कुभांड रचलं आहे, अगदीं खात्रीनं सांगतें; खोटं झालं तर मान कापून देईन.

**जाधव०**—(न डगतां) चल ! भलतंच बोलते कांहींतरी ! इतका हरामखोर आहे कोण इथं ?

**कमळ०**—असलाच कुणी; तर देवा, क्षमा कर त्याच्यावर.

**सारजा**—(संतापानें) क्षमा काय ह्मणून ? गळफांस घालावा, आणि मेल्याच्या अस्थि नरकांत फेकून द्याव्या !

त्यांनीं काय ह्मणून यांना कसबीण ह्मणावं? कुणाशीं? कुठें? केव्हां? कसं? कशावरून? कुणीतरी हलकट सोद्या मांगानं ही गोष्ट महाराजांच्या मनांत भरवून दिली आहे. देवानं असं करावं हवं तर, कीं त्या बेरडाला जगापुढें ओढावा, नागवा उघडा करावा, एकेक भल्यामाणसाच्या हातांत एकेक भला भक्कम असूड देऊन, त्या चांडाळाची साऱ्या दुनियेभर चामडी लोळवीत धिंड काढवावी.

**जाधव०**—( रागावून घोगऱ्या आवाजानें ) अग, हळू बोल ऐकतील कुणी.

**सारजा**—( ज्यास्त जोरानें ) मला काय त्यांचं भय? असल्या लुच्चांपैकींच एकानं, महाराजांचं आणि माझं सूत आहे, असं सांगून आपले नव्हते का कान फुंकून दिले?

**जाधव०**—( रागानें ) तूं आहेस गधडी! गप्प रहा आतां.

**कमळ०**—जाधवराव, हें त्यांच्या मनांतलं जाऊन पुन्हा माझ्यावर मर्जी बसायला मी काय बरं उपाय करूं? तुह्मी तरी जाऊन दोन गोष्टी सांगा. जगदंबेची शपत घेऊन सांगतें, कीं कधीं माझं मन दुसरीकडे धांवलं असेल, कधीं पापबुद्धीनं मीं भलत्याकडे पाहिलं असेल, कुणाचं बोलणं ऐकलं असेल, किंवा आजपर्यंत तर नाहींच, पण पुढें त्यांनीं मला लोटून दिलं, माझे हाल वनवास झाले, तरी सुद्धां जर माझं प्रेम तिळभर ढळलं, तर माझे जन्मभर हालहाल होवोत! त्यांच्या गैरमर्जीनं माझं सगळं जिणं निर्फळ झालं, तरी माझ्या मनांतल्या निर्मळ प्रीतीला कद्धीं डाग लागायचा नाहीं. कसबीण! अगबाई! हें

पहा—तो शब्द सुद्धां ह्मणवत नाहीं, नुसत्या शब्दानं जर इतकी खंती येते, तर दुनियेची दौलत मिळाली तरी, तें नांव मिळवायचं कसब माझ्या हातून कसं होईल बरं ?

**जाधव०**—आपण स्वस्थ असा माईसाहेब, ही त्यांची लहर कांहीं फार दिवस टिकायची नाहीं. कांहीं दरबारी कामावरून तब्बेत खवळून तो राग आपल्यावर काढला आहेसं दिसतं.

**कमळ०**—दुसरं कांहीं नसेल तर—( हुंदके देते. )

**जाधव०**—हेंच; मी खात्रीनं सांगतों. आतां रडूं नका. लवकरच सर्व ठीक होईल. ही पहा. दादासाहेब वगैरे मंडळी आली; जेवायला चला आतां. कांहीं काळजी करूं नका.

( **कमळजा** व **सारजा** जातात; **रंभाजीराव** येतो. )

**जाधव०**—कां रंभाजीराव, कांहीं जास्तकमी ?

**रंभाजी०**—( त्रासानें ) बस्स ! तुह्मी आमच्याशीं नेकीनं वागत नाहीं असं दिसतं.

**जाधव०**—( किंचित् हंसत ) तर कसा वागतों ?

**रंभाजी०**—दररोज कांहीं तरी नवी हिकमत लढवून आमची तुह्मीं टोलवाटोलवीच चालिवली आहे; यावरून असं धोरण निघतं, कीं तुमच्यापासून काम होण्याची तर आशा लांबच, पण उलट आह्माला गोत्यांत मात्र घालतां आहां. खरं सांगतों—याउप्पर कांहीं आपल्याला हें खपायचं नाहीं; तसंच आजपर्यंत आमच्याच मूर्खपणानं आह्माला जो चट्टा बसला, त्याबद्दल तोंड बांधून स्वस्थ बसावं, असंही वाटत नाहीं.

**जाधव०**—पण माझं ह्मणणं तर ऐका.

**रंभाजी०**—नको, पुष्कळ ऐकलं; दमलों ऐकून ऐकून; कारण तुह्मी बोलतां एक-आणि करतां एक.

**जाधव०**—हा तुह्मी माझ्यावर निव्वळ खोटा दोष ठेवतां बरं.

**रंभाजी०**—बिलकुल खोटा नाहीं. मी बरोबर आणलेला सर्व पैसा उधळून बसलों. कमळजेला देण्याकरतां तुह्मी जें जडजवाहीर माझ्यापासून नेलंत, तेवढ्यानं एखादी महापतिव्रतासुद्धां अर्धी अधिक वळली असती. तुह्मीं सांगितलंत, कीं तिनं तें जवाहीर मोठ्या खुषीनं घेतलं; आणि 'लवकरच भेट बैठकीचा योग जुळून आनंदी-आनंद होईल,' असा तिचा उलट निरोप मला पोंचिवलात, पण त्यांतलं कांहींच नाहीं अजून!

**जाधव०**—(हंसत) चालूं द्या, ठीक चाललं आहे; उत्तम!

**रंभाजी०**—(संतापून) चालूं द्या! ठीक चाललं आहे! चालूं द्या ह्मणण्यांतला मी मनुष्य नव्हें; ठीक चाललं आहे, उत्तम! हें बोलणं आमच्यापाशीं नाहीं चालायचं, समजलां? माझी खात्री झाली आहे, कीं ही तुमची दगलबाजी आहे, आणि यांत तुह्मी मला सफाई बुडिवलंत.

**जाधव०**—(मान डोलवीत व हंसत) फार उत्तम!

**रंभाजी०**—तुह्माला बजावून सांगतों, हें काम फार उत्तमांतलं नव्हे; मी समक्ष जाऊन तिची गांठ घेईन; तिनं माझं जवाहीर परत दिलं तर बरंच झालं. तिचा नाद सोडून, तिच्यावर वांकडी नदर ठेवल्याबद्दल कान पिळून घेईन. पण तिनं जर तें परत दिलं नाहीं, तर राजश्री, याद राखा, मी तुमच्यापासून भरून घेईन.

**जाधव०**—चिंता नाहीं, रास्त बोललांत.

**रंभाजी०**—( चढून ) नुसतं बोललों नाहीं—बोलल्याप्रमाणं करून दाखवितों तर होय ह्मणा!

**जाधव०**—( त्याची पाठ थोपटून ) भले बहाद्दर! आहे, तुमच्या आंगांत पाणी आहे. आजपर्यंत मी भलतंच समजत होतों. ( त्याचा हात धरून ) रंभाजीराव, असे इकडे या; माझ्याविषयीं तुमच्या मनांत संशय आला तो रास्त आहे; पण शपतेवर सांगतों, कीं तुमच्या कामांत मी फार नेकीनं वागलों.

**रंभाजी०**—( रागानें ) मग ती दिसली नाहीं कुठें?

**जाधव०**—कबूल—दिसली नाहीं ही गोष्ट कबूल आहे; आणि तुमचा संशयही वाजवी आहे. पण रंभाजीराव, ( पाठ थोपटून ) तुमच्यांत जर तें असेल—आहे असं आतांच्या झोंकावरून दिसतं—ह्मणजे पक्का निर्धार, धैर्य आणि शौर्य—तर आज रात्रीं दाखवा, कीं उद्यां रात्रीं कमळजा तुमची. हें खोटं झालं तर पाहिजे ती हुन्नर लढवून मला या जगांतून पार उडवून टाका, मग झालं!

**रंभाजी०**—( मऊ पडून ) बरं, पण करायचं काय? तें माझ्या अकलेंतलं आणि अवसानांतलं आहे का?

**जाधव०**—( विषय सोडून ) तें सांगतों, पण झुंजाररावाच्या जागीं पिलाजीरावाची नेमणूक करण्याकरितां दादासाहेब सरकारचा हुकूम घेऊन वेणीपुराहून मुद्दाम इथं आले आहेत, ही बातमी आहे का आपल्याला?

**रंभाजी०**—नाहीं बुवा; असं असेल तर झुंजारराव तिला घेऊन वेणीपुरास परत जाईल.

**जाधव०**—नाहीं, तो तिला घेऊन दुसरीकडेच जा-

णार आहे. आतां त्याचं जाणं तहकूब करायला कांहीं नवाच प्रसंग जुळवून आणला पाहिजे; आणि तसा बिनतोड प्रसंग ह्मणजे पिलाजीरावाची उचलबांगडी.

**रंभाजी०**—ती कशी करायची ?

**जाधव०**—कशी ह्मणजे ! सरलष्करीच्या कामीं नालायक करायचा—अहो कपाळमोक्ष !

**रंभाजी०**—(दचकून भीत भीत) कपाळमोक्ष ! आणि हें काम तुह्मी मला सांगणार वाटतं ?

**जाधव०**—अलबत; जर तुमच्या आंगांत आपला खरा फायदा करून घ्यायची हिम्मत असली तर केलं पाहिजे. पिलाजीराव रात्रीं आपल्या रखेलीच्या घरीं जाणार आहे, तिथं मीही जाईन; या नेमणुकीची कांहीं त्याला अजून खबर नाहीं,—तुह्मी पाळतीवर असा—मध्यान्हींच्या सुमाराला तो तिथून बाहेर पडेल अशी मी तजवीज करतों. चांगला टप्प्यांत आला, कीं द्या उडवून; मी आहेंच साथीला—तुह्मी आह्मी मिळून उरकून टाकूं ह्मणजे झालं. (हात धरून) चला, असे आ पसरून नका उभे राहूं. चला माझ्याबरोबर, ह्मणजे हा बार उडिवलाच पाहिजे अशी तुमच्या दिलाची खात्री करून देतों. रात्र होत चालली—चला—लौकर.

**रंभाजी०**—(जातां जातांच थांबून) पण याबद्दल आणखी खुलासा झाला पाहिजे,—त्याशिवाय—

**जाधव०**—अहो हवा तितका खुलासा करतों मग, झालं ? चला.

(त्याला ओढीत नेतो.)

## प्रवेश तिसरा—वाडा.

(झुंजारराव, धनाजीराव, कमळजा, सारजा.)

**धनाजी०**—सरलष्करसाहेब, कशाला तसदी घेतां उगीच ?

**झुंजार०**—तसदी कसली यांत ? पाय मोकळे झाले ह्मणजे तितकी मलाच हुषारी वाटेल.

**धनाजी०**—माई, तूं जा आतां. ("बरं" ह्मणून ती जाऊं लागते.)

**झुंजार०**—आपण पुढें व्हा, मी आलोंच–अग–(जवळ जाऊन) याच पावलीं खोलींत जाऊन नीज; मी हा इतक्यांत परत येतों. सारजाबिरजा कुणी नको जवळ समजलीस ?

**कमळ०**—होय. (झुंजारराव व धनाजीराव जातात.)

**सारजा**—(ते गेले असं पाहून) मघांपेक्षां तब्येत जरा निवळलेली दिसते, नाहीं ? त्यांनीं काय सांगितलं आतां ?

**कमळ०**—मी इतक्यांत परत येतों, तूं जाऊन नीज, आणि सारजासुद्धां जवळ नको, असं सांगून गेले.

**सारजा**—मी जवळ नको ?

**कमळ०**—हो, असं सांगितलं खरं; आपल्याला आतां त्यांचा हुकूम मोडून उपयोगी नाहीं; तेवढा माझा लग्नां-तला शालू काढून ठेवा आणि जा तुह्मी.

**सारजा**—खरंच माईसाहेब, तुमचं आणि त्यांचं कधीं दर्शनच झालं नसतं, तर बरं होतं ! (शालू काढूं लागते.)

**कमळ०**—भलतंच ! मला नाहीं बाई असं वाटत. त्यांच्यावर माझी प्रीतीच तशी आहे; ह्मणून त्यांचा तो

हट्टी स्वभाव, तें दापणं, त्या कपाळाच्या आठ्या, मला किं नाहीं फारच मौजेच्या दिसतात.

**सारजा**—हा शालू नेऊन ठेवतें बिछान्यावर—

**कमळ०**—तरी चिंता नाहीं. (ती आंत जाऊन येते.) देवा! काय आमचीं हीं मनं, किती वेडीं मेलीं!—सारजाबाई, मी जर तुमच्या आधीं मेलें, तर (दाखवून) तो लग्नांतला भर्जरी शेला, ओटी भरल्यावर माझ्या आंगावर घालालना?

**सारजा**—चला—असं काय मेलं अभद्र बोलावं माईसाहेब?

**कमळ०**—लहानपणीं माझ्या एका मैत्रिणीनं मला एक गाणं शिकिवलं होतं—आपलं जुन्या काळचंच आहे—पण मघापासून तें वरचेवर माझ्या मनांत येतं. तें ह्मणतें बरंका—

गाणें. ("यादवराया भाईयारे," या चालीवर.)

चंद्रकांत राजाची कन्या तरुण रूपखाणी ॥
पतिव्रता सद्गुणी शहाणी पतिही वाखाणी ॥ १ ॥
आनंदानं नांदत असतां संचित ओढवलं ॥
कुणी पाप्यानं त्या रायाचं मन दूषित केलं ॥ २ ॥
दूतांकरवीं कांहिं मिषानं रथिं घालुनि तिजला ॥
घोर काननीं एकलि सोडुनि दूत परत गेला ॥ ३ ॥

(मधेंच गळ्यांतलें पेंडें काढीत) बरं हें पेंडें घ्या—आपली माझी खूण ह्मणून घाला गळ्यांत—आणि जा; आतां येतील ते. कुठपर्यंत आलं (विचार करून) हो, 'दूत परत गेला' हें झालं नाहींका? पुढें—

गाईपरि हंबरडा फोडी वक्षस्थळ बडवी ॥
अति शोकाच्या वेगें वनिंचे पशुपक्षी रडवी ॥ ४ ॥
सर्वसाक्ष परमेशा ऐसें काय पाप—

—( मधेंच दचकून. ) काय वाजलं तें ? आले वाटतं ?

**सारजा**—नाहीं माईसाहेब, वारा तो.

**कमळ०**—सर्वसाक्ष परमेशा ऐसें काय पाप केलं ॥

नवनीतासम मन पतिचं तें निष्ठुर कां झालं ॥ ५ ॥
कधीं भंगिली नाहीं आज्ञा नाहिं चुकलि सेवा ॥
या हृदयीं मीं नित्य पूजिली मूर्ति तीच देवा ॥ ६ ॥
स्वप्नींही कधिं ढळली नाहीं प्रीति तयावरची ॥
मर्जी पाहुनि वागत होतें बटिक जशी घरची ॥ ७ ॥

—( मधेंच ) पुढें कोणतं कडवं बरं ?–हो—

असो कुणाला देउं दोष मी दैव जसं माझं ॥
तैसं वाहिन वनीं राहुनी प्राणाचं ओझं ॥ ८ ॥
श्री जगदंबे हात जोडितें राख सुखी पतिला ॥
आयुष्यही दे या पापिणींचं—

—( पुन्हा दचकून ) आतां मात्र आले–उठा, जा तुह्मी.

**सारजा**—छे माईसाहेब, दार तें.

**कमळ०**—माझे बाई डोळे खाजताहेत–हें रडायचं लक्षण नाहीं का ?

**सारजा**—उगीच मेली वेडी समजूत आहे ती.

**कमळ०**—लोक सांगतात ह्मणून ह्मणतें–बाई पुरुष हे, पुरुष बरं का ?–सारजाबाई, कांहीं भलतेसलते छंद करून नवऱ्याच्या नांवाला डाग लावणाऱ्या कांहीं बायका असतील काहो या जगांत ?

**सारजा**—हो, नसायला काय झालं.

**कमळ०**—तुह्माला हें सगळं जग दिलं, तर तुह्मी कराल का असं ?

**सारजा**—हो—करूनसवरून मागमूस सुद्धां लागूं द्यायची नाहीं. असं पहा, आपल्या नवऱ्याला जगाचं राज्य मिळतं तर कां नाहीं करूं ?

**कमळ०**—( शहारा आणून ) नकोग बाई तें जग! आणि मेलं तसं करणं! मला नाहीं वाटत अशी कुणी बायको असेल.

**सारजा**—अशा एक का दोन—खंडोगणती आहेत माईसाहेब. पण मी सांगतें बायकांचं वांकडं पाऊल पडायला त्यांचे नवरेच कारण. आपण पाहिजे तसे ढंग करतात, हवे तसे नाचतात, आणि कांहीं तरी संशय घेऊन आह्माला मात्र काचांत ठेवतात; जरा कांहीं झालं कीं द्या शिव्या, कांहीं चुकलं कीं द्या मार, तोडा अन्न, ठेवा कोंडून—पण हें असं काय ह्मणून ? आह्मी बिचाऱ्या गरीब गाई ह्मणून वाटतं ? पण त्यांना हें कसं नाहीं समजत, कीं आपल्या प्रमाणंच बायकांनाही कांहीं अक्कल आहे, त्यांनाही पहातां येतं, कडू गोड समजतं, त्यांच्याप्रमाणं आह्मालाही विकार होतात, आम्हालाही ख्याल रंग करावासा वाटतो—तात्पर्य, त्यांचा तसा आमचाही पाय घसरतो. हें कां बरं नाहीं ध्यानांत वागवीत ? अहो 'कित्ता तसं वळण' म्हणच आहे अशी.

**कमळ०**—चला सारजाबाई आतां. आई अंबाबाई, वाईट पाहून वाईट करायची मला बुद्धि देऊं नकोस, चांगलं करायची दे. ( जातात. )

**अंक चवथा समाप्त.**

# अंक ५ वा.

## प्रवेश पहिला—रस्ता.

( **जाधवराव** व **रंभाजीराव** येतात. )

**जाधव०**—( जागा दाखवून ) हं, असे इथं आड उभे रहा. या रस्त्यानं समोर येईल तो. तरवार उपसून अगदीं तयार असा; आला अवसानांत कीं द्या खुपसून. अगदीं भिऊं नका—मी हा जवळ आहें तुमच्या. यांत आपला सोक्ष किंवा मोक्ष हें ध्यानांत ठेवून मनाचा पक्का निर्धार करा, समजलं ? ( जाऊं लागतो. )

**रंभाजी०**—( त्याला धरून ) पण तुह्मी अगदीं जवळ असा हं, कदाचित् माझा हात चुकेलबिकेल ह्मणून ह्मणतों.

**जाधव०**—अहो, हा मी, इथं उभा रहातों; डरतां काय असे ? ( पाठ थोपटून ) तरवार सरसावून चांगले पवित्र्यावर उभे रहा.

( दूर जाऊन **पिलाजीरावा**च्या रस्त्याकडे पहातो. )

**रंभाजी०**—( आपल्याशीं ) असल्या कामाची मला मोठीशी हौस आहे असं नाहीं; पण जाधवरावानं याबद्दल माझ्या मनाची खात्री करून दिली आहे, ह्मणून तयार झालों. यांत फक्त एक मनुष्य खपेल, इतकंच !—( तरवारीस ) चल निघ, बघतेस काय ? ( तरवार उपसून ) हां आतां काय, घाव एक आणि तुकडे दोन ! जाते कुठं लंडी !

**जाधव०**—( रंभाजीची कृति पाहून ) या पुळीला खाशी चोळवटून ठेवली आहे; स्वारीला आवेशही बराच चढल्यासारखा दिसतो. आतां हा त्याला ठार करो, किंवा

तो याला करो, किंवा दोघेही एकमेकांला मारोत; कसं झालं तरी आपला हा डाव साधणार. हा वांचला तर कमळजेला देण्यासाठीं ह्मणून मीं याच्याकडून जें जडजवाहीर उपटलं आहे, तें हा परत मागणार; आणि तसं होऊन तर उपयोगी नाहीं; बरं पिलाजीराव जिवंत राहिला, तर तो बेटा सदां तेजस्वी; त्याच्यापुढं आपली छाप काय पडणार ? शिवाय झुंजारराव कदाचित् मीं सांगितलेलं सर्व त्याच्याजवळ ओकेल; ह्मणजे आटपला रोजगार ! छे ! तोही मेलाच पाहिजे. मरूंद्या तर-( ऐकून ) आला वाटतं.

( पाहून **रंभाजीस** सावध रहाण्याची खूण करतो. )

**रंभाजी०**—( पाहून ) होय, तोच हा. ( अवसानांत येतांच हळूच मागून जाऊन वार करतांना ) मरजाव-हराम—

**पिलाजी०**—( मागें उलटून तरवार काढीत ) मेलों असतों. पण आंतल्या चिलखतानं बचावलों; तूं मात्र संभाळ आतां.

( त्याच्या उरांत भोंसकतो. **रंभाजीराव** 'मेलों मेलों' ह्मणत पडतो. **जाधवराव** मागून चोरून येऊन **पिलाजीरावा**च्या पोटरीवर वार करून पळून जातो. )

**पिलाजी०**—अर-र-र- पाय गेला ! धांवा धांवा ! खून हो खून !

**झुंजार०**—( दुरून येत ) पिलाजीरावाचा आवाज हा. जाधवरावानं आपला शब्द खरा केला वाटतं !

**रंभाजी०**—( कण्हत ) अरे-पापी चंडाळ मी-

**झुंजार०**—खरं बोललास.

**पिलाजी०**—धांवा हो कुणी, मशाल, कंदील आणा.

**झुंजार०**—तोच हा. जाधवराव तूं खरा शूर, खरा इमानी, खरा इनसाफी आहेस. आपल्या दोस्ताची

किती कळकळ तुला ! या कामांत तूं माझा गुरु आहेस. ( बायकोस उद्देशून ) छबेले ! तुझा यार तर ठार झालाच, आणि तुझाही घडा भरत आला—हा आलोंच बघ. तुझ्या नेत्रांचा आणि लावण्याचा माझ्या मनावर मोह पडला होता, तो पार नाहींसा झाला. तूं बाटवलेल्या बिछान्यावर तुझ्या रक्ताचाच सडा घालतों पहा आतां ! ( जातो. )

( **धनाजीराव** व **मुधोजीराव** दुरून येतात. )

**पिलाजी०**—गस्तवाला, गांवकरी, कुणी नाहीं काहो ?

**मुधोजी०**—हा कुणी मोठ्यानं ओरडतो—कांहीं दगा आहे.

**पिलाजी०**—अहो कुणी तरी या हो.

**रंभाजी०**—काय दुष्ट चांडाळ मी !

**धनाजी०**—दोन तीन असामी कण्हतात; ही काळोखी रात्र, कदाचित् दगलबाजी असेल; तेव्हां जास्त कुमक आल्याशिवाय पुढें सरसावणं बिनधोक नाहीं.

**रंभाजी०**—नाहीं काहो येत कुणी ? तर मी असाच मरणार—

**धनाजी०**—ऐका—

**मुधोजी०**—एका हातांत कंदील, एका हातांत तरवार घेऊन हा कोण येतो आहे पहा. ( जाधवराव येतो. )

**जाधव०**—कोणहो ? खून खून ह्मणून कोण ओरडतो ?

**पिलाजी०**—अहो मी हो ! मेहेरबानी करून इकडे या.

**जाधव०**—काय झालं हो ?

**मुधोजी०**—हा झुंजाररावाचा निशाणवाला जाधवराव वाटतं ?

**धनाजी०**—तोच–जबर छातीचा मनुष्य आहे.

**जाधव०**—( पिलाजीरावाजवळ जाऊन ) कोण हो तुह्मी ? असे कां ओरडतां ?

**पिलाजी०**—कोण जाधवराव ? पहा कुणीं दरोडेखोरांनीं माझी काय दशा केली ही.

**जाधव०**—( पाय पाहून ) अरे ! अरे ! अरे ! मुतालिकसाहेब ! कुणाचं काम हें ?

**पिलाजी०**—त्यांच्यापैकीं एक जमिनदोस्त होऊन इथंच कुठं आसपास पडला आहे, पहा.

**जाधव०**—अरे बेरडांनों ! ( धनाजीराव व मुधोजीराव यांना ) तुह्मी कोण हो तिकडे ? जरा मदतीला या.

**रंभाजी०**—माझ्याकडे याहो कुणी !

**पिलाजी०**—तोच-तोच-पहा जाधवराव.

**जाधव०**—अरे बेरडा! हरामखोरा; (जवळ जाऊन त्याच्या पोटांत तरवार खुपसतो. तो 'अरे चांडाळा जाधवरावा,' असें ओरडतो; त्याच वेळीं मोठ्यानें) असे काळोखांत माणसांचे प्राण घेतां काय ? कुठं आहेत ते हरामखोर ? शहरांत काय जिकडे तिकडे सामसूम आहे.—अहो खून! खून!—तुह्मी कोण हो ? चोर कीं साव ?

**धनाजी०**—तुम्ही ठरवाल ते.

**जाधव०**—( चपापलेंसें करून ) कोण दादासाहेब ! ओ-

ळखलं नाहीं ! माफी असावी. कुणीं चोरट्यांनीं आमच्या पिलाजीरावाला जखमी करून पाडलं आहे पहा.

**मुधोजी०**—पिलाजीरावांना ? अरे ! अरे ! ( सर्व जवळ जातात. )

**जाधव०**—( कळकळ दाखवून ) मुतालिकसाहेब, कसं आहे आतां ?

**पिलाजी०**—पाय गेला हो गेला ! दोन तुकडे झाले.

**जाधव०**—भिऊं नका—अहो कंदील करा पुढें—आधीं बांधून टाकतों माझ्या पटक्यानं. ( चंपाजी येते. )

**चंपाजी०**—( घाबऱ्या घाबऱ्या ) कोण ? कोण ओरडलं हो आतां ?

**जाधव०**—कोण ओरडलं ?

**चंपाजी०**—( पिलाजीरावास जखमी पाहून ) अरे देवा ! काय झालं हो ?

**जाधव०**—काय खटपटी रांड आहे ! बरं पिलाजीराव, या कामांत तुमचा कुणावर वहीम आहे का ?

**पिलाजी०**—छे, कुणावर नाहीं.

**जाधव०**—अहो एक काचा, पटका कांहीं तरी द्या पाहूं. ( पटक्यानें पाय बांधून ) हां—असं—यांना इथून नीट घेऊन जायला एखादी डोली आणा बरं.

**चंपाजी०**—अरे देवा ! निपचित पडले ! पिलाजीराव ! पिलाजीराव !

**जाधव०**—या कृत्यांत या रांडेचं आंग असावं, असा संशय येतो.—जरा थांबा—पिलाजीराव—पण इकडे कंदील दाखवा बरं; हा चेहेरा ओळखीचा आहे कीं नाहीं

पाहूं. ( रंभाजीरावाजवळ जाऊन एकदम ओरडून ) अरे! अरे! अरे! अहो, हे वेणीपूरचे माझे दोस्त, रंभाजीराव! छे, नव्हेत; नव्हेत काय, तेच.

**मुधोजी०**—कुठले? वेणीपूरचे?

**जाधव०**—होय हो; आपल्या होते का ओळखीचे?

**मुधोजी०**—तर हो.

**जाधव०**—( मुधोजीस ) या धांदलींत मीं आपल्याला ओळखलं नाहीं माफ करा. डोली आलीका–आली, बरं झालं. ( त्यास डोलींत घालतां घालतां ) यांना आतां जपून घेऊन चला. मी जखमा बांधणाराला घेऊन येतों. ( चंपाजीस ) तूं जा आतां. कायहो पिलाजीराव, तो मेलेला माझा दोस्त होता, त्याचं आणि तुमचं कांहीं वांकडं होतं का?

**पिलाजी०**—छेहो, मला त्याची ओळख सुद्धां नाहीं.

**जाधव०**—( चंपाजीस ) कां रांडे, तुझा चेहेरा कां उतरला. नीट संभाळून घेऊन चला. ( त्या दोघांस नेतात. ) (कांहीं जणांस) तुम्ही थांबा जरा. कांग? तूं कां अशी फिकी पडलीस? तुम्हाला नाहीं हिची दृष्टि घाबरलेली दिसत? नीट पहा, म्हणजे यांतच आपल्याला पुष्कळ कळेल. बारीक नजरेनं पहा–दिसतं का कांहीं चेहेऱ्यावर? दिसलंच पाहिजे. जीभ बांधून ठेवली म्हणून पाप कसं झांकेल?

**सारजा**—( घाबरत येऊन ) काय काय झालं?

**जाधव०**—( दुःखी मुद्रा करून ) आमच्या पिलाजीरावांना रंभाजीनं, आणखी दुसऱ्या कांहीं इसमांनीं काळोखांत गांठला. ते बाकीचे निसटले, पण पिलाजीराव फार जखमी झाले आहेत. आणि रंभाजी तर मेलाच ठार.

( मधेंच कांहीं सुचलेंसें करून ) पण पिलाजीराव रात्रीं कुठं होते बरं ? (चंपाजीस) हें ऐकून तूं कां थरथर कांपायला लागलीस ?

**चंपाजी०**—ते माझ्या घरीं होते; पण त्यासाठीं नाहीं मी कांपत.

**जाधव०**—बरं बरं ! ( मंडळीस ) चला, पिलाजीरावांच्या जखमा बांधल्या कीं नाहीं. ( चंपीस ) चलग आमच्या बरोबर. कशी नाहीं खरी हकीगत सांगत तें पाहातों. ( बायकोस ) तूं अशीच जाऊन धनीसाहेबांना आणि माईसाहेबांना, ही सगळी बातमी कळीव; जा लवकर. ( ती गेल्यावर आपल्याशीं ) आज रात्रीं आपण एक चढणार, किंवा सपशेल पडणार. ( सर्व जातात. )

## प्रवेश दुसरा.

( **कमळजा** निजली आहे व जवळ एक दिवा जळत आहे. )

**झुंजार०**—( गंभीर स्वरानें ) मना, तेंच, तेंच कारण ! परमेश्वरा, या तोंडानं मीं त्याचा उच्चार करूं नये, पण कारण तेंच ! ( पुढें येऊन, तिच्याकडे पाहून, एकदम तरवार उपसून ) छे छे ! या कोमल गौरवर्ण शरीरावर ही कठोर तरवार चालवून रक्तपात करणं माझ्या हातून होत नाहीं. ( तरवार म्यानांत घालतो. ) परंतु प्राण हा घेतलाच पाहिजे. नाहीं तर ही आणखी कित्येकांचा असाच दगा देऊन घात करील. ( आवेशानें तिच्याकडे जातो, पण उशाशीं दिवा पाहून थबकतो. ) पण अगोदर दिवा मालवावा, आणि मग ( तिच्याकडे बोट करून ) हा दिवा मालवावा. तो दिवा मालिवला तर वाटेल तेव्हां पुन्हा लावतां येईल; पण लाडके, तुझ्या या अद्वितीय लावण्यमूर्तींतला प्राणदिवा एकदां जर मीं मालि-

वला, तर तो पुन्हा लावतां येईल अशी मंत्रशक्ति माझ्या अंगीं कुठं आहे? हें नाजुक गुलाबाचं फूल जर मीं एकदां खुडलं तर अर्थात् कोमेजूनच गेलं पाहिजे. असो, झाडावर आहे तोंपर्यंत तरी आस्वाद घ्यावा. (चुंबन घेऊन) आहाहा! श्वासाचा काय घमघमाट हा! या योगानं प्रत्यक्ष न्यायाला सुद्धां आपलं शस्त्र मोडून टाकावं अशी वासना होईल. आणखी एकदां—आणखी एकदां (दोनदां चुंबन घेऊन) लाडके, मी तुला मारतों, पण मेल्यावर तूं अशीच रहा, ह्मणजे मी तुझ्यावर पहिल्यासारखी प्रीति करीन. आणखी एकदां—पण हें मात्र शेवटचं. इतकी मोहक असून अशी घातक वस्तु कधींच झाली नाहीं! हे अश्रु वाहूं लागले, पण मोठे दुष्ट आहेत; जिच्यावर प्रेम तिलाच मारायचं अं! काय अलौकिक दुःख हें. (तिची हालचाल पाहून) जागी झाली वाटतं.

**कमळ०**—(दचकून जागी होऊन) कोण तें? (नीट पाहून) आपण का? (उठून) निजायचं ना आतां?

**झुंजार०**—(तोंड फिरवून) आज निजतांना जगदंबेचं स्मरण केलं होतंस?

**कमळ०**—होय, केलं होतं.

**झुंजार०**—(थांबून) बरं, एखाद्या पातकाबद्दल परमेश्वराची क्षमा मागितली नसलीस, तर आतां मागून घे.

**कमळ०**—(घाबरून) ह्मणजे काय महाराज?

**झुंजार०**—चल आटप लवकर; मरणाची तयारी कर.

**कमळ०**—(संशयानें) आपण मला मारणार कीं काय?

**झुंजार०**—होहो, मारणार.

**कमळ०**—तर जगदंबे, घे मला पदरांत!

**झुंजार०**—( देवीस ) मातोश्री, खरंच घ्या हिला पदरांत!

**कमळ०**—( कांहीं धीर येऊन ) तर मग खास आपण मला मारीत नाहीं.

**झुंजार०**—हं ! ( दीर्घोच्छ्वास सोडतो. )

**कमळ०**—तरी मला आपलं भय वाटतं. कारण असे आपण डोळे फिरवूं लागलां, ह्मणजे भयंकर दिसतां. पण पाप ह्मणजे काय, हें जर मला मुळींच ठाऊक नाहीं, तर मीं भ्यावं काय ह्मणून ? तरी देखील मेली भीति वाटते.

**झुंजार०**—( एकदम वळून ) आटप—पापाची आठवण कर.

**कमळ०**—आपल्याशीं अनन्यभावानं वागतें हेंच पातक कीं काय ?

**झुंजार०**—हेंच, हेंच पातक; आणि याकरतांच तुला मारणार.

**कमळ०**—आपल्याशीं अनन्यभावानं वागतें ह्मणून मरण ! हें नव्हतं बाई कधीं ऐकलं. ( त्याची मुद्रा पाहून ) अगबाई ! हें काय ? महाराज, असे दांतओंठ कां चावतां ? विलक्षण संतापानं आपण थरथर कांपायला लागलां, हें काय ? या दुश्चिन्हांचा रोख माझ्यावर तर नाहींना ?

**झुंजार०**—चुप—बोलूं नकोस.

**कमळ०**—( दचकून ) नाहीं बोलत—पण झालं तरी काय असं ?

**झुंजार०**—(क्रूर मुद्रेनें ) झालं तरी काय ! माझा अगदीं जीव कीं प्राण असा दस्तरुमाल मीं तुला दिला, आणि तूं तो पिलाजीला दिलास.

**कमळ०**—पाहिजे त्याची शपत घेऊन सांगतें, कीं मीं कांहीं दिला नाहीं; त्यालाच आणवून विचारा. हवं तर.

**झुंजार०**—( जोरानें तिचा हात धरून ) संभाळ, खोटं बोलूं नकोस, मृत्यूच्या जबड्यांत सांपडली आहेस; आतां तरी खोटं बोलूं नकोस.

**कमळ०**—पण मला पक्कं ठाऊक आहे, कीं आपण कांहीं मला असं एकाएकीं मारणार नाहीं.

**झुंजार०**—नाहीं !–आत्तां–या क्षणीं मी तुझा प्राण घेणार. ह्मणून सांगतों, काय पाप केलं असशील तें जगदंबेपाशीं सर्व कबूल कर. कारण माझी तर बालंबाल खात्री झाली आहे; आतां तूं किती आणा शपता वाहिल्यास, तरी माझा ग्रह कांहीं पालटायचा नाहीं.

**कमळ०**—अंबाबाई ! आतां तुलाच माझी करुणा येऊं दे ! आणि महाराज, आपल्याला देखील आली पाहिजे; कारण आजपर्यंत आपल्या मर्जीबाहेर मी कद्धीं वागलें नाहीं; धर्माची मर्यादा उल्लंघन करून मीं पिलाजीरावावर कधीं लोभ केला नाहीं, किंवा त्याला प्रेमाची खूणही दिली नाहीं.

**झुंजार०**—पुन्हा खोटं बोलतेस बरं ! माझा रुमाल त्याच्या हातांत मीं या डोळ्यांनीं पाहिला.

**कमळ०**—( घोंटाळून ) तर मग तो त्याला सांपडला असेल; मीं कांहीं दिला नाहीं. त्यालाच बोलवून विचारा काय सांगतो तें.

**झुंजार०**—( संतापून ) सांगितलंन त्यानं.

**कमळ०**—काय सांगितलंन ?

**झुंजार०**—तुझ्याशीं व्यभिचार केला ह्मणून.

**कमळ०**—( कानावर हात ठेऊन ) शिव शिव ! तो असं कधीं सांगायचा नाहीं.

**झुंजार०**—आतां कशाला सांगेल ! तोंडच बंद झालं त्याचं; माझ्या जाधवरावानं तेवढी कामगिरी छान बजावली.

**कमळ०**—अगबाई ! तरी मला वाटलंच; तो मेला कीं काय ?

**झुंजार०**—त्याच्या केसागणिक जरी पिलाजी असते, तरी त्या सर्वांचा मीं माझ्या क्रोधांत स्वाहा केला असता.

**कमळ०**—( रडत ) देवारे देवा ! त्याला कपटानं मारून माझा सर्वस्वीं घात केला.

**झुंजार०**—( जोरानें पुढें ओढून ) धडधडीत माझ्यासमक्ष त्याच्याकरतां रडतेस !

**कमळ०**—( त्याच्या पायां पडत ) महाराज, मला घरांतून घालवून द्या, पण मारूं नका.

**झुंजार०**—तें कांहीं नाहीं आतां.

**कमळ०**—आज तरी नको, उद्यां मारा—

**झुंजार०**—नाहीं; आत्तां मारणार ! जर अशी धडपडलीस—

**कमळ०**—( रडत ) एक घटका तरी—( वर हात जोडून ) एकदां स्मरण तरी करतें महाराज—

**झुंजार०**—बस्स ! वेळ नाहीं आतां—( तिला बिछान्यावर पाडून जोरानें तिचा गळा दाबतो; इतक्यांत बाहेर दरवाजावर कोणी हात मारल्याचा आवाज होतो. )

**सारजा**—( बाहेरून ) धनीसाहेब ! अहो धनीसाहेब ! धनीसाहेब !

**झुंजार०**—कोण ओरडतं ? (कमळजेकडे पाहून) अजून नाहीं मेली–पुरी नाहीं मेली अजून ! कितीही कठोर असलों, तरी मला दया आहे; मी तुला मरतांना यातना होऊं द्यायचा नाहीं बरं;–(तोंड फिरवून पुन्हा: जोरानें दावतो) हां–असं–

**सारजा**—( दार वाजवीत ) धनीसाहेब ! अहो धनीसाहेब !

**झुंजार०**—( मोठ्यानें ) कोण आहे तें ?

**सारजा**—आपल्याला कांहीं खबर कळवायची आहे, गांठ पाहिजे.

**झुंजार०**—( तिला ) आलों–( आपल्याशीं ) ही सारजा आली. ( तिला ) थांब जरा. ( कमळजेकडे पाहून आपल्याशीं ) ही मेली आतां. ती बहुतकरून पिलाजीराव मेला ह्मणून सांगायला आली असेल; मोठाच दंगा उडाला होता. हालचाल बंद होऊन अगदीं प्रेतासारखी पडली. तिला आंत घ्यावी कां ? जीव आहे वाटतं ? छे ! आंत घ्यावी, का न घ्यावी ? ती आंत आली तर माझ्या बायकोशीं बोलल्यावांचून राहायची नाहीं. ( दुःखानें ) माझी बायको ! आतां कुठली बायको ! गेली ! केवढं घोर साहस कर्म केलं हें ? मला वाटतं, या प्रसंगीं चंद्रसूर्यांचा पूर्ण खग्रास होऊन भयानं पृथ्वीसुद्धां दुभंगून गेली असेल !

**सारजा**—( मोठ्यानें ) अहो धनीसाहेब !

**झुंजार०**—( दचकून ) मी तुला विसरलोंच, आलों हं–( धांदलींत दार उलटेंच उघडूं लागतो, पण आपली चुकी समजून कांहीं वेळ स्तब्ध उभा राहून नीटपणें दार उघडतो. ) ये–काय खबर आणलीस ?

**सारजा**—आतां तिकडे केवढा खून पडला!

**झुंजार०**—आत्तां?

**सारजा**—हो आत्तां इतक्यांत. पिलाजीरावांनीं वेणीपूरचा रंभाजी ह्मणून होता त्याला ठार मारलं.

**झुंजार०**—कोण रंभाजी मेला? आणि पिलाजीरावही मेलाना?

**सारजा**—नाहीं, ते नाहीं मेले, नुसते जखमी झाले.

**झुंजार०**—पिलाजीराव नाहीं मेला? तर मग हा खून बरोबर नाहीं उतरला; सुडाची गोडी जाऊन तो कडू झाला.

**कमळ०**—( हळू कण्हत ) अन्यायानं–देवा! मारलं–मला–

**सारजा**—( ऐकून–घाबरून ) अगबाई कुणाचा स्वर हा!

**झुंजार०**—हा काय?

**सारजा**—( पुन्हा कण्हणें ऐकून ) अरे देवा! धांवा हो धांवा! माझ्या बाईसाहेबांचा स्वर हा! ( झुंजारराव आडवतो, पण त्याच्या आडविण्यास न जुमानतां, तिच्याजवळ जाऊन रडत ) माईसाहेब! पुन्हा बोलाहो एकदां! बोलाहो! माईसाहेब!–

**कमळ०**—मला निर्दोष–मरण–आलं!

**सारजा**—( त्याच्याकडे पाहून ) कुणाचं बरं कृत्य हें?

**कमळ०**—( कष्टानें ) कुणाचं नव्हे–माझंच. येतें मी!–माझ्यावर लोभ असूं द्या ह्मणून त्यांना सांगा;–ये–तें! (मरते.)

**झुंजार०**—कायग, हिचा कुणीं प्राण घेतला असावा बरं?

**सारजा**—देवाला ठाऊक कुणीं घेतला तो!

**झुंजार०**—पण हें स्वतांचंच कृत्य असं ती ह्मणाली; माझं नव्हे.

**सारजा**—त्या असं म्हणाल्या खरं; खोटं कसं बोलू.

**झुंजार०**—हें पहा—मरतांना सुद्धां खोटं बोलून नरकांत पडायला गेली. मीं—मीं तिचा खून केला.

**सारजा**—तर मग त्या खऱ्या पतिव्रता, आणि तुम्ही मात्र अधम चांडाळ ठरलांत.

**झुंजार०**—तिला पतिव्रता म्हणतेस! अग, जारिणी होती ती—जारिणी.

**सारजा**—अरे राक्षसा! त्यांना जारिणी म्हणतोस? किडे पडतील तोंडाला.

**झुंजार०**—नुसती कसबीण नव्हे—तिच्याही पलीकडची होती.

**सारजा**—अरे मांगा! हें तूं त्या साध्वीवर खोटं कुभांड रचलं आहेस!

**झुंजार०**—पक्या आधारावांचून मीं हें कृत्य केलं असेल तर रौरव नरकांत जाऊन पडेन! पिलाजीरावाशीं ही लागू होती, समजलीस! तुझ्या नवऱ्याला हें सर्व ठाऊक आहे.

**सारजा**—त्यांना ठाऊक आहे?

**झुंजार०**—हो, हो.

**सारजा**—कीं माईसाहेब वाईट चालीच्या होत्या म्हणून?

**झुंजार०**—हो, पिलाजीरावाशीं संबंध होता ह्मणून; अग, ती जर तशी पतिव्रता असती, तर ईश्वरानं मला दुसरं इंद्रभुवन दिलं असतं, तरी मीं तिला मारली नसती.

**सारजा**—कुणाला ठाऊक आहे ह्मटलंत ?

**झुंजार०**—तुझ्या नवऱ्याला, त्यानंच मला प्रथम सांगितलं हें. तो मोठा सच्चा मनुष्य आहे, आणि त्याला असल्या बदमाषगिरीची मोठी चीड आहे.

**सारजा**—त्या अशाअशा आहेत ह्मणून त्यांनीं सांगितलं ह्मणतां ?

**झुंजार०**—( चिडून ) असं वरचेवर काय विचारतेस ? तुझ्या, तुझ्या—नवऱ्यानं—माझ्या जिवलग दोस्तानं—जाधवरावानं सांगितलं; कळलं आतां ?

**सारजा**—तर मग माईसाहेब, कुणीं चांडाळानं खऱ्या प्रेमाचं मातेरं मातेरं करून सोडलं ! त्यांनीं असं सांगितलं असेल, तर त्यांची जीभ झडून पडो ! अगदीं अगदीं खोटं सांगितलं हें. पण तुझ्यासारख्या काळ्या खविसावर त्या आधीं इतक्या कशा भाळल्या होत्या कोण जाणे !

**झुंजार०**—(तरवारीला हात घालून) हां—खबरदार !

**सारजा**—दटावूं नकोस असं—पुन्हा ह्मणतें, माईसाहेब कशा नक्षत्रासारख्या शोभत होत्या आणि तूं मेल्या, त्यांच्यापुढें राहूसारखा दिसत होतास. तुझ्यासारखंच तुझं हें कृत्य—

**झुंजार०**—संभाळ ! जड जाईल !

**सारजा**—जड काय जायचं आहे ! काय करशील ! किती हाल करशील माझे ? करशील त्याच्या दसपट सोसायला तयार आहें. अरे दगडा ! नंदीबैला ! काडीची सुद्धां तुला अक्कल नाहींरे ! इतकं अघोर कृत्य केलंस—तुझ्या तरवारीला नाहीं भीत आतां—शंभरदा मरेन हवी तर. पण

तुझ्या नांवाचा डांगोरा पिटल्याशिवाय रहायची नाहीं. ( मोठ्यानें ओरडून ) धांवाहो धांवा ! धांवा ! धांवा ! या झुंजाऱ्यानं आपल्या बायकोचा खून केला–धांवाहो धांवा !

(**परसोजी, मुधोजीराव** व **जाधवराव** धांवत येतात.)

**परसोजी** व **मुधोजी०**—( गडबडीनें ) काय, काय झालं हो ? ( झुंजाररावास पाहून ) सरलष्करसाहेब !

**सारजा**—( जाधवरावास ) आपण आलां का ? दुसऱ्यांनीं खून करून ते तुमच्या शिरावर घालावेत, फार चांगलं केलंत ! खरे पुरुष असाल, तर याचं खोटं याच्या पदरांत घाला पाहूं–हा ह्मणतो, माझी बायको जारिणी आहे, असं तुह्मीं सांगितलंत; तुह्मी असला मांगपणा करायचे नाहीं, माझी खात्री आहे;–बोला बोला लवकर, सांगितलं का ?

**जाधव०**—मला जें वाटलं तें सांगितलं, आणि तें त्यांच्या अनुभवालाही आलं.

**सारजा**—पण याची बायको तशी आहे ह्मणून कधीं सांगितलं होतंत का ?

**जाधव०**—हो, सांगितलं होतं.

**सारजा**—मग हें तुह्मी खोटं बोललां; अगदीं खोटं बोललां; शपत सांगतें, अगदीं अगदीं खोटं बोललां; निव्वळ अधमपणा केलात. पिलाजीरावाशीं लागू होत्या असं सांगितलं होतंत का ?

**जाधव०**—( रागानें ) हो, हो, पिलाजीरावाशीं–असं सांगितलं होतं. जीभ आटप आतां.

**सारजा**—आतां कसली जीभ आटपते ! बोललंच

पाहिजे; माईसाहेबांचा खून होऊन हें पहा प्रेत पडलं आहे.

**परसोजी व मुधोजी०**—(पाहून) शिव शिव! काय अनर्थ हा!

**सारजा**—आणि (जाधवरावास) तुह्मीं आग लावली ह्मणून खून पडला हा.

**झुंजार०**—हिचं ह्मणणं खरं आहे.

**परसोजी व मुधोजी०**—काय विलक्षण! केवढं अघोर कृत्य हें!

**सारजा**—ही कसाबाची करणी केली हो! माझ्या आतां सगळं ध्यानांत आलं. मी कांहीं आतां यांतून जगत नाहीं; मांगपणा हा! पुरा मांगपणारे देवा!

**जाधव०**—(दटावून) काय तुला वेड लागलं आहे कीं काय? चल जा घरीं.

**सारजा**—यांची आज्ञा मोडूं नये खरी; पण त्याची ही वेळ नव्हे. आतां कशाची घरीं जातें, इथंच माझं मरण.

**झुंजार०**—(बिछान्यावर बसून) अरे! अरे! अरे!

**सारजा**—आतां नुसतं 'अरे अरे' करून काय होतं? या अशा महा साध्वीचा विनाकारण प्राण घेतलास! मोठ्यानं गळा काढून मेल्या रडत बैस आतां!

**झुंजार०**—(उठून) अग, ती साध्वी नव्हती, जारिणी होती. (मुधोजीस पाहून) कोण? काकासाहेब! तुम्ही काय? ही पहा तुमची पुतणी पडली आहे; आतां या हातांनीं तिचा गळा दाबून प्राण घेतला. कृत्य भयंकर हें मी ओळखून आहें.

**मुधोजी०**—( डोळ्यांस पदर लावून ) मुली, तुझा बाप तुझ्या लग्नाच्याच दुःखानं खचून वारला, हें फार उत्तम झालं. तो जर हा प्रसंग पहायला असता, तर त्यानं काय आकांत केला असता हें सांगवत नाहीं.

**झुंजार०**—हें कर्म अघोर खरंच; पण जाधवरावाला माहीत आहे, कीं पिलाजीरावाशीं तिनं हजारवेळ बदकर्म केलंन, आणि ही गोष्ट त्यानंही कबूल केली आहे. शिवाय याला दुसरा पुरावा हाच, कीं मला बाबांनीं एक दस्तरुमाल दिला होता, तो मीं लग्नांत खूण म्हणून हिला दिला; आणि हिनं तो पिलाजीरावास नजर केला. मीं प्रत्यक्ष त्याच्या हातांत पाहिला.

**सारजा**—(भयचकित होऊन कपाळावर हात मारून) अरे नशीबा !

**जाधव०**—( जोरानें ) आतां तूं—खबरदार बोललीस तर !

**सारजा**—आतां तर बोललंच पाहिजे. छे ! आतां माझं तोंड वाऱ्यासारखं चालणार ! देवांनीं, माणसांनीं, भुताखेतांनीं, सर्वांनीं माझी छी ! थूः ! केली तरी मी बोलणारच.

**जाधव०**—पुन्हा सांगतों—शुद्धीवर ये आणि घरचा रस्ता धर.

**सारजा**—तें कांहीं नाहीं आतां.

( **जाधवराव** तिच्यावर तरवार घेऊन धांवतो. )

**मुधोजी०**—( त्यास आडवून ) छे ! छे ! बायकोवर हत्यार !

**सारजा**—अरे वेड्या झुंजाररावा ! तूं ह्मणतोस तो रु-

माल तर सहज मला सांपडला, आणि मीं यांना दिला. एवढासा रुमाल तो काय, पण तो चोरून आण ह्मणून यांनीं माझी एकसारखी पाठ पुरवली होती.

**जाधव०**—काय रांड आहे पहा!

**सारजा**—माईसाहेबांनीं पिलाजीरावाला दिला, हें अगदीं खोटं; मला सांपडला आणि मीं यांना दिला.

**जाधव०**—( तिच्या अंगावर धांवून ) रांडे, खोटं बोलतेस हें!

**सारजा**—देवाशपत! यांत एक अक्षरसुद्धां खोटं नाहीं; अरे ठोंब्या झुंजाररावा! फुकटरे फुकट त्या गाईचा गळा कापलास! मूर्खा, तुला त्या रत्नाची किमत कळली नाहीं!

( **जाधवराव** तिला वार करतो; **झुंजारराव** 'अरे बेरडा' असें ह्मणून त्याच्यावर धांवतो; **सारजा** घायाळ होऊन पडते; **परसोजी** **झुंजाररावा**ची तरवार काढून घेतो; इतक्यांत **जाधवराव** पळून जातो. )

**सारजा**—( कण्हत ) माईसाहेबांजवळ नेऊन ठेवा हो मला. ( तसें करतात. )

**परसोजी**—( मुधोजीरावास ) ही यांची तरवार घ्या, आणि यांना इथून हालूं देऊं नका. हाललेच तर जागच्याजागीं ठार करा. मी जाऊन त्या बेरडाला पकडून आणतों. ( तो जातो व मुधोजीराव बाहेर येऊन उभा राहतो. )

**झुंजार०**—माझं शौर्यच गेल्यावर माझी हातची तरवार एखादा भामट्या सुद्धां हिसकावून घेईल. पण आतां असला खोटा अभिमान तरी कशाला पाहिजे? जाऊं द्या.

**सारजा**—(कण्हत) अरे निर्दया झुंजारराव ! तुझी बायको खरी पतिव्रता होती–खरं होतं तें बोललें–सुखानं मरतें आ–(मरते.)

**झुंजार०**—या खोलींत माझी एक छोटी तरवार आहे ती पाहूं. (शोधून ती घेऊन, मोठ्यानें) काकासाहेब, मी बाहेर येणार.

**मुधोजी०**—(बाहेरून) तुह्मी बिनहत्यारी–मी हत्यारी; अशानं फुकट मराल.

**झुंजार०**—तर तुह्मी आंत येऊन माझ्याशीं बोला; नाहीं तर मी नुस्त्या हातांनींच तुमचा समाचार घेईन.

**मुधोजी०**—(आंत येऊन) काय ह्मणतां ?

**झुंजार०**—(तरवार सरसावतो व मुधोजीराव दचकून मागें सरतो.) हें पाहिलंत हत्यार. याच्या तोडीचं हें एकच. याच हातानं आणि याच हत्यारानं, तुमच्यासारख्या पांच पन्नास जवानांचा गराडा फोडून मी पार गेलेलों मला आठवतं. पण ती फुशारकी आतां कशाला ? नशीबावर कुणाचाही जोर नाहीं. ती सद्दी निघून गेली–भिऊं नका हत्यार पाहून. आटपली माझ्या जन्माची सफर ! हीच शेवटची मजल–इथं तारूं खुंटलं आमचं ! दचकून मागं कां सरतां ? ही फुकट भीति–जरा माझ्यावर हात उचला कीं मी मागं हटलोंच. पण मागं हटून जायचं कुठं ! (कमळजेचें प्रेत पाहून) लाडके, काय तुझ्यावर प्रेतकळा आली ही ! अगदीं निस्तेज झालीसना ? (हात लावून) थंडगार पडली ! केवढा अधम चांडाळ मी ! यमदूत येऊन या पुण्यलक्ष्मीपासून मला फरफर ओढून नेऊन, माझ्या अंगाच्या चिंध्या उडवितील तर बरं; मला गंधकांत होरपळून काढतील,

तर चांगलं ! रसरशीत अग्निकुंडांत झुगारून देतील तर फार उत्तम ! ! ! ( तिचें मस्तक मांडीवर घेऊन ) लाडके ! गेलीसना ! लाडके ! ( रडूं लागतो) हाय हाय !

( **धनाजीराव, परसोजी, पिलाजीराव** ( दुसऱ्यावर भार ठेवून लंगडत, ) मुसक्या आवळलेला **जाधवराव**, इतर कामदार, खवळलेले लोक, वगैरे येतात. )

**धनाजी०**—( पुढें येऊन मुधोजीरावास ) कुठं आहेत ते झुंजारराव ?

**झुंजार०**—( उठून ) हा इथं आहें.

**धनाजी०**—( मागच्यांस ) आणि तो जिवंत समंध कुठं आहे ? पुढें ओढा असा बेरडाला. ( तसें करितात. )

**झुंजार०**—( खालीं पाहून ) याचे पाय उलटे दिसत नाहींत कुठं ? मग समंधाचे पाय उलटे असतात हें खोटं तर. ( जाधवरावास ) तूं जर खरा समंध असलास, तर मरायचा नाहींस. ( त्याला वार करतो. )

**जाधव०**—रक्त निघालं–पण मेलों नाहीं धनीसाहेब !

**झुंजार०**—मग यांत कांहीं वाईट नाहीं झालं; तूं जिवंत रहावंस हेंच चांगलं, कारण मेलास कीं सुटलास.

**धनाजी०**—झुंजारराव, पूर्वी तुमचा लौकिक कसा होता, आणि या हलकटाच्या, या पाजी मनुष्याच्या डावपेचांत सांपडलांत ! काय ह्मणावं तुह्माला ?

**झुंजार०**—कां, पाहिजे तें; थोर मनाचा खुनी ह्मणा हवं तर. कारण दुष्टबुद्धीनं मीं कांहीं केलं नाहीं, जें केलं तें सरळबुद्धीनं केलं.

**धनाजी०**—हा हरामखोर अर्धामुर्धा कबूल झाला

आहे; पण तुह्मी सांगा, तुह्मीं दोघांनीं मिळून पिलाजी-रावाला मारायची मसलत केली होती का?

**झुंजार०**—होय, केली होती.

**पिलाजी०**—( नम्रपणानें ) पण धनीसाहेब, असा माझ्या हातून कांहीं गुन्हा झाला नव्हता.

**झुंजार०**—झाला नव्हता खरा; त्याबद्दल माफी मागतों; पण ( न बघतां जाधवरावाकडे बोट दाखवून ) या सैतानाला असं विचारा, कीं त्यानं माझ्याकडून असं अघोर पातक कां करिवलं.

**जाधव०**—( धिटाईनें ) मला कांहीं विचारूं नका. तुह्माला कळलं तेवढं कळलं; याउप्पर मी एक शब्दसुद्धां काढणार नाहीं.

**धनाजी०**—देवाचं सुद्धां नांव घ्यायचा नाहींस?

**मुधोजी०**—चांगला लंबा केल्यावर झकत घेशील! बेरडा!

**झुंजार०**—घेऊं नयेस हेंच उत्तम; पण कांहो पिलाजीराव, माझ्या बायकोचा दस्तरुमाल तुमच्याजवळ कसा आला?

**पिलाजी०**—तो, धनीसाहेब, माझ्या खोलींत मला सांपडला; कांहीं मतलबानं मींच तिथं नेऊन टाकला, असं यानं स्वतः आतां नुकतं कबूल केलं. तो मतलब अर्थात् पार पाडलाच.

**झुंजार०**—( दुःखानें कपाळ बडवून ) केवढा मूर्ख मी!

**पिलाजी०**—शिवाय, रंभाजी सुद्धां आतां इतक्यांत शुद्धीवर येऊन बोलला, कीं जाधवरावानंच मला त्या

रात्रीं तुमच्याशीं तंटा करायला सांगितलं. त्या तंट्यामुळं आपण मला बरतर्फ केलं. आणखी ह्मणाला कीं जाधवरावानंच माझ्या पोटांत तरवार खुपसलीन–आणि त्याच्याच सांगण्यावरून मीं तुमच्यावर वार केला; इतकं ह्मणून प्राण सोडलान् धनीसाहेब.

**धनाजी०**—( झुंजाररावास ) चला तुह्मी आतां आमच्या बरोबर; तुमचा हुद्दा अधिकार काढून घेतला आहे; आजपासून पिलाजीराव इथले सरलष्कर. (जाधवरावाकडे पाहून पिलाजीस) आपण आतां या मांगाला हालहाल करून कुजवून मारायची एखादी शक्कल काढा. ( झुंजाररावास ) हुजूरच्या कानावर तुमच्या गुन्ह्याची खरी हकीगत जाईपर्यंत, तुह्मी आमच्या पक्कया कैदेंत राहिलं पाहिजे; समजलां ! ( शिपायांस ) चलारे यांना घेऊन. ( ते पुढें येतात. )

**झुंजार०**—( धनाजीरावास हातानें खुणवून ) जरा थांबा, आणि मी थोडं बोलतों तेवढं ऐकून घ्या. आजपर्यंत मीं गादीची काय नोकरी बजावली, ती हुजूर महशूर आहेच; त्याबद्दल कांहीं सांगायला नको. पण हा सर्व प्रकार सरकारांच्या कानावर घालाल, तेव्हां माझी हकीगत कांहीं कमजास्त न करतां सरळ बुद्धीनं जशी घडली तशी सांगा– ह्मणावं–त्याचं बायकोवर अत्यंत प्रेम होतं; पण बेअक्कल ! तो जात्या इतका संशयखोर नव्हता, पण दुसऱ्यानं कान फुंकले ह्मणजे, शुद्ध वेडा होऊन जात असे; त्याच्या हातीं बिनमोल मुक्ताफळ सांपडलं असतां, माकडाप्रमाणं त्यानं तें फेंकून दिलं; तसंच सांगा, कीं जन्मांत कधीं तो रडला नव्हता, पण या प्रसंगीं त्याच्या डोळ्यांला जसा कांहीं पूर आला ! शेवटीं असं कळवा, कीं मागं एकदां स्वारीवर

असतांना एका दुष्ट परदेशी जवानानं, वेणीपूरच्या एका मनुष्याला नाहक मारला, ह्मणून त्या चोराची अशी मुंडी धरली, (चोहोंकडे पहात) आणि जंबिया चढवून त्या हरामखोराचा असा—( स्वतांस जंबिया मारून घेतो, व पडतां पडतां "लाडके, तुला मारण्यापूर्वी तुझं चुंबन जसं घेतलें होतं, तसंच स्वतांला मारतांनाही घेतों." असें ह्मणून तिच्याजवळ पडून प्राण सोडतो. )

**धनाजी०**—( झुंजारराव कण्हत बोलत असतां धांदलींत ) अहो! धरा! बोलला तें फुकट गेलं! हें मीं भाकीत केलंच होतं. ( जाधवरावास ) चिंता, क्षुधा आणि समुद्र यांच्यापेक्षांही तूं निर्दय आहेस.—पहा हा दुःखाचा कहर! मांगा, तुझा प्रताप हा—(पिलाजीरावास) सरलष्करसाहेब, या काळसर्पाला, या बेरडाला काय कडक शिक्षा द्यायची तें आपण ठरवा. कुजत कुजत मेला पाहिजे हा! हर हर! बघवत नाहीं इकडे, झांकून तरी टाका.

( पडदा पडतो. )

**समाप्त.**